सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

(मंत्रालय व समाज कल्याण आयुक्तालय)

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे
२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक

## २०२६-२०२७

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**(मंत्रालय व समाज कल्याण आयुक्तालय)**

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे
२०२६

# कार्यक्रम अंदाजपत्रक

# २०२६-२०२७

## भाग—१

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग ... पान क्र. (भाग - १) १ ते ६४

## भाग—२

सामाज कल्याण विभाग ... पान क्र. (भाग - २) ६५ ते ९८

# भाग–१

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

# अ नु क्र म णि का


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| (१) प्रस्तावना व शासन निर्णय | ... | ०१ |
| (२) जिल्हा परिषदस्तरावर कलम १०० हस्तांतरित केलेल्या योजना विवरणपत्र ''अ'' | ... | ०२ |
| (३) जिल्हा परिषदस्तरावर कलम १२३ खाली हस्तांतरित करावयाच्या योजना | ... | ०२ |
| (४) वित्तीय आवश्यकता ( मंत्रालय ) | ... | ०९ |
| (५) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | ... | ११ |
| (६) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या. मुंबई) | ... | १९ |
| (७) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित, मुंबई | ... | २४ |
| (८) महाराष्ट्र राज्य अनु. जाती/जमाती आयोग | ... | २८ |
| (९) महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई | ... | २९ |
| (१०) महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग | ... | ३० |
| (११) विशेष सहाय्य योजना | ... | ३१ |
| (१२) संचालन व प्रशासन | ... | ३७ |
| (१३) समाज कल्याण आयुक्तालयाची पदे, वेतनमान दर्शविणारे विवरणपत्र | ... | ३७ |
| (१४) व्यसनमुक्ती व प्रचार | ... | ४३ |
| (१५) खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक – | | |
| (अ) विवरणपत्र ''अ''– सविस्तर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक | ... | ४६ |
| (ब) विवरणपत्र ''ब''– प्रधानशीर्षनिहाय अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक | ... | ४८ |
| (१६) समाज कल्याण विभागा अंतर्गत योजनांची संक्षिप्त माहिती तथा तरतूद/खर्च | ... | ५० |

## प्रस्तावना

समाज कल्याण विभागाची निर्मिती शिक्षण व समाज कल्याण अशी विभागणी होऊन माहे मार्च १९७२ मध्ये झाली. सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्रमांक आरओबी-१०८३-४३-१८ ( ओ ॲण्ड एम ), दिनांक २२ एप्रिल, १९८३ अनुसार समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाची दिनांक १ मे, १९८३ पासून विभागणी करण्यात आली असून आदिवासी विकासासंबंधीचे नियम व निर्णय आदिवासी विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले व या विभागाचे नाव समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग असे होते. तद्नंतर शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी १०९३/२८०/सीआर १८/९३/१८ (र व का), दिनांक २७ एप्रिल, १९९३ अन्वये 'पर्यटन' हा विषय गृह विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरओबी-१०९३/सीआर ६६/९३/१८ (र व का), दिनांक २४ जून, १९९३ अन्वये महिला व बाल कल्याण विभाग या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने समाज कल्याण विभागाचे विभाजन करून विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग या स्वतंत्र विभागाची दि. १० मार्च, १९९९ पासून स्थापना केली होती. अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ पासून अपंगाचे शिक्षण व पुनर्वसनाची योजना राबविण्यासाठी सन २००० पासून स्वतंत्र आयुक्तालयाची निर्मिती करण्यात आली आहे.

''महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक शा का नि १००१/प्र. क्र. ८-२००१-१८ (र व का) सामान्य प्रशासन विभाग, दि. २७-२-२००१ अन्वये समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाचे नाव ''सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रीडा'' असे करण्यात आले आहे. तसेच विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग हा विभाग वरील नवीन विभागामध्ये समाविष्ट करण्यात आला होता. तथापि महाराष्ट्र शासन राजपत्र, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक शा. का. नि.-२०१७/प्र.क्र.३३/१८ (र व का) अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग स्वतंत्र करण्यात आला आहे''

तसेच २०००–२००१ या विभागातील कामकाजात खालीलप्रमाणे सुधारणा / बदल करण्यात आले आहेत :–

(१) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक सकआ-१०९९ / प्र. क्र. १५७ आस्था २, दि. ४-१०-२००० अन्वये समाज कल्याण विभागातील सेवायोजन हे काम रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे असलेले सेवायोजन नोंदणीचे काम रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले आहे.

(२) (१) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी २००० / प्र. क्र. १५५ / अर्थसंकल्प, दिनांक ४–११–२००० अन्वये समाज कल्याण विभागाकडे असलेल्या एकूण ३८ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत.
(शा. नि. परिपत्र-प्रपत्र 'अ' नुसार).

(३) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक बीजीटी-२००० / प्र. क्र. १५७ / अर्थसंकल्प, दिनांक २४–१–२००१ अन्वये समाज कल्याण विभागाकडील 'दारूबंदी प्रचार कार्य' ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे.

**शासन निर्णय :–** समाज कल्याण विभागातील खालील योजना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १०० खाली शासन अधिसूचना क्रमांक बीजीटी-२००० / प्र. क्र. १५५ / अर्थसंकल्प, दिनांक ४ नोव्हेंबर २००० अन्वये सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत :–

विवरणपत्र 'अ' जिल्हा परिषदस्तरावर कलम १०० खाली हस्तांतरित केलेल्या योजना

**योजनेचे नाव – मागासवर्गीयांचे कल्याण**

(१) स्वयंसेवी संस्थांना वसतिगृहाच्या परिरक्षणासाठी अनुदान.

(२) ग्रामीण गृहनिर्माण-सहकारी गृहनिर्माण.

(३) अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान.

(४) माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या (इ. ५ वी ते ७ वी).

(५) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन.

(६) शिक्षण फी, परीक्षा फी प्रदाने (मॅट्रीकपूर्व).

(७) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे.

(८) ग्रामीण भागातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिवणकामाचे, टंकलेखनाचे वर्ग उघडणे व त्यांचे परिरक्षण करणे.

(९) सफाई कामगारांच्या विशेषत: मेहतरांच्या मुलांकरिता शाळा.

(१०) बालवाड्या व संस्कार केंद्रे (अनुसूचित जाती).

(११) बालवाड्या (मागासवर्ग).

(१२) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुला-मुलींसाठी वसतिगृहे सुरू करणे व त्यांची देखभाल करणे.

(१३) अस्पृश्यता निवारण प्रचार.

**सामाजिक न्याय –**

(१४) अनु.जाती. व नवबौध्द जातीच्या मुला/मुलींकरीता शासकीय निवासी शाळा सुरू करणे.

(१५) आठवीपर्यंतच्या शारीरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारच्या शिष्यवृत्त्या.

(१६) लघु उद्योगासाठी शारीरिकदृष्ट्या अपंग व्यक्तींना वित्तीय सहाय्य.

(१७) परमनंट लायबिलीटी होम, बिर्सी.

**टीप :** वर नमूद केलेली अ. क्र. १२ ची योजना शा. नि. क्र. शा. व गृ.-२००३/प्र. क्र. ६६४/मावक-४, दि. ८ सप्टेंबर, २००४ अन्वये, समाज कल्याण अधिकारी यांचेकडे हस्तांतरित झाली आहे.

तसेच खालील योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम १२३ खाली शासन आदेश क्रमांक बीजीटी–२००० / प्र. क्र. १५५ / अर्थसंकल्प, दिनांक ४ नोव्हेंबर, २००० अन्वये सदर आदेश शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून जिल्हा परिषदांकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत :–

जिल्हा परिषद स्तरावर कलम १२३ खाली हस्तांतरित करावयाची योजना

**विवरणपत्र 'ब'**

| | अ. क्र. | योजनेचे नाव |
|---|---|---|
| मागासवर्गीयांचे कल्याण | (१) | स्वयंसेवी संस्थांना वसतिगृह चालविण्यासाठी अनुदाने. |
| | (२) | खास शिक्षण संलग्न योजनेसाठी अनुदान. |
| | (३) | अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता असलेल्या शासकीय वसतिगृहांना परिरक्षण अनुदान (जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका स्तर वगळून). |
| | (४) | सफाई कामगारांच्या मुलांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्त्या. |
| | (५) | आंतरजातीय विवाह. |
| सामाजिक न्याय | (६) | वृद्ध व अपंगांसाठी गृहे-सर्वसाधारण वृद्धाश्रम ( जिल्हा मुख्यालय स्तर वगळून). |
| | (७) | मातोश्री वृद्धाश्रम (जिल्हा मुख्यालय स्तर वगळून). |
| | (८) | स्वयंसेवी संस्थांना अनुदान. |

**टीप :** वर नमूद केलेली अ. क्र. ३ ची योजना शा. नि. क्र. शावगृ– २००३/प्र. क्र. ६६४/मावक. दि. ८ सप्टेंबर, २००४ अन्वये समाज कल्याण अधिकारी यांचेकडे हस्तांतरित झाली आहे.

२. वर नमूद केलेल्या योजना दिनांक ४ नोव्हेंबर, २००० ची शासन अधिसूचना / आदेश शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येतील.

३. सन २०००-२००१ करिता वरील योजनांसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदींचा तपशील सोबतच्या विवरणपत्र ''अ'' मध्ये दर्शविण्यात आलेला आहे. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी वरील योजनांच्या तरतुदीतून दिनांक ४ नोव्हेंबर, २००० ची शासन अधिसूचना / आदेश शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापर्यंत झालेला खर्च व त्यानंतर दिनांक ३१ मार्च २००१ पर्यंतच्या कालावधीकरिता शिल्लक असलेली तरतूद जिल्हा परिषदनिहाय सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळवावी. या तरतुदीतून वरील कालावधीतील खर्चाची देयके जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांनी कोषागारातून आहरीत करावीत. या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेमधील समाज कल्याण अधिकाऱ्यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. वरीलप्रमाणे कोषागारातून काढण्यात आलेल्या रकमांच्या खर्चाची मासिक विवरणपत्रे जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण अधिकारी यांनी संबंधित लेखा शीर्षाच्या तपशिलासह व प्रमाणक क्रमांक व दिनांकासह आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना पाठवावीत. त्यानुसार आयुक्त, समाज कल्याण यांनी या खर्चांच्या ताळमेळाची कार्यवाही पार पाडावी.

५. हा खर्च चालू वित्तीय वर्षात जरी जिल्हा परिषदेच्या नियमित लेख्यात समाविष्ट होणार नसला तरी या जमाखर्चाची माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी संकलीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी व समाज कल्याण समित्यांच्या निदर्शनास आणावी.

६. जिल्हा परिषदेमार्फत या योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ती मान्यता जिल्हा परिषद अधिनियमास अनुसरून सक्षम प्राधिकरणाकडून घेण्यात यावी व त्यासाठी मान्यता घेण्याची कार्यपद्धती महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखा संहिता १९६८ प्रमाणे राहील. ही कार्यपद्धती दिनांक ४ नोव्हेंबर, २००० ची शासन अधिसूचना, आदेश शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासूनच्या आर्थिक व्यवहारास लागू राहील.

७. दिनांक ४ नोव्हेंबर, २००० ची शासन अधिसूचना / आदेश शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते ३१ मार्च, २००१ या कालावधीसाठी सध्याची शासकीय कार्यालयांमध्ये लागू असलेली लेखा परीक्षणाची कार्यपद्धती चालू राहील.

८. सन २००१ ते २००२ च्या अर्थसंकल्पात या योजनांसाठी तरतूद जिल्हा परिषदेच्या लेखा शीर्षाखाली करण्यात यावी.

९. चालू वित्तीय वर्षाचा खर्च संबंधित योजनांच्या सध्याच्या लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

१०. जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या वरील योजनांची आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरू करणे व त्याची देखभाल करणे आणि अनु. जातीचे मुला-मुलींकरिता असलेल्या शासकीय वसतिगृहांना परिरक्षण अनुदान (जिल्हा मुख्यालय आणि महानगरपालिका स्तर वगळून व सफाई कामगारांचे विशेषतः मेहतरांच्या मुलांकरिता शाळा या योजना राज्य शासनाकडे परत घेण्यात आलेल्या आहेत.

११. वर नमूद केलेल्या सर्व आदेशांचे सर्व संबंधितांनी पालन करावे. तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभागाने शासन निर्णय क्र. जिपयो-१०/२०००/ प्र. क्र. ११३ / ४७, दिनांक २८ सप्टेंबर, २००० अन्वये दिलेल्या सूचनांचेही सर्व संबंधितांनी पालन करावे.

१२. हा शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या सहमतीने तसेच वित्त विभागाच्या सहमतीने, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ प्र. क्र. ८९८/२०००/व्यय-११, दिनांक १ नोव्हेंबर, २००० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. हर्षदीप कांबळे,**
भा.प्र.से.
प्रधान सचिव,
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री / मा. राज्यमंत्री (सर्व)
सर्व मंत्रालयीन विभाग
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महालेखापाल महाराष्ट्र १/२ ( लेखा परीक्षा ), मुंबई / नागपूर
महालेखापाल महाराष्ट्र १/२ ( लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई / नागपूर
मुख्य लेखा परीक्षक स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई, वाशी
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व विभागीय आयुक्त / सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
सर्व विभागीय / जिल्हा समाज कल्याण अधिकारी
निवड नस्ती

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची मुख्य कार्ये खालीलप्रमाणे आहेत.**

(१) अनुसूचित जाती व नवबौद्ध जातींचे कल्याण.

(२) वृद्ध, अपंग, निराधार इत्यादी दुर्बल घटकांचे कल्याण.

(३) दारूबंदी प्रचार आणि अंमली पदार्थाचे सेवनाविरुद्ध मोहीम.

**सामाजिक न्याय विभागात वरील कार्ये खालील पाच कक्षांमध्ये विभागण्यात आली आहेत.**

(१) मागासवर्गीयांचे कल्याण कक्ष

(२) सुधार प्रशासन कक्ष

(३) अनु. जाती उपयोजना कक्ष

(४) विशेष सहाय्य कक्ष

(५) इतर शाखा

(अ) अर्थसंकल्प शाखा

(ब) आस्थापना व नोंदणी शाखा

(क) संगणक शाखा

(ड) सामाजिक राष्ट्रीय एकात्मता समिती आणि राष्ट्रीय एकात्मता व विश्वबंधुत्व विचार संवर्धन समिती

(इ) महाराष्ट्र राज्य कुणबी उच्चाधिकार समिती

**सामाजिक न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली खालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख आहेत :–**

(१) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

वरील विभागांच्या/कार्यालयांच्या कार्यक्रमासंबंधीच्या माहितीचा समावेश कार्यक्रम अंदाजपत्रक पुस्तकाच्या दोन विभागात करण्यात आला आहे. त्यानुसार खालील पुस्तकात उपरोक्त माहिती देण्यात आली आहे.

पुस्तक क्रमांक (१) मंत्रालय आणि समाज कल्याण आयुक्तालय.

**मागासवर्गीयांचे कल्याण :–** या विभागात अनुसूचित जाती यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजना प्रामुख्याने तीन विभागात येतात.

(१) शैक्षणिक योजना.

(२) आर्थिक उन्नतीच्या योजना.

(३) सामाजिक व इतर सामूहिक योजना.

**शैक्षणिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश करण्यात आला आहे.**

(१) भारत सरकारच्या शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्त्या.

(२) शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क देण्यापासून सूट देणे व शिष्यवृत्ती देणे.

(३) मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृह उघडणे व चालविणे.

(४) विभागीय स्तरावर १,००० मुलांचे क्षमतेचे शासकीय वसतिगृहे सुरू करणे.

(५) मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविण्याकरिता स्वेच्छा संस्थांना सहाय्यक अनुदान देणे.

(६) सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विशेष निर्वाह भत्ता देणे.

(७) बालवाड्यांना सहाय्यक अनुदान देणे.

(८) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देणे.

(९) विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणे.

(१०) अस्वच्छ उद्योगधंद्यात असलेल्यांच्या मुलांना शालान्त परीक्षापूर्व शिष्यवृत्त्या.

(११) व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे.

(१२) वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांकरिता पुस्तकपेढ्या इत्यादी.

(१३) माध्यमिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना.

(१४) सफाई कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा.

(१५) शिकवणी व संलग्न योजना.

(१६) इ. १० वी, १२ वी परिक्षेला विशेष उल्लेखनीय यश संपादन करणारे अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे.

(१७) राज्यातील १०० अनु. जातीचे विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती.

(१८) अनु. जातीचे ७५ मुला-मुलींना परदेशातील शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती.

(१९) इ. १० वीच्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इ. ११ वी मध्ये प्रवेश घेणारे मुला-मुलींना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे.

(२०) मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला प्रशिक्षण)

(२१) इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना.

(२२) अनु. जाती-नवबौद्ध उमेदवारांना व्यावसायिक (हॉर्टिकल्चर) प्रशिक्षण देणे.

(२३) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना.

(२४) गोपीनाथ मुंडे उसतोड कामगार महामंडळास वित्तीय सहाय्य

**आर्थिक विकासाच्या योजना खालीलप्रमाणे आहेत.**

(१) मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना.

(२) अत्याचारात बळी पडलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक सहाय्याची योजना.

(३) आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य.

(४) गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देणे.

(५) कन्यादान योजनेखाली नवदाम्पत्यांना अर्थसहाय्य.

(६) अनु. जाती व नवबौद्ध युवकांना सैनिकी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देणे.

(७) अनु. जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने याचा पुरवठा करणे.

(८) कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना अनु. जाती व नवबौद्ध भूमिहीन शेतमजूरांना जमिनीचे वाटप करणे व जमीन खरेदीसाठी प्रत्येकी १००% अनुदान देणे.

(९) राज्यातील तृतीय पंथीयांच्या कल्याणासाठी व त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तृतीय पंथींचे कल्याण मंडळ.

**सामाजिक व इतर सामूहिक योजनांमध्ये खालील योजनांचा समावेश आहे :—**

(१) अस्पृश्यता निवारण कार्यक्रम.

(२) राज्यातील समाजसेवकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर ''समाजभूषण'' म्हणून सन्मान.

(३) सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील उत्कृष्ट संस्थांना पारितोषिक देणे.

(४) जातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करणे.

(५) मागासवर्गीय घरबांधणी योजना.

(६) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे.

(७) सामाजिक न्याय निर्देशांक निर्मिती व उपाययोजना.

(८) अनुसूचित जाती नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना.

(९) प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन बांधणे.

(१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे.

(११) नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत.

उपरोक्त योजनांबाबत मंत्रालयीन स्तरावर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीचे आदेश निर्गमित करण्यात येतात. तसेच सदर योजना राबविण्यात येणाऱ्या अडीअडचणी लक्षात घेऊन सदर योजना वेळोवेळी सुधारित करण्यात येतात. या योजनेच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधित कार्यासने शासनाने वेळोवेळी दिलेल्या शासकीय आदेश व सूचना लक्षात घेऊन पार पाडतात.

**सुधार प्रशासन—**

समाज कल्याण विभागा अंतर्गत खालील योजना येतात.

(१) सामाजिक न्याय शिक्षण संस्थांना मान्यता व अनुदान.

(२) वृद्धाश्रम अनुदान योजना.

(३) व्यसनमुक्तीच्या प्रचार कार्यासाठी स्वयंसेवी संस्थांना वित्तीय सहाय्य.

(४) अंमली पदार्थ सेवन विरोधी मोहीम चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना वित्तीय सहाय्य.

उपरोक्त योजनांच्या अंमलबजावणीचे आदेश शासन स्तरावर निर्गमित करण्यात येतात व त्यासाठी लागणारी तरतूद व कार्यपद्धती विहित करण्याचे काम करण्यात येते. अपंग योजनासंबंधीची माहिती पुस्तिकेतील अपंग कल्याण विभागाच्या माहितीत देण्यात आली आहे

शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. विघयो १०९५/प्र. क्र. १९/का—१४५३, दि. १६—११—१९९५ अन्वये अनु. जाती उप योजना तयार करणे व त्याचे संनियंत्रण करणे हे काम नियोजन विभागाने सामाजिक न्याय विभागाकडे सोपविले आहे. त्यास अनुसरून अनु. जाती उप योजना तयार करताना खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन योजना तयार केलेली आहे :—

(१) ज्या योजनांद्वारे निश्चित असा लाभ अनुसूचित जातीला मिळतो अशा प्रकारच्या योजना अनु. जाती उप योजनांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. तसेच ज्या योजनांद्वारे नक्की किती अनुसूचित जातीच्या व्यक्तींना किती प्रमाणात लाभ मिळतो हे निश्चित करता येणे शक्य नसेल अशा योजना अनु. जाती उप योजनांमध्ये घेण्यात आलेल्या नाहीत. अशा प्रकारच्या योजनांचा समावेश जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय योजनांमध्ये करण्यात आलेला आहे.

(२) शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा विकासाचा घटक असल्याने त्यावर जास्त लक्ष केंद्रीत करण्यात आलेले आहे.

(३) ज्या योजनांमध्ये लाभार्थी, अनुसूचित जातीचे नाहीत त्या योजना उदा., मोठे/मध्यम सिंचन प्रकल्प, रोजगार हमी योजना, सामान्य आर्थिक सेवा, रस्ते, पूल इत्यादी शीर्ष उपशीर्षाखालील योजना घेण्यात आलेल्या नाहीत. अनु. जाती उप योजनेंतर्गत दिलेला नियतव्यय अशा योजनांसाठी वापरला जातो की ज्या योजनांचा लाभ अनुसूचित जातीच्या व्यक्तींना वैयक्तिकपणे अथवा त्यांच्या वस्त्यांना सामुदायिकरीत्या मिळेल याची दक्षता घेतली जाईल.

४. वार्षिक योजना सन २०२५-२६ साठी अनुसूचित जाती उपयोजनासाठी एकूण २२६५८.०० (कोटी) इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी राज्यस्तरीय योजनेसाठी १९६५८.०० (कोटी) व जिल्हास्तरीय योजनेकरिता ३०००.०० (कोटी) इतका नियतव्यय विभाजन करुन दिला आहे. तसेच सन २०२६-२७ साठी एकूण रुपये २३१५०.०० (कोटी) नियतव्यय मंजूर केला असून त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता २०१५०.०० (कोटी) व जिल्हास्तरीय योजनेसाठी रु. ३०००.०० (कोटी) मंजूर आहेत.

**विकासक्षेत्र**

१. कृषि व संलग्न सेवा

२. ग्रामीण विकास

३. विद्युत विकास

४. उद्योग व खनिजे

५. वाहतूक व दळणवळण

६. सामाजिक आणि सामूहिक सेवा

(१) सामान्य शिक्षण

(२) क्रीडा व युवकसेवा

(३) तांत्रिक शिक्षण

(४) आरोग्य

(५) पाणीपुरवठा

(६) गृहनिर्माण

(७) नगर विकास

(८) माहिती व प्रसिद्धी

(९) मागासवर्गीयांचे कल्याण

(१०) समाज कल्याण

(११) कामगार व कामगार कल्याण

(१२) पोषण

**विभागात एकूण ६ महामंडळे असून त्यांची यादी खालीलप्रमाणे आहे.**

(१) महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ,

(२) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,

(३) संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ,

(४) महाराष्ट्र राज्य जातीजमाती आयोग (वरळी) मुंबई,

(५) महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

(६) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ.

या महामंडळाचे सर्व प्रशासकीय कामकाज तसेच त्यांना भागभांडवल अदा करणे, केंद्रीय अर्थसहाय्यातून राबविण्यात येणाऱ्या योजनांना आर्थिक निधी मंजूर करणे इत्यादी बाबी मंत्रालयीन पातळीवर करण्यात येतात. या महामंडळाच्या कार्याची माहिती संबंधित कार्यक्रम अंदाजपत्रिकेच्या पुस्तिकेत देण्यात आली आहे.

**इतर शाखा—**

**(१ अ) अर्थसंकल्प :** या शाखेतर्फे विभागाचे वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे तसेच वेळोवेळी होणाऱ्या बदलाचा अंदाज घेऊन सुधारित अर्थसंकल्प छाननी करून वित्त विभागास सादर करणे, अर्थसंकल्पीय तरतुदीस वित्त विभागाची मान्यता मिळाल्यानंतर सर्व संबंधितांना कळविण्यात येतात. तसेच वार्षिक योजना तयार करून त्याच्या आराखड्यास नियोजन विभाग आणि नीती आयोगाची मंजुरी घेण्यात येते.

**ठेव संलग्न विमा योजना**

भविष्य निर्वाह निधीस अधिक सामाजिक सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी जास्तीत जास्त बचत करावी म्हणून त्यांना निश्चित प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून शासनाने ठेव संलग्न विमा योजना चालू केली आहे. ही योजना विमेदारास विम्याचा हप्ता न देता विम्याचा फायदा देते व ह्या योजनेचा फायदा काही अटी पूर्ण केल्यास व राज्य शासकीय कर्मचाऱ्याच्या निधनाचेवेळी किमान ५ वर्षे नोकरी केलेली असेल अशा कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना मिळेल. या रकमेची मर्यादा जास्तीत जास्त रु. ६०,००० असेल.

**(ब) आस्थापना व नोंदणी शाखा :** या शाखेमार्फत विभागाची आस्थापना, सामाजिक न्याय संचालनालयाची आस्थापना आणि विभागाकरिता लागणाऱ्या साहित्य सोयी व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

**(क) संगणक शाखा :** या शाखेतर्फे विविध विषयांची माहिती संगणकास देण्यात आलेली आहे. सदर माहितीचा विनियोग आवश्यक त्या अनुसार केला जातो. सदर संगणकात पे-रोल कार्यक्रम, अनु. जाती उप योजनेचा आराखडा इत्यादी गोष्टी साठविलेल्या असून त्याचा वापर गरजेनुसार केला जातो.

**(ड)** सामाजिक राष्ट्रीय एकात्मता समिती आणि राष्ट्रीय एकात्मता व विश्वबंधुत्व विचार संवर्धन समिती.

**विभागाची रचना—(खुद्द)**

सामाजिक न्याय विभागांतर्गत एकूण ११७ अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत. सदर अधिकारी / कर्मचारी यांची पदनिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (रुपये) | २०२०-२०२१ | २०२१-२०२२ | २०२२-२०२३ | २०२३-२०२४ | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **गट-अ** | | | | | | | | |
| १ | अ.मु.स./प्रधान सचिव/ सचिव | संवर्ग पद | १ | १ | १ | १ | १ | १ |
| २ | सह सचिव | एस-२७ - १२३१००-२१५९०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| ३ | उप सचिव | एस-२५ - ७८८००-२०९२०० | २ | २ | २ | २ | २ | २ |
| ४ | अवर सचिव | एस-२३ - ६७७००-२०८७०० | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ४+१ (विधी) |
| ५ | सहायक संचालक | एस-२० - ५६१००-१७७५०० ९३००-३४८००(ग्रेड पे-५४००) | १ | १ | १ | १ | १ | १ |
| | | **एकूण गट-अ पदे** | **१०** | **१०** | **१०** | **१०** | **१०** | **१०** |
| **गट-ब** | | | | | | | | |
| १ | कक्ष अधिकारी | एस-१७ - ४७६००-१५११०० | १४ | १४ | १४ | १४ | १४ | १४ |
| २ | निवडश्रेणी लघुलेखक | एस-१७ - ४७६००-१५११०० | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| ३ | उच्चश्रेणी लघुलेखक | एस-१६ - ४४९००-१४२४०० | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| ४ | सहायक कक्ष अधिकारी | एस-१४ - ३८६००-१२२८०० | २९ | २९ | २९ | २९ | २९ | २९ |
| ५ | निम्नश्रेणीलघुलेखक (मराठी) | एस-१५ - ४१८००-१३२३०० | ४ | ४ | ४ | ४ | ४ | ४ |
| ६ | निम्नश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) | एस-१५ - ४१८००-१३२३०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| | | **एकूण गट-ब पदे** | **५५** | **५५** | **५५** | **५५** | **५५** | **५५** |
| **गट-क** | | | | | | | | |
| १ | लघुटंकलेखक | एस-८ - २५५००-८११०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| २ | लिपिक-टंकलेखक | एस-६ - १९९००-६३२०० | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ | ३३ |
| ३ | वाहन-चालक | एस-६ - १९९००-६३२०० | २ | २ | २ | २ | २ | २ |
| | | **एकूण गट-क पदे** | **३६** | **३६** | **३६** | **३६** | **३६** | **३६** |
| **गट-ड** | | | | | | | | |
| १ | हवालदार | एस-३ - १६६००-५२४०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| २ | नाईक | एस-३ - १६६००-५२४०० | २ | २ | २ | २ | २ | २ |
| ३ | रोनिओ शिपाई | एस-३ - १६६००-५२४०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| ४ | झेरॉक्स मशीन चालक | एस-३ - १६६००-५२४०० | १ | १ | १ | १ | १ | १ |
| ५ | शिपाई | एस-१ - १५०००-४७६०० | ११ | ११ | ११ | ११ | ११ | ११ |
| | | **एकूण गट-ड पदे** | **१६** | **१६** | **१६** | **१६** | **१६** | **१६** |
| | **एकूण सर्व वर्ग** | | **११७** | **११७** | **११७** | **११७** | **११७** | **११७** |

## मंत्रालयीन आस्थापनासाठी सन २०२४-२०२५ मध्ये प्रत्यक्ष रकमा, सन २०२५-२०२६ मधील अर्थसंकल्पीय अंदाज व सुधारित अंदाज व सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती

तक्ता क्रमांक १

**वित्तीय आवश्यकता** (रुपये हजारांत)

| कार्यक्रम | | प्रत्यक्ष रकमा, २०२४–२०२५ | अर्थसंकल्प, २०२५–२०२६ | सुधारित अंदाज, २०२५–२०२६ | अर्थसंकल्प, २०२६–२०२७ |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | एकूण | एकूण | एकूण |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
| **(अ) कार्याचे वर्गीकरण :–** | | | | | |
| सेक्रेटरीएट, सामाजिक न्याय, विभाग | | १५३५२९ | ५४१९२५ | ३८५१४५ | ३६७४९८ |
| | भारित | ... | १ | १ | १ |
| एकूण स्थूल | दत्तमत | १५३५२९ | ५४१९२६ | ३८५१४६ | ३६७४९९ |
| वजा–वसुली | | ... | ... | ... | ... |
| एकूण निव्वळ | भारित | ... | १ | १ | १ |
| | दत्तमत | १५३५२९ | ५४१९२६ | ३८५१४६ | ३६७४९९ |
| **(ब) उद्दिष्टनिहाय वर्गीकरण :–** | | | | | |
| (१) सामाजिक न्याय, विभाग (२२५१ ०११३) | | | | | |
| (१) वेतन | | ९१२६६ | १७५२३१ | १०९५०६ | १९०००० |
| (२) प्रवास खर्च | | ६१० | १६२६ | ११३८ | १६७५ |
| (३) अतिकालिक भत्ता | | ... | १३२ | १०६ | १३२ |
| (४) कार्यालयीन खर्च | | ५०३३ | ३५६१ | २८४९ | ३६६८ |
| (५) पेट्रोल, तेल व वंगण | | ... | ... | ... | ... |
| (६) संगणक खर्च | | ... | ६७३ | ४७१ | ६९३ |
| (७) दूरध्वनी | | ३३ | २५० | २०० | २५० |
| (८) इतर प्रशासनिक खर्च | | २१ | ३५० | २४५ | ३५० |
| (९) व्यावसायिक सेवा | | ३५९ | ४०० | ३२० | ४०० |
| (१०) कंत्राटी सेवा | | ३९०५ | ३४१३ | ३०७२ | ३४१३ |
| . एकूण ... | | १०१२२७ | १८५६३६ | ११७९०७ | २००५८१ |

तक्ता क्रमांक १ - चालू

| कार्यक्रम | | प्रत्यक्ष रकमा, २०२४–२०२५ | अर्थसंकल्प,२०२५–२०२६ | सुधारित अंदाज,२०२५–२०२६ | अर्थसंकल्प, २०२६–२०२७ |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण | एकूण | एकूण | एकूण |
| (१) | | (२) | (३) | (४) | (५) |
| (२) सामाजिक राष्ट्रीय एकात्मता समितीच्या विकासाच्या योजना – (२२५१-०३८३) | इतर खर्च | ... | ६६ | ६३ | १० |
| | एकूण... | ... | ६६ | ६३ | १० |
| (३) राष्ट्रीय एकात्मता व विश्वबंधुत्व वाढीस लावण्यासाठी विकासयोजना – (२२५१-०४४५) | इतर खर्च | १९७० | ६२२३ | २१७५ | ६९०७ |
| | एकूण... | १९७० | ६२२३ | २१७५ | ६९०७ |
| (४) शासकिय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण (२२५१-०९८२) | दत्तमत | ० | ५०००० | ३५००० | ६०००० |
| (५) इ गव्हर्नस प्रकल्प (२२५१-०९०१) | | ५०३३२ | ३००००० | २३०००० | १००००० |
| | दत्तमत | ... | ... | ... | ... |
| | भारीत | ... | १ | १ | १ |
| | एकूण... | ३०७०५८ | १०८३८५१ | ७७०२९१ | ७३४९९७ |

# २. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील दुर्बल घटकाला व्यवसायाकरिता अल्प व्याजदरात कर्ज देवून स्वंयरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये १० जुलै, १९७८ रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महामंडळाचे सध्याचे अधिकृत भाग भांडवल रु.१००० कोटीचे आहे. राज्य शासनाचे ५१% व केंद्र शासनाचे ४९% भागभांडवल आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध यांचेकरिता प्रामुख्याने स्वयंरोजगाराच्या खालील योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत.

**राज्य शासनाच्या योजना**

**(१) अनुदान योजना**
**(२) बीज भांडवल योजना**
**(३) थेट कर्ज योजना**
**(४) प्रशिक्षण योजना**

**केंद्रीय महामंडळाच्या योजना**

**(अ) रा.अ.जा.वि.वि.म.च्या योजना**
**(१) मुदती कर्ज योजना**
**(२) सुक्ष्मपतपुरवठा कर्ज योजना**
**(३) उच्च शैक्षणिक योजना**

**(ब) रा.रा.क.वि.वि.म.च्या योजना**
**(१) जनरल मूदती कर्ज योजना**
**(२) महिला अधिकारीता योजना**
**(३) महिला समृध्दी योजना**
**(४) सुक्ष्मपतपुरवठा योजना**
**(५) उच्च शैक्षणिक कर्ज योजना**
**(६) ग्रीन बिजनेस योजना**
**(७) सॅनेटरी मार्ट योजना**
**(८) पे ॲण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना**
**(९) स्वच्छता उद्यमी योजना**
**(१०) स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना**

**राज्य शासनाच्या योजना**

- **५०% अनुदान योजना -**

१. प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत

२. प्रकल्प मर्यादेच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रु. २५,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरीत रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करावयाची आहे.

- **बीज भांडवल योजना -**

महात्मा फुले महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलामधून बीजभांडवल योजना राबविण्यात येते. योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे

१. प्रकल्प मर्यादा रु. ५०,००१/- ते रु. ५ लाखापर्यंत.

२. प्रकल्प मर्यादेच्या २०% बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ % द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. ५०,०००/- समावेश आहे.

३. बँकेचे कर्ज ७५% देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो.

४. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हफ्त्यानुसार ३ ते ५ वर्षाचे आत करावी लागते.

५. अर्जदारास ५ %स्वत:चा सहभाग भरावयाचा आहे.

- **महामंडळामार्फत राबविण्यात येणारी नवीन रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना -**

सदर योजनेअंतर्गत महात्मा फुले विकास महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलातून थेट कर्ज योजना राबविण्यात येते. योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१. प्रकल्प मर्यादा रु. १,००,०००/- पर्यंत

२. महामंडळाचा सहभाग रु. ४५,०००/- इतका असून अनुदान रु. ५०,०००/- (मर्यादेसह) आहे.

३. अर्जदाराचा सहभाग रु. ५,०००/- आहे.

४. सदर कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यानुसार ३ वर्षात (३६ महिन्यांच्या) आत करावयाची आहे.

५. सदर देण्यात येणाऱ्या कर्जावर ४% द.सा.द.शे. व्याजदर आहे.

- **प्रशिक्षण योजना -**

प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभुदय योजनेअंतर्गत सेक्टर स्किल काउन्सिल यांच्यामार्फत अनुसूचित जाती, बौद्ध / नवबौद्ध समाजातील युवक / युवती यांना रोजगार - स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींस मासिक रु १०००/- विद्यावेतन देण्यात येते.

## एन.एस.एफ.डी.सी,योजना

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागसवर्ग विकास महामंडळाची वाहिनीकृत यंत्रणा म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर (www.nsfdc.nic.in) वर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे योजना आहेत.

**१. सुक्ष्मपत पुरवठा योजना**

| कर्ज मर्यादा (रुपये) | म.फु.मा.वि.म. | एनएसएफडीसी चे कर्ज | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| १,४०,०००/- पर्यंत (रु.एक लाख चाळीस हजार पर्यंत) | रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदान | जास्तीत जास्त ९०% पर्यंत | ६.५०% | ३ वर्षे |

या योजनेमध्ये रु.१,४०,०००/- ची मर्यादा असुन एकुण रकमेच्या ९०% एनएसएफडीसी, नवी दिल्ली देणार असुन उर्वरित रक्कम अनुदान स्वरुपात महामंडळाला दयावयाची आहे.

**२. मुदती कर्ज योजना**

| कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| | म.फु.मा.वि.म. | एनएसएफडीसी | | |
| | अनुदान/बीज भांडवल | | | |
| रु. १,४०,००० पासून ते रु.५०,००,०००/- पर्यंत | रु.५०,०००/-(रु.पन्नास हजार) कमाल मर्यादेत अनुदान | प्रकल्प मुल्याच्या ९०% | ८% | ७ वर्षे |
| | उर्वरित रक्कम बीज भांडवल म्हणून देण्यात येईल. | (जास्तीत जास्त) | | |

तसेच या योजनेमध्ये रु.१,४०,०००/- पासुन ते ५०,००,०००/- पर्यंत देण्याचे प्रावधान आहे एकूण प्रकल्प मुल्याच्या ९०% एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत प्राप्त होणार असुन रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदान आहे व अर्जदाराच्या सहभागाचा ५% प्रमाणे कमाल मर्यादा आहे.

**३. शैक्षणिक कर्ज योजना - उच्च शिक्षणासाठी (देशांतर्गत व देशाबाहेर)**

| कर्ज मर्यादा (रुपये) | एनएसएफडीसी | अर्जदार सहभाग | व्याजदर |
|---|---|---|---|
| ४०,००,०००/- पर्यंत (रु.चाळीस लाख पर्यंत) | ९०% | १०% | ६.५% |

## एनएसकेएफडीसी योजना

### १. जनरल मुदती कर्ज योजना (General Term Loan) (GTL)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाख ते रु.१०.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ८% | १० वर्ष |
| २ | रु.१०.०० लाखाच्या वर ते रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ९% | १० वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाख ते रु.१५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### २. महिला अधिकारिता योजना (Mahila Adhikarita Yojana) (MAY)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.२.०० लाख | ९०% | १०% | ७% | ५ वर्ष |

या योजनेमध्ये रु.२.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ३. महिला समृध्दी योजना (Mahila Smruddhi Yojana) (MSY)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% | ३ वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ४. सुक्ष्मपत पुरवठा योजना (Micro Credit Finance) (MCF)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% | ३ वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ५. उच्च शैक्षणिक कर्ज योजना (Education Loan) (EL)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१०.०० लाखापर्यंत (देशाअंर्तगत) | ९०% | १०% | ६% (महिलांकरिता ०.५० % कमी व्याजदर) | ५ वर्ष |
| २ | रु.२०.०० लाखापर्यंत (देशाबाहेर) | ९०% | १०% | ७% (महिलांकरिता ०.५० % कमी व्याजदर) | ५ वर्ष |

या योजनेमध्ये देशाअंर्तगत रु.१०.०० लाखापर्यंत व देशाबाहेर रु.२०.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो. उत्पन्न मर्यादा रु.४,५०,०००/- असणाऱ्या अर्जदारास व्याज प्रतिपुर्ती करण्याचे नमुद आहे.

### ६. ग्रीन बीजनेस योजना (Green Business) (GB)

| अ.क्र | कर्ज | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.७.५० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% | १० वर्ष |
| २ | रु.७.५० ते रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% | १० वर्ष |
| ३ | रु.१५.०० ते रु.३०.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ८% | १० वर्ष |

या योजनेमध्ये रु.३०.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ७. सॅनेटरी मार्ट योजना (Sanitary Mart) (SM)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% (महिला लाभार्थींकरिता) ७% (पुरुष लाभार्थींकरिता) | १० वर्ष |

या योजनेमध्ये रु.१५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये ०.५% सूट देण्याचे नमूद केलेले आहे.

### ८. पे ॲण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना (Pay  Use Community Toilets)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.२५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% (महिला लाभार्थींकरिता) ८% (पुरुष लाभार्थींकरिता) | १० वर्ष |

या योजनेमध्ये रु.२५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ९. स्वच्छता उद्यमी योजना (Swachhta Udyami Yoajan) (SUY)

| अ.क्र | कर्ज | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (ULBs) | | |
| a | रु.१५.०० लाखापर्यंत (वैयक्तिक) | ९०% | १०% | ६% | ७ वर्ष |
| b | रु.५०.०० लाखापर्यंत. (बचतगट/ जेआरजी/सहकारी संस्था) | | | ६% | ७ वर्ष |
| | खासगी/शहरी स्थानिक संस्थानी नियुक्त केलेले एजन्सी/कंत्राटदार | | | ८% | ७ वर्ष |
| रु.५०.०० लाखापर्यंतच्या योजनेअंतर्गत नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये १% सूट देण्यात येईल. | | | | | |
| **Concessional Loans to ULBS** | | | | | |
| c | रु.७५.०० लाखापर्यंत. | ९०% | - | ७% | ७ वर्ष |
| | (महानगरपालिका/नगरपालिका/जल प्राधिकरण/आरोग्य व तांत्रिक विभाग/ कंटोनमेंट बोर्ड/रेल्वे) | | | | |
| रु.७५.०० लाखापर्यंतच्या योजनेअंतर्गत नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये १% सूट देण्यात येईल. | | | | | |

**१०. स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना (SRMS)**

**(एनएसकेएफडीसी,नवी दिल्ली यांच्यामार्फत मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या बँक खात्यात प्रत्येकी रु.४०,०००/- इतकी रक्कमेचा लाभ मिळालेले मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स हे सदर योजनेस पात्र असतील.)**

| प्रकल्प श्रेणी | अनुदानाचा दर |
|---|---|
| **वैयक्तिक साठी** | |
| रु.५,००,०००/- पर्यंत | ५०% (प्रकल्प खर्च) |
| रु.५,००,०००/- ते रु. १५,००,०००/- | रु. २.५ लाख + उर्वरित प्रकल्प खर्चाच्या २५% |
| **गट प्रकल्पांसाठी** | |
| रु. ५०,००,०००/- पर्यंत (कमाल मर्यादा) प्रति लाभार्थी रु. १०,००,०००/- पर्यंत | जास्तीत जास्त रु. ३.७५ लाख प्रति लाभार्थी |

१. कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

२. व्याजदर ६ % आकारण्यात येते.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना (एन. एस. एफ. डी. सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळाची स्थापना केलेली असून या महामंडळाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे कार्यरत आहे. सदर महामंडळाच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची वाहिनीकृत पत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. केंद्रीय महामंडळाच्या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**अ) सुविधा कर्ज योजना** (**Suvidha Loan Scheme**) -

- प्रकल्प मर्यादा रु. १०.०० लाख.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ८% व्याज दराने आकारले जाते.
- त्यामध्ये रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सहभाग आहे.
- कर्जाची परतफेड ५ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ब) उत्कर्ष कर्ज योजना** (**Utkarsh Loan Scheme**) -

- प्रकल्प कर्ज मर्यादा रु. १०.०० लाख ते ५०.०० लाखा पर्यंत.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ९% व्याज दराने आकारले जाते.
- त्यामध्ये रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सहभाग आहे.
- कर्जाची परतफेड ७ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**क) सुक्ष्मपत पुरवठा योजना - (MCF)**

- प्रकल्प मर्यादा रु.१,४०,०००/- इतका आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ६.५% व्याज दराने दिले जाते.
- त्यामध्ये रु. ५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा समावेश आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षांमध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ड) महिला समृद्धी योजना- (MSY)**

- प्रकल्प मर्यादा रु. १,४०,०००/- आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ६% व्याज दराने दिले जाते.
- त्यामध्ये रु. ५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सामावेश आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षांमध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**इ) उच्च शैक्षणिक कर्ज योजना - (ELS)**

- एनएसफएसडीसी कर्ज योजनेअतंर्गत व्यवसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशाअंतर्गत कर्ज मर्यादा रु.३०,००,०००/- पर्यंतचे प्रावधान आहे व देशाबाहेर कर्ज मर्यादा रु.४०,००,०००/- चे प्रावधान आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज मर्यादा व्याज देशाअंतर्गत दर द.सा.द.शे. ५.५%, महिला करिता व पुरूषा करिता ६ % व्याज दर तसेच देशाबाहेरील व्यवसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता व्याज दर द.सा.द.शे. ६.५%, पुरूषा करिता व ६ % महिला करिता व्याज दर आकारावयाचा आहे.
- अर्जदाराच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली यांच्या योजना

## (एन.एस.के.एफ.डी.सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर,अस्वच्छ काम करणाऱ्या सफाई कामगारांचे व त्यांचेवर अवलंबून असलेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याकरिता राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे.त्यात विविध व्यवसाय करण्यासाठी रु. १५ लाख कमाल मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात येते.

**अ) मुदती कर्ज योजना - (टर्म लोन)**

अ) प्रकल्प मर्यादा रु. १५ लाख.

ब) केद्रींय महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जावर १०.०० लाखा पर्यंत ८% व १५.०० लाखापर्यंत ९% व्याज आकारले जातो.

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**आ) सुक्ष्मपत पुरवठा- (एम. सी. एफ.)**

या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येते. व्याजदर ७ % आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**इ) महिला समृद्धि योजना (एम.एस. वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प किमतीच्या १०% अर्जदाराचा सहभाग असतो. व्याज दर ६% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ई) महिला अधिकारिता योजना- (एम.ए.वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु.२,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणून घेण्यात येते. व्याजदर ७% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ५ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**उ) शैक्षणिक कर्ज (ई.एल.एस.)**

एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत व्यावसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्याकरीता रु. १०.०० लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे, तसेच देशाबाहेर रू.२०.००लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे. देशाअंतर्गत व्याजदर द.सा.द.शे. ६% व परदेशात व्याजदर द.सा.द.शे. ७% आकारावयाचा आहे. तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.

**ऊ) ग्रीन बिजनेस योजना (जी.बी.)**

| | | |
|---|---|---|
| अ) | प्रकल्प मर्यादा रु. ७.५० लाख पर्यंत | - व्याजदर ६% |
| | रु.७.५१ लाख ते रु.१५.०० लाखपर्यंत | - व्याजदर ७% |
| | रु.१५.०१ लाख ते ३०.०० लाखपर्यंत | - व्याजदर ८% |

ब) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

क) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ए) स्वच्छता उद्यमी योजना (एस.यु.वाय.)**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | प्रकल्प मर्यादा वैयक्तीक | - रु.१५.०० लाखापर्यंत | - व्याजदर ६% |
| | बचतगट /JRG/ सहकारी संस्था | - रु.५०.०० लाखापर्यंत | - व्याजदर ६% |
| | (तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.) | | |
| | खाजगी संस्था/स्थानीक स्वराज्य संस्थेशी संलग्न असलेले कंत्राटदार | -रु.५०.०० लाखापर्यंत | - व्याजदर-८% |
| | (तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. १% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.) | | |

ब) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

क) कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ऐ) पे अॅण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना (Pay & Use community Toilet Scheme)**

अ) प्रकल्प मर्यादा - रु.२५.०० लाखापर्यंत आहे.

ब) व्याजदर ८ % आकारण्यात येतो तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ओ) सॅनेटरी मार्ट (Sanitary Mart Yojana)**

अ) प्रकल्प मर्यादा - रु.१५.०० लाखापर्यंत आहे.

ब) व्याजदर ७ % आकारण्यात येतो तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**औ) स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना (SRMS)**

| प्रकल्प श्रेणी | अनुदानाचा दर |
|---|---|
| **वैयक्तिक साठी** | |
| रु. ५,००,०००/- पर्यंत | ५०% (प्रकल्प खर्च) |
| रु. ५,००,०००/- ते रु. १५,००,०००/- | रु. २.५ लाख + उर्वरित प्रकल्प खर्चाच्या २५% |
| **गट प्रकल्पांसाठी** | |
| रु. ५०,००,०००/- पर्यंत (कमाल मर्यादा) प्रति लाभार्थी रु. १०,००,०००/- पर्यंत | जास्तीत जास्त रु. ३.७५ लाख प्रति लाभार्थी |

१. कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

२. व्याजदर ६ % आकारण्यात येते.

सन १९७८ ते मार्च २०२४ पर्यंत महामंडळाने विविध योजनेअंतर्गत एकूण १०७५२६६ इतक्या लाभार्थ्यांना एकूण रुपये १,११,४०६.४१ लाख इतक्या रकमेचे कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

**१) महामंडळाची स्थापना –**

महाराष्ट्र शासनाने समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एमपीसी-१०८४/१५४७/(४०५)/ एससीपी-०१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ दिनांक ६ मार्च, १९८५ अनुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असुन भारतीय कंपनी कायदा, १९५६ साली रु. २.५० कोटीच्या भागभांडवला सहीत दिनांक ११ जुलै, १९८५ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

**२) महामंडळाचे भागभांडवल –**

महामंडळ स्थापनेच्या वेळी महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. २.५० कोटी निश्चित करण्यात आले होते. त्यात शासनामार्फत वेळोवेळी वाढ होऊन सध्या शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.४६/महामंडळे दिनांक ८ जून, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रक्कम रू. १०००.०० कोटी आहे.

महामंडळामार्फत भागभांडवल निधीतुन बीज भांडवल योजना एनएसएफडीसी, दिल्ली यांचे योजनेतील बीज भांडवल निधीचा हिस्सा, थेट कर्ज योजना इ. योजना राबविण्यात येतात. सन २०२४-२५ (३० जुन २०२४ पर्यंत) अखेर पर्यंत महामंडळास भागभांडवला अंतर्गत रु. ५७२.८४ कोटी निधी प्राप्त झालेला असुन त्यापैकी सुमारे रु. ५००.०० कोटी निधी विविध योजनांवर खर्च करण्यात आला आहे.

तसेच शासनामार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता रु. १००.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली असुन त्यापैकी रु. २०.०० कोटी निधी महामंडळास प्राप्त झालेला आहे.

**३) उद्देश –**

महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांपैकी संख्येने मोठ्या प्रमाणात असलेला मातंग समाज व तत्सम १२ पोटजाती यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कर्ज योजना राबवून त्यांना दारिद्र्य रेषेवर आणणे हा या महामंडळाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे. १२ पोटजाती पुढील प्रमाणे ➤मांग➤मदारी➤मातंग➤राधेमांग➤मिनी-मादींग➤मांग गारूडी➤मादींग➤मांग गारोडी➤दानखनी मांग➤मादगी➤मांग महाशी➤मादिगा.

**महामंडळामार्फत सद्या राबविण्यात येत असलेल्या योजना –**

**(१) महामंडळास प्राप्त होणाऱ्या विशेष केंद्रीय अर्थसहाय्याच्या निधितून राबविण्यात येत असलेल्या योजना**

**(अ) अनुदान योजना :** विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून अनुदान योजना राबविण्या येते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३,००,०००/- लाख पर्यंत आहे अशा कुटुंबातील अर्जदारांना रु. ५०,०००/- पर्यत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. एकूण मंजूर प्रकल्प रक्कमेमध्ये ५०% किंवा जास्तीत जास्त रु.१०,०००/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदान म्हणून दिली जाते. उर्वरित रक्कम बँकेकडून कर्जाचे रूपात वितरीत करण्यात येते.

**(ब) प्रशिक्षण योजना :** विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येते. मातंग समाजातील इयत्ता ४ थी. पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना वाहनचालक, वेल्डींग,मोटार मँकेनिकल, शिवणकाम, ब्युटीपार्लर, फिटर, रेडीओ/टिव्ही दुरुस्ती, सुतारकाम इ. व्यवसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थामार्फत दिले जाते. ज्यामुळे युवक/युवतींना स्वयंरोजगार मिळण्यास सोईस्कर होते.

**(२) बीजभांडवल योजना :** महामंडळास प्राप्त होणाऱ्या भागभांडवल निधीतून सदर योजना राबविण्यात येते. सदर योजना बँकेच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येत असून, रु. ७.०० लाख प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायाचे कर्ज प्रस्ताव बँकेकडे शिफारस करून मंजूर करण्यात येतात. यापूर्वी सदर योजना ही ७५ टक्के बँक, २० टक्के महामंडळ व ५ टक्के लाभार्थी रक्कम अशा स्वरूपात राबविण्यात येत होती. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एलएएसव्हीएम/प्रकल्प/परिपत्रक/४५-५०-५/२१०८/२०२३-२४ दि.१२.०६.२०२३ नूसार क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारस क्र.६०/२१ ची अंमलबजावणी करण्याकामी सदर योजनेमध्ये बदल करुन बँकेचा सहभाग ५० टक्के महामंडळाची बीजभांडवल रक्कम ४५ टक्के (रु. १०,००० अनुदानासह) व ५ टक्के लाभार्थ्यांचा सहभाग रक्कम अशा स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर योजनेस बँकेकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**(३) थेट कर्ज योजना** : महामंडळास प्राप्त होणाऱ्या भागभांडवल निधीतून सदर योजना राबविण्यात येते. यापूर्वी या योजनेची कर्जमर्यादा रु. २५,०००/- ऐवढी होती. तथापी एवढ्या कमी रकमेत सध्या महागाईच्या युगामध्ये कोणताही व्यवसाय करणे अशक्य होत असल्याने शासन निर्णय क्र. एलएएस-२०२२/प्र. क्र. ९४/महामंडळे/दिनांक ४/११/२०२२ अन्वये सदर योजनेची कर्ज मर्यादा रु.२५,०००/- वरुन रु. १,००,०००/- पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये ९५ टक्के रक्कम (रु. १०,०००/- अनुदानासह) भागभांडवलातून देण्यात येते व उर्वरित ५ टक्के रक्कम लाभार्थ्यांची असते.

**(४) लोहशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना** : मातंग समाजातील विद्यार्थ्याकरिता लोकशाहिर अण्णाभाऊ साठे प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. त्यामध्ये प्रतीवर्षी १० वी, १२ वी व पदवीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना १० वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या युवक-युवकांना पुढील शिक्षणणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून अनुक्रमे रु. १०००/-, रु. १५००/-, रु. २०००/- व रु. २५००/- याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येत होती.

त्यात वाढ करुन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार चालू आर्थिक वर्षापासून असून १० वी साठी रु. ५०००/-, १२ वी साठी रु. ७५००/- व पदवी व पदवीकांसाठी रु. १०,०००/- पदव्युत्तरसाठी रु. १२,५००/- प्रमाणे शिष्यवृत्ती रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. तसेच आगामी संचालक मंडळाच्या बैठकीत पुन्हा या रक्कमेमध्ये दुप्पट वाढ करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात येणार आहे.

**(३) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळ (NSFDC) यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून योजना राबविण्यात येतात.**

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळ (NSFDC) दिल्ली यांची महाराष्ट्रामध्ये अधिकृत वाहीनी म्हणून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळही सन १९९३ मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअंतर्गत महामंडाळामार्फत एनएसएफडीसी महामंडळाच्या सूविधा/मुदत कर्ज योजना लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक योजना या विविध योजना राबविण्यात येतात.

**(अ) सुविधा कर्ज/ मुदत कर्ज योजना –**

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायांकरीता एनएसएफडीसी मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत असलेल्या व्यवसायांकरिता मुदत कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्ज रक्कमेमध्ये ७५ टक्के हिस्सा एनएसएफडीसी महामंडळाचा असतो. २० टक्के हिस्सा महामंडळाचे भागभांडवल निधीतून (रु. १०,०००/- अनुदानासह) देण्यात येतो. उर्वरीत ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्यांची असते. सदर कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ५ वर्षे असते. एनएसएफडीसी च्या रक्कमेवर द.सा.द.शे ७ टक्के व महामंडळाच्या रक्कमेवर द.सा.द.शे ४ टक्के व्याज आकारण्यात येते.

**(ब) लघुऋण वित्त योजना** –

एनएसएफडीसी योजने अंतर्गत लघुऋण वित्त योजना सन २०००-०१ पासून राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत रु. १,४०,०००/-प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणामध्ये प्रती लाभार्थीस एनएसएफडीसी चे मूदत कर्ज रु. १,२५,०००/- व महामंडळाचे अनुदान रु. १०,०००/- व लाभार्थी सहभाग रु. ५०००/- असे एकूण रु. १,४०,०००/- च्या मर्यादेत लघुउद्योगाकरिता लाभ देण्यात येतो.

**(क) महिला समृद्धी योजना –**

महिला समृद्धी योजना (MSY) ही योजना सन २००४-०५ पासून महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत. सदर योजनेअंतर्गत रु. १,४०,०००/-प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणामध्ये प्रती लाभार्थीस एनएसएफडीसी चे मूदत कर्ज रु. १,२५,०००/- व महामंडळाचे अनुदान रु. १०,०००/- व लाभार्थी सहभाग रु. ५०००/- असे एकूण रु. १,४०,०००/- च्या मर्यादेत लघुउद्योगाकरिता लाभ देण्यात येतो. सदर योजना फक्त महिला लाथार्थीसाठी राबविण्यात येते.

**(ड) शैक्षणिक कर्ज योजना :**

मातंग समाजाच्या युवक युवतींना एनएसएफडीसी योजने अंतर्गत देशांत व परदेशांत उच्च शिक्षण घेण्याकरिता एनएसएफडीसी अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. देशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना रु. ३०,००,०००/- व परदेशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थींना रु. ४०,००,०००/- कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्जाची परत फेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिनेपासून अथवा नोकरी लागले पासून करावयाची असते.

**महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे स्वरुप**

**(अ) विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेतून राबविण्यात येत असलेल्या योजना -**

| अ.क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | बँकेचा हिस्सा | महामंडळाचे अनुदान | लाभार्थी हिस्सा | बँकेच्या रक्कमेवर व्याज | परतफेडीचा कालावधीही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुदान योजना | ५०,०००/- | ३,००,०००/- | ४०,०००/- | १०,०००/- | निरंक | नियमाप्रमाणे | ६० महिने |
| २ | प्रशिक्षण योजना | वि.के.अ एकूण प्राप्त निधीच्या १०% रक्कम खर्च करणे अपेक्षित | ३,००,०००/- | - | - | - | - | - |

**(ब) महामंडळाचे भागभांडवली अंशदानातून राबविण्यात येत असलेल्या योजना -**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | बँकेचा हिस्सा | महामंडळाचे बीज भांडवल हिस्सा | अनुदान रक्कम | लाभार्थी हिस्सा | बँकेच्या रक्कमेवर व्याज दर | महामंडळाच्या रक्कमेवर व्याज दर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | ५०,०००/- ते ७,००,०००/- | ३,००,०००/- | ५० टक्के | ४५ टक्के (अनुदानासह) | १०,०००/- | ५ टक्के | नियमाप्रमाणे | ४ टक्के | ४८ ते ६० महिने |
| २ | थेट कर्ज योजना | १,००,०००/- | ३,००,०००/- | ० | ८५,०००/- | १०,०००/- | ५,०००/- | - | ४ टक्के | ३६ महिने |

**(क) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना -**

मातंग समाजीतील प्रतीवर्षी इ.१० वी., १२ वी., पदवी, पदवीका व पदव्युत्तर परिक्षेत कमीत कमी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविण्याऱ्या विद्यार्थी व विद्यार्थींची जिल्हानिहाय प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत शिष्यवृत्ती एकदाच पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर दिली जाते हि योजना मुख्यमंत्री निधीतून महामंडळास मिळालेल्या २० लाख निधीच्या मिळणाऱ्या व्याजातून प्रतीवर्षी राबविण्यात येते. शिष्यवृत्ती-(१) १० वी.- रु. ५०००/-, (२) १२ वी.- रु. ७५००/-, (३) पववी व पदवीका- रु. १०,०००/-, (४) पदव्युत्तर- रु. १२,५००/-

**(ड) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना (NSFDC) -**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | NSFDC हिस्सा | महामंडळाचे बीज भांडवल हिस्सा | अनुदान रक्कम | लाभार्थी हिसा | NSFDC रक्कमेवर व्याज दर | महामंडळाच्या रक्कमेवर व्याज दर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुविधा कर्ज योजना | ५,००,०००/- | ३,००,०००/- | ७५ टक्के | २० टक्के (अनुदानासह) | १०,०००/- | ५ टक्के | ६ टक्के | ४ टक्के | ६० महिने |
| २ | लघुऋण वित्त योजना | १,४०,०००/- | ३,००,०००/- | ४०,०००/- | निरंक | १०,०००/- | निरंक | ५ टक्के | - | ३६ महिने |
| ३ | महिला समृद्धी योजना | १,४०,०००/- | ३,००,०००/- | ४०,०००/- | निरंक | १०,०००/- | निरंक | ४ टक्के | - | ३६ महिने |
| ४ | शैक्षणिक कर्ज योजना | अ) देशाअंतर्गत रु. ३० लाख ब) परदेशाअंतर्गत | ३,००,०००/- | ९० टक्के | निरंक | निरंक | १० टक्के | ७.५ टक्के | - | शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून अथवा नोकरी लागेपर्यंत |

## लेखाशिर्षानुसार कार्यक्रम अंदाजपत्रक २०२६-२०२७ साठी आवश्यक असलेला निधी

(रु. लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्ष | योजना | | कार्यक्रम अंदाजपत्रक २०२६-२०२७ प्रस्तावित निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २२२५ ०२७२ | विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजना | १) | २००.०० |
| | | | २) | २००.०० |
| | | | ३) | २००.०० |
| | | | ४) | ३५०.०० |
| | | | ५) | १५००.०० |
| | | | ६) | ०.०० |
| | | | ७) | ०.०० |
| | | | ८) | ०.०० |
| | | **एकूण (१)** | | **३२५०.००** |
| २ | ४२२५ ००२२ | बीजभांडवल योजना | १) | ०.०० |
| | | | २) | ६१००.०० |
| | | | ३) | १७००.०० |
| | | | ४) | १३५०.०० |
| | | | ५) | २२४२३.२० |
| | | | ६) | ०.०० |
| | | | ७) | ०.०० |
| | | | ८) | ०.०० |
| | | **एकूण (२)** | | **३१५७३.५०** |
| | | **एकूण (१)+(२)** | | **३४८२३.२०** |

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

मागील ०५ वर्षातील (सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ (३१-३-२०२४ अखेर) योजनानिहाय वाटपाचा तपशिल

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष प्राप्त निधी | साध्य लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजना(अनुदान/Subsidy) | २०२०-२०२१ | १०९११.०० | ०.०० | ५५६ | ११५.४७ |
| | | २०२१-२०२२ | १०९११.०० | ०.०० | ४७६ | ६१.५० |
| | | २०२२-२०२३ | ४५६७.७० | ०.०० | २४४ | ३५.६० |
| | | २०२३-२०२४ | ०.०० | ०.०० | २६५ | २८९.०६ |
| | | २०२४-२०२५ | ०.०० | ०.०० | ०.०० | ००.०० |
| | | **एकूण** | **००.००** | **००.००** | **००००** | **००.००** |
| २ | बीजभांडवल योजना | २०२०-२०२१ | ५००.०० | ०.०० | २०४ | १२२.६४ |
| | | २०२१-२०२२ | ५००.०० | ८८२४.०० | १४२ | ८९०९.२५ |
| | | २०२२-२०२३ | १००००.०० | २१००.०० | ११२ | ७१.३९ |
| | | २०२३-२०२४ | १००००.०० | ७०००.०० | ११३३ | १०३५.८३ |
| | | २०२४-२०२५ | ००.०० | ००.०० | ०००० | ००.०० |
| | | **एकूण** | **००.००** | **००.००** | **००००** | **००.००** |
| ३ | एनएसकेएफडीसी योजना | २०२०-२०२१ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२१-२०२२ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२२-२०२३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२३-२०२४ | ७.५० | ७.५० | १ | ७.५० |
| | | २०२४-२०२५ | ०.०० | ०.०० | ० | ०.०० |
| | | **एकूण** | **०.००** | **०.००** | **०** | **०.००** |

### सन १९८५-१९८६ ते २०२५-२०२६ (३१-३-२०२५ अखेर) अंतर्गत योजनानिहाय वाटपाचा तपशिल

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन | अर्थसंकल्पीय तरतूद रु. लाखात | प्रत्यक्ष प्राप्त निधी रु. लाखात | साध्य लाभार्थी रु. लाखात | खर्च रक्कम रु. लाखात |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजना | १९८५-१९८६ ते २०२४-२०२५ | ७५१३३.०० | १८०६१.२२ | १३३६३५ | १७०५४.६२ |
| २ | बीजभांडवल योजना | | ७९,०००.०० | ५७२८३.९८ | ३९०४० | ३८८०९.७४ |
| ३ | एनएसकेएफडीसी योजना | | १५३९८.३७ | १४५२३.९७ | २६४५० | १३७६७.०६ |
| | | **एकूण** | **१६९५३१.३७** | **८९८६९.१७** | **१९९१२५** | **६९६३१.४२** |

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
## बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५, वीर नरीमन रोड, मुंबई-४०० ००१.

**स्थापना :—**

महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना १ मे, १९७४ रोजी कंपनी कायद्या अंतर्गत करण्यात आलेली असून, शासनाच्या दिनांक २ जानेवारी, २००३ च्या निर्णयानुसार आता या महामंडळाचे नाव संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित असे करण्यात आलेले आहे. सदरचे महामंडळ अनुसूचित जातीतील चर्मकार समाज व त्यांच्या पोटजाती उदा. चांभार, ढोर, होलार, मोची इत्यादी यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास करून त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी स्थापन झाले आहे.

**उद्दिष्टे —**

खालील उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी महामंडळाची स्थापना :

(१) राज्यात चर्मोद्योगाचा विकास.
(२) अनुसूचित जातीमधील चर्मोद्योगातील कारागिरांचा विकास करणे.
(३) चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसित करणे.
(४) चर्मवस्तूंसाठी बाजारपेठेची निर्मिती.
(५) चर्मोद्योगास प्रोत्साहन देणे.
(६) राज्यातील चर्मोद्योग विकासासाठी चालना देणे.

**आर्थिक तरतूद —**

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.४६/महामंडळे दि. ८/६/२०२२ नुसार या महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा रु. ७३.२१ कोटी वरून रु. १०००कोटी इतकी वाढविण्यात आलेली असून वितरीत व भरणा भागभांडवल रु. ३२८.६१ कोटी इतके आहे. महामंडळाच्या भागभांडवलात १००% सहभाग महाराष्ट्र शासनाचा आहे.

**कर्मचारीवृंद —**

या महामंडळात एकूण १९८ मंजूर पदे असून त्यांपैकी सध्या महामंडळात एकूण ३६ कर्मचारी कार्यरत आहेत.

**कामकाजासंबंधी माहिती —**

महामंडळाची राज्यात चार उत्पादन केंद्रे आहेत :

(१) दर्यापूर, जि. अमरावती
(२) हिंगोली
(३) कोल्हापूर
(४) सातारा

**विक्री केंद्रे —**

महामंडळाची राज्यात बांद्रा (मुंबई), वाशी (नवी मुंबई), धुळे, जळगांव, सोलापूर व नांदेड येथे विक्री केंद्रे आहेत. या विक्री केंद्रामध्ये महामंडळाच्या उत्पादन केंद्रामध्ये उत्पादीत केलेली पादत्राणे, चर्मवस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येतात. तसेच लहान चर्मकार कारागिरांनी बनविलेल्या चर्मवस्तू व पादत्राणे सुद्धा विक्रीसाठी ठेवण्यात येतात.

**महामंडळाचे उत्पादन —**

महामंडळाचे उत्पादन केंद्रामध्ये सेफ्टी शूज, सॅन्डल, चप्पल, फॅन्सी शूज, जंगल बूट, डी. एम्. एस्. शूज, कंडक्टर कॅश बॅग, ऑक्सफर्ड शूज इत्यादी प्रकारचे उत्पादन केले जाते.

महामंडळाच्या सातारा येथील टॅनरी मधून कच्चा चामड्यापासून पक्के चामडे म्हणजे प्रेस सोल, बॅग टॅन पासून प्रेस सोल लेदर, बेल्टींग लेदर इत्यादी प्रकारच्या चामड्याचे उत्पादन करण्यात येते.

| ठिकाण | उत्पादन क्षमता | उत्पादित मालाचा तपशील |
|---|---|---|
| सातारा | १०,००० किलो | प्रेस सोल, बॅग टॅन, बी. जी. लेदर, लेदर चामडे उत्पादन |
| कोल्हापूर | २०,००० किलो | कोल्हापुरी चप्पल व क्रोम फोल्डींग चप्पलचे उत्पादन |
| दर्यापूर | १,००,००० जोड्या | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज, सेफ्टी शूज, फॅन्सी शूज उत्पादन |
| हिंगोली | ५०,००० जोड्या | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज, सेफ्टी शूज, फॅन्सी शूज उत्पादन |
| | आणि १२,००० नग | आणि कंडक्टर बॅग व ऑफीस बॅग उत्पादन |

**महामंडळाचे विशेष प्रकल्प**

**(१) जी. आय. इंडिकेशन —** महामंडळ कोल्हापूरी चप्पल करिता नोंदणीकृत प्रोप्रायटर व अधिकृत उपयोगर्ता असून महामंडळास जी. आय. इंडिकेशन प्राप्त झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कोल्हापूरी चप्पल उत्पादकांना संरक्षण व व्यवसाय वाढीस मदत मिळणार आहे.

**(२) कोल्हापूर प्रशिक्षण केंद्र —** कोल्हापूर येथे महामंडळाच्या भुखंडावर प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधण्यासाठी शासनाची मंजूरी मिळाली असून सदर प्रशिक्षण केंद्राचे भुमिपुजन करण्यात आलेले आहे. सदर शिक्षण व प्रशिक्षण केंद्र सीएफटीआय आग्रा व महामंडळाच्या विद्यमाने उभारण्यात येत आहे.

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ दिनांक ३१/०१/२०२६ अखेर रिक्त पदांचा आढावा

| वर्ग | पद | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| गट-अ | व्यवस्थापकीय संचालक | १ | १ | – |
| गट-अ | वि. स. मू. ले. | १ | १ | – |
| गट-ब | व्यवस्थापक | १ | ० | १ |
| गट-ब | कंपनी सचिव | १ | – | १ |
| गट-क | सह व्यवस्थापक | ३ | – | ३ |
| गट-क | उप व्यवस्थापक | ९ | – | ९ |
| गट-क | उच्च लघुलेखक | १ | – | १ |
| गट-क | कनिष्ठ लघुलेखक | २ | २ | – |
| गट-क | सहा. व्यवस्थापक | ६ | – | ०६ |
| गट-क | सहाय्यक | १८ | ८ | १० |
| गट-क | वाहन चालक | २ | – | २ |
| गट-क | तंत्र सहाय्यक | २ | – | २ |
| गट-ड | मिस्त्री | ४ | – | ४ |
| गट-ड | विक्री केंद्र प्रमुख/कुशल कामगार | ८ | ०२ | ६ |
| गट-ड | विक्रेता/अकुशल कामगार | २६ | ९ | १७ |
| गट-ड | शिपाई | १३ | ५ | ८ |
| गट-ड | पहारेकरी | ५ | १ | ४ |
| | **एकूण अ** | **१०३** | **२९** | **७४** |
| गट-क | जिल्हा व्यवस्थापक | ३० | – | ३० |
| गट-क | लेखापाल | ३५ | ०३ | ३२ |
| गट-क | वसुली निरिक्षक | ३० | ०५ | २५ |
| | **एकूण ब** | **९५** | **८** | **८८** |
| | **एकूण (अ व ब)** | **१९८** | **३७** | **१६१** |

## चर्मकार समाजासाठी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना

१ जुलै १९९६ पासून महामंडळाचे प्रशासकीय नियंत्रण उद्योग विभागाकडून समाज कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आले. अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या (चर्मकार, ढोर, होलार व मोची इ.) सामाजिक व आर्थिक विकासासाठी महामंडळाने कार्य करावे, यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना या महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. चर्मोद्योगाबरोबरच चर्मकार समाजाच्या सर्वांगीण विकासाचे कामही महामंडळ करीत आहे. शासन निर्णय क्र. चविम २००१/प्र. क्र. ९०/विघयो-२ दिनांक २ जानेवारी, २००३ द्वारे महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ या नावात बदल करून, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित असा नामविस्तार करण्यात आला. यापूर्वी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पातळीवर महामंडळाची स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे, या दोन योजना महामंडळाच्या विभागीय अधिकाऱ्यांमार्फत व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व विभागीय पातळीवर कार्यरत असलेल्या यंत्रणेमार्फतच योजनांची अंमलबजावणी करण्यात येत होती. ऑगस्ट, २००६ ते ऑक्टोबर, २००६ पर्यंत शासन आदेशानुसार महामंडळाने जिल्हा कार्यालयासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती रिडिप्लॉयमेंट द्वारे केली व कर्मचारी वर्ग प्राप्त झाल्यावर ऑक्टोबर, २००६ पासून म हामंडळाची नियमितपणे जिल्हा कार्यालये सुरू झाली असून महामंडळाच्या जिल्हा व विभागीय कार्यालयामार्फत योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार व मोची) आर्थिक दृष्ट्या दुर्बल व दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

**प्रादेशिक कार्यालये :** महामंडळाची प्रादेशिक कार्यालये मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातुर, अमरावती व नागपूर येथे आहेत.

**जिल्हा कार्यालये :** महामंडळाची जिल्हा कार्यालये महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी आहेत.

## महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची तपशीलवार माहिती

**(१) बीज भांडवल योजना :** रु. ५०,००१ ते रु. ५,००,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही योजनेसाठी बीजभांडवल योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजनेअंतर्गत रु. ५०,००१ पासून ते रु. ५,००,००० पर्यंतचा कर्ज पुरवठा प्रचलित व्याजदराने बँकेमार्फत करण्यात येतो. या योजने अंतर्गत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वतःचा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. त्या रकमेपैकी रु. १०,००० अनुदान म्हणून देण्यात येतात तर उर्वरित रक्कम ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बँकेस व महामंडळास ३६ ते ६० मासिक समान हप्त्यात एकाचवेळी करावयाची असते. या योजनेवर माहे जानेवारी २०२६ अखेर एकूण ४५१४ लाभार्थ्यांना रु. ३८७.५० लाख अनुदान व रु. ११५१.८९ लाख बीज कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**(२) ५० टक्के अनुदान योजना :** चर्मकार समाजाच्या कुटुंबातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु. ५०,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थ सहाय्य दिले जाते. या अर्थसहाय्यापैकी रु. १०,००० कमाल मर्यादेपर्यंत ५० टक्के कर्जाची रक्कम महामंडळ अनुदान म्हणून देते. उर्वरित ५० टक्के कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अथवा बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यांत बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणाऱ्या कर्जावर प्रचलित दराने व्याज आकारले जाते. माहे जानेवारी २०२६ अखेर अनुदान योजने अंतर्गत ३३१७७ लाभार्थ्यांना रु. २९०२.१४ लाखाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**(३) प्रशिक्षण योजना :** चर्मकार समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण फी व विद्यावेतन हे महामंडळामार्फत देण्यात येते. शासनाकडून प्राप्त झालेल्या विशेष केंद्रीय सहाय्याच्या निधीपैकी १० टक्के खर्च हा प्रशिक्षणासाठी उपयोगात आणला जातो.

माहे जानेवारी २०२६ अखेर प्रशिक्षण योजने अंतर्गत विशेष केंद्रीय सहाय्याच्या निधीतून रु. २३६.६८ लाखाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**(४) गटई स्टॉल योजना :** चर्मकार समाजातील व्यक्तीला जो ऊन, वारा व पावसात रस्त्याच्या कडेला बसून गटईचे काम करतो, त्याला यापासून संरक्षण मिळवण्यासाठी शासनाने गटई कामगारांना स्टॉल पुरविण्याची योजना सुरू केली आहे. सदरची योजना ही १०० टक्के अनुदान तत्वावर संचालक, समाज कल्याण, पुणे आणि लिडकॉम महामंडळ यांच्या संयुक्तरीत्या राबविली जाते.

सन २०२०-२०२१ पर्यंत एकूण रु. ८६.९५ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून २५१२७ लाभार्थ्यांना गटई स्टॉल योजने अंतर्गत गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे.

**केंद्र शासनाच्या योजना –**

**राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी, नवी दिल्ली), यांच्या योजना**

**१. मुदती कर्ज योजना :** सदर योजने अंतर्गत विविध व्यवसायांकरीता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. १ ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना मुदती कर्ज दिले जाते यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग ७५ टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर मुदती कर्ज योजने अंतर्गत ६४९६ लाभार्थ्यांना रु. ६७६३.७७ लाखाचे एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ७०८.८६ लाख व रु. १९३३.०० लाखाचे बीज कर्ज वाटप करण्यात आले.

**२. सूक्ष्म पत पुरवठा योजना :** या योजनेअंतर्गत चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. १४००००/- रक्कम इतके असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते. तसेच सुक्ष्म पत पुरवठा योजने अंतर्गत रु. १,०५,०००/- पर्यंत एन एस एफ डी सी कर्ज रु. ३१०००/- अनुदान व रु. ४०००/- लाभार्थी सहभाग असे एकूण १४००००/- रक्कम दिली जाते.

माहे जानेवारी २०२६ अखेर सुक्ष्म पत पुरवठा योजने अंतर्गत १२९५९ लाभार्थ्यांना अनुदान रु. १३०७.६५ लाख बीज कर्ज रुपये १.०५ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून २४३०.६० लाखाचे वाटप करण्यात आले.

**३. महिला समृद्धी योजना :** चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता निराधार अशा महिला लाभार्थींसाठी महिला समृद्धी योजने अंतर्गत ४ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. २५,००० इतके अनुदान असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते. तसेच

महिला समृध्दी योजनेअंतर्गत रु. १,०५,०००/- पर्यंत एन.एस.एफ.डी.सी कर्ज रु. ३१,०००/- अनुदान व रु. ४,०००/- लाभार्थी सहभाग असे एकूण रु. १४०,०००/- रक्कम दिली जाते. माहे  जानेवारी २०२६ अखेर महिला समृध्दी योजने अंतर्गत ५४०३ लाभार्थ्यांना अनुदान रु. ५६३.७६ लाख बीज कर्ज रुपये ०.२४ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून रु. १०२०.३५ लाखाचे वाटप करण्यात आले.

**४. शैक्षणिक कर्ज योजना :** या योजने अंतर्गत चर्मकार समाजातील विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता ''शैक्षणिक कर्ज योजना'' सन २००९-१० या आर्थिक वर्षापासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. भारतामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस रु. १०.०० लाख व परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २०.०० लाख पर्यंत कर्ज घेण्याची मर्यादा आहे. याकरीता लाभार्थ्यांच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थीचा ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहे त्यांचेकडून शैक्षणिक खर्चाबाबतचा अंदाजपत्रक घेण्यात येते. यामध्ये २० टक्के लाभार्थी सहभाग म्हणून घेतला जातो. यामध्ये पुरुषांकरिता ४ टक्के व्याज दर असून ३.५० टक्के महिलांकरीता व्याज दर आहे.

माहे जानेवारी २०२६ अखेर शैक्षणिक योजने अंतर्गत ९९ लाभार्थ्यांना बीज कर्ज रु. १.७७ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून रु. २९८.८० लाखाचे वाटप करण्यात आले.

**५. लघु व्यवसाय योजना :**

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरीता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर लघु व्यवसाय योजनेअंतर्गत १९० लाभार्थ्यांना रु. ७१२.५० लाखाचे एन.एस.एफ.डी.सी.यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ८०.९० लाखाचे बीज कर्ज रु. १२६.४० लाख वाटप करण्यात आले.

**६. महिला अधिकारीता योजना :**

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा ७५ टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर महिला अधिकारीता योजनेअंतर्गत १०१ लाभार्थ्यांना रु. ३७८.७५ लाखाचे एन.एस.एफ.डी.सी.यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ३८.७० लाख व रु. ७०.६० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

**७. सुविधा कर्ज योजना :**

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापासून पुढे गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जोते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग ९० टक्के महामंडळाचा सहभाग ५ टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर सुविधा कर्ज योजने अंतर्गत १ लाभार्थ्यांना रु. ९.०० लाखाचे एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ०.५० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, वरळी, मुंबई
## (सांकेतांक क्रमांक-२२२५ ४०७१)

अनुसूचित जाती/जमातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास करून राज्य शासनाला शिफारशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्र. समाआ, २००३/प्र. क्र. १७५/मावक-१, दिनांक १/३/२००५ अन्वये सदर राज्य अनुसूचित जाती/ जमाती आयोगाची स्थापना केलेली आहे.

**आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.**

१. अध्यक्ष-१ पद

२. अशासकीय सदस्य-४ पदे (विधी, सेवा, सामाजिक व आर्थिक विकास व नागरी हक्क संरक्षण)

**या शिवाय खालील अधिकारी पदसिद्ध सदस्य आहेत**.

(अ) प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,

(ब) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,

(क) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**सदर आयोगाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.**

१. अनुसूचित जाती/जमातीसाठी संविधान व राज्य शासनाकडून उपलब्ध सवलती व हक्कांसाठी तरतूदीप्रमाणे सद्यःस्थितीचा अभ्यास करणे व शासनास उपाय सुचविणे.

२. अनुसूचित जाती/जमातीच्या तक्रारीची चौकशी करणे.

३. अनुसूचित जाती/जमातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत भाग घेऊन शासनास सल्ला देणे व मुल्यांकन करणे.

४. अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ प्रमाणे दाखल प्रकरणांचा आढावा घेणे. पिडीत व्यक्तीस देण्यात येणाऱ्या अर्थ सहाय्याचा आढावा घेणे.

५. अनुसूचित जाती/जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी स्विकारणे व तपास करणे. अनुसूचित जाती/जमातीसंबंधी आरक्षण धोरणाचा आढावा घेणे.

६. शासनास अनुसूचित जाती/जमातीसाठी कल्याणकारी योजना संबंधी सल्ला देणे.

७. अनुसूचित जाती/जमातीच्या कल्याण, आरक्षण, संरक्षण, विकास संबंधी इतर बाबी राज्य शासनाकडून आलेल्या सूचनेवर कार्यवाही करणे.

८. अनुसूचित जाती/जमातीच्या यादीमध्ये जातीचा समावेश किंवा वगळण्यासाठी शिफारस करणे.

९. अत्याचार घडलेल्या घटनास्थळाला भेट देणे.

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी प्रत्यक्षपणे कोणतीही आर्थिक योजना आयोगाकडून राबविली जात नाही. तथापि ''२२२५४०७१-महाराष्ट्र राज्य अनुसूचीत जाती जमाती आयोग'' या लेखाशीर्ष सांकेतांकाखाली सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात आयोगातील अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, दूरध्वनी खर्च, प्रवास खर्च आणि इतर कार्यालयीन खर्च इत्यादींसाठी रु. ०.०० कोटी खर्च झाला असून २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु. ००.० कोटी एवढा नियतव्यय मंजूर झाला आहे. तसेच आयोगातील अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, कत्रांटी सेवेवरील खर्च, दूरध्वनी खर्च, प्रवास खर्च आणि इतर कार्यालयीन खर्च इत्यादी साठी सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरीता एकूण ०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

## महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई
## मंडळाची स्थापना

खादी व ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देऊन, त्याचे संघटन, विकास आणि विनियमन करण्यासाठी सन १९६० च्या मुंबई अधिनियम क्रमांक १९ मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० नुसार मंडळाची स्थापना करण्यात आली.

**प्रमुख कार्य**

(१) ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देणे, मार्गदर्शन करणे व मदत करणे.
(२) ग्रामीण कारागीरांना त्यांच्या राहत्या घरीच उद्योगांसाठी कर्ज व अनुदान योजनेचा लाभ मिळवून देणे.
(३) ग्रामिण कारागीरांना त्यांचे तांत्रिक कौशल्य वाढीसाठी मदत करणे.
(४) ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन देणे.
(५) कच्चा माल हत्यारे अवजारे खरेदीसाठी मदत करणे.
(६) कारागीरांनी उत्पादीत केलेल्या मालाला बाजार भाव मिळण्यासाठी प्रदर्शने, उभारून मदत करणे.
(७) ग्रामीण कारागीरांनी तयार केलेल्या मालाची विक्री होण्यासाठी जन जागृती करून कारागीरांनी तयार केलेल्या वस्तू वापरास प्रोत्साहन देणे.

मंडळामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील कुटुंबाची आर्थिक प्रगती साध्य करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विशेष घटक योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते. सदर योजनेसाठी अनुदान हे महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून प्राप्त होते.

विशेष घटक योजना ही महाराष्ट्र शासन समाज कल्याण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. एससीपी-१०८१/२४०४६/डी.३१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ दिनांक ३१ मार्च १९८२ च्या शासन निर्णया अन्वये अंमलात आलेली आहे.

विशेष घटक योजनेअंतर्गत अल्प उत्पन्न गटातील व दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील लाभार्थीसाठी जास्तीत जास्त ५०,००० पर्यंत बँकामार्फत कर्ज दिले जाते. या कर्जावर ५० टक्के अथवा रु. १०,००० यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान स्वरुपात दिली जाते.

तसेच विशेष घटक योजनेअंतर्गत लाभार्थींच्या कुटुंबाची उत्पन्न मर्यादा शहरी भागाकरिता रु. ५१,५०० व ग्रामीण भागाकरिता रु. ४०,५०० सन २०१३-१४ पासून निश्चित करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावास आवश्यक कागदपत्र खालीलप्रमाणे**

१. शाळा सोडल्याचा दाखला.
२. जातीचा दाखला.
३. उत्पन्नाचा किंवा दारिद्ररेषेखाली असल्याचा दाखला.
४. ग्रामपंचायत ओळखपत्र व नाहरकत दाखला.
५. आधारकार्ड व रेशन कार्ड.
६. अनुभव किंवा प्रशिक्षणाचा दाखला.
७. व्यवसायाचे जागेचा असेसमेंट उतारा.
८. भांडवली कर्जाचे (कोटेशन) दरपत्रक.

**कार्यपद्धती :**

१. मंडळाच्या तालुका बलुतेदार सहकारी संस्थामार्फत कारागिराचे अर्ज घेऊन जिल्हा कार्यालयास पाठवून जिल्हा कार्यालयाची शिफारस घेऊन सदर अर्ज बँकांकडे मंजुरीसाठी पाठविणे.
२. बँकांनी पाठविलेले प्रस्ताव मंजूर व वाटप केल्यानंतर बलुतेदार सहकारी संस्थेच्या सचिवामार्फत सदर कारागिरांकडून व बँकाकडून ५० टक्के अनुदान क्लेम तयार करून घेणे व जिल्हा कार्यालयांकडे अनुदान मागणी करणे.
३. सदर अनुदान मागणी प्रस्तावांनुसार जिल्हा कार्यालयांकडून मंडळाच्या मुख्य कार्यालयांकडे अनुदान मागणी केली जाते.
४. या संपूर्ण प्रक्रियेस १ महिन्याचा कालावधी लागतो.
५. या विशेष घटक योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क कार्यालय तालुका बलुतेदार सहकारी ग्रामोद्योग संस्थांची कार्यालये व मंडळाची जिल्हा कार्यालये.

सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षामध्ये ५००० लाभार्थीचे उद्दीष्ट ठेवले होते लाभार्थींची संख्या २१४७ होती व ५ कोटी इतका निधी प्राप्त झाले आहे.

## महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग

सफाई कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी, त्यांची मुक्तता व पुनर्वसन यासाठी महाराष्ट्र राज्यात असलेल्या विविध कल्याण योजनांच्या संस्थाकरिता, दिनांक १२/३/१९९८च्या शासन अधिसुचनेन्वये महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासनाच्या राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे.

सदरहू आयोगाची कार्ये आणि अधिकार खालीलप्रमाणे :–

महाराष्ट्र शासन राजपत्र, अ.सा. डिसेंबर १९९७/(भाग-४) प्रकरण ३ नुसार आयोग पुढील सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडतील.

(अ) सफाई कर्मचाऱ्यांचा दर्जा, त्यांना मिळणाऱ्या सुविधा आणि संधी या संबंधीच्या विषमता दूर करण्याकरिता कालबद्ध कृती करण्यासाठी राज्य शासनास विशिष्ट कार्यक्रमांची शिफारस करणे.

(ब) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्वसनाशी संबंधित कार्यक्रमांच्या व योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास आणि मूल्यमापन आणि अशा कार्यक्रमांचे व योजनांचे अधिक चांगले सुसूत्रीकरण व अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे.

(क) राज्य शासन आणि निम-शासकीय संस्था, तसेच प्राप्तानुदान संस्था यांच्या विविध आस्थापनांना भेट देणे व उक्त संस्थांची माहिती मिळविणे किंवा त्यांना सल्ला किंवा सूचना देणे.

(ड) विशिष्ट गाऱ्हाण्याबाबत तपास करणे आणि पुढील कामांची अंमलबजावणी राहिली आहे अशा प्रकरणांची स्वत: होऊन दखल घेणे.

(एक) सफाई कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही गटाशी संबंधित कार्यक्रम किंवा योजना.

(दोन) सफाई कर्मचाऱ्यांच्या हालअपेष्टा दूर करण्याच्या उद्देशाने घेतलेले निर्णय घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेल्या सूचना.

(तीन) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीकरिता उपाययोजना.

(चार) सफाई कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या कोणत्याही कायद्यातील तरतुदी व संबंधित प्राधिकरणाकडे किंवा राज्य शासनाकडे या बाबी नेणे.

(इ) सफाई कर्मचाऱ्यांना येणाऱ्या कोणत्याही अडचणी किंवा त्यांच्या नि:समर्थता विचारात घेऊन सफाई कर्मचाऱ्यांशी संबंधित कोणत्याही विषयावर राज्य शासनास नियतकालिका अहवाल पाठवणे.

(ई) राज्य शासन त्यांच्याकडे निर्देशित करील अशा कोणत्याही इतर बाबतीत कार्यवाही करणे.

(२) पोटकलम (१) अन्वयेची आपली कामे पार पाडतांना, आयोगाला राज्य शासन किंवा स्थानिक किंवा इतर निम-शासकीय प्राधिकरण यांच्याकडून त्या पोट-कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबींशी संबंधित असलेली माहिती मागविण्याचा अधिकार असेल.

सन २०१९ ते सन २०२० करिता या आयोगातील अध्यक्ष/उपाध्यक्ष/अधिकारी/शासकीय कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांचे वेतन, दुरध्वनी खर्च, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च इत्यादी साठी २.०० कोटी इतका नियतव्यय मंजुर करण्यात आला असुन आजतागयत प्रत्यक्ष निधी प्राप्त नाही मात्र सदरील झालेला खर्च मागील वर्षामधील शिल्लक निधीतुन करण्यात आला आहे.

सन २०२५-२६ या चालु आर्थिक वर्षा करिता दैनंदीन खर्च भागविण्याकरिता रु. ०.०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

## विशेष सहाय्य योजना

**(अ) राज्य पुरस्कृत योजना**

**(१) संजय गांधी निराधार अनुदान योजना:-**

या योजनेतंर्गत किमान १८ ते ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, दिव्यांगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा, घटस्फोट प्रक्रीयेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला, तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहीत स्त्री, तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो. या योजनेमध्ये दारीद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव असणे अथवा रुपये २१,०००/- पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न असणे आवश्यक आहे. या योजनेखाली पात्र लाभार्थ्यांना रुपये १५००/- दरमहा इतके अर्थसहाय्य दिले जाते.

**(२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना :-**

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेमधून दारिद्रय रेषेखालील यादीच्या कुटूंबात नांव असलेल्या अथवा रु.२१,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ६५ व ६५ वर्षावरील पात्र लाभार्थ्यांस दरमहा रु.१५००/- अर्थसहाय्य देण्यात येते.

**(ब) केंद्र पुरस्कृत योजना**

**(१) इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना:-**

दारिद्रय रेषेखालील ६५ वर्ष व त्यावरील सर्व व्यक्ती पात्र होतील. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेतील ६५ ते ७९ वर्ष वयोगटासाठी रु.२००/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतूनरु.१३००/- तर ८० वर्ष व त्यावरील व्यक्तींना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमधून रु.५००/- व याच लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतून रु.१०००/-असे एकूण रु.१५००/- दरमहा अर्थसहाय्य देण्यात येते.

**(२) इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या ४० ते ७९ वर्ष वयोगटातील विधवा महिला, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.३००/- व राज्य शासनाकडून विधवा लाभार्थ्यांना रु.१२००/- असे एकूण रु.१५००/- दरमहा अर्थसहाय्य देण्यात येते.

**(३) इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नोंद असलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांपैकी फक्त १८ ते ७९ वर्षाखालील वयोगटातील ८० टक्क्याहून जास्त दिव्यांगत्व असलेले किंवा एक किंवा एका पेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले किंवा बहू दिव्यांगत्व असलेल्या (दोन किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेले) व्यक्ती इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत निवृत्तीवेतन मिळण्यास पात्र असतात. या लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रु.३००/- व राज्य शासनाकडून रु.२२००/- असे एकूण रु.२५००/- दरमहा अर्थसहाय्य देण्यात येते.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांसाठी वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु.५०,०००/- इतकी आहे. तसेच सदरहू योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१५००/- वरुन रु.२५००/- इतके करण्यात आले आहे.

**(४) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना :-**

दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एक रकमी रक्कम रु.२०,०००/- चे अर्थसहाय्य देण्यात येते.

***

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (रुपये कोटीत)

| अ. क्र. | योजनेचे नाव | २०२५-२६ | | २०२६-२७ | |
|---|---|---|---|---|---|
| | | **लाभार्थी संख्या** | **मंजूर तरतूद** | **प्रत्यक्ष खर्च** | **अर्थसंकल्पिय तरतूद** |
| १ | संजय गांधी निराधार अनुदान योजना (सर्व साधारण) २२३५ ए २९४ | १०९७८७५ | १३२० | ११३६.६४ | ९००.०० |
| | संजय गांधी निराधार अनुदान योजना (अनु. जाती) २२३५ सी १३४ | २०५००० | २४० | २०३.८९ | २१३.७१ |
| | संजय गांधी निराधार अनुदान योजना (अनु. जमाती), २२३५ सी १६१ | ११५९२२ | १२० | १०७.४७ | १२०.०० |
| | **एकूण** (A) | **१४१८७९७** | **१६८०** | **१४४८** | **१२३३.७१** |
| २ | श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (सर्व साधारण) २२३५ ३११२ | २०९३३९४ | २४००.६७ | २००६.०९ | १५३० |
| | श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (अनु. जाती) २२३५ सी १४३ | ३४६६८८ | ४२५ | ३२१.१२ | ३५० |
| | श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (अनु. जमाती) २२३५ सी १७२ | २४०३६१ | २५० | २०९.६१ | २५०.०० |
| | **एकूण** (B) | **२६८०४४३** | **३०७५.६७** | **२५३६.८२** | **२१३०** |
| | **एकूण** C = (A + B) | **४०९९२४४** | **४७५५.६७** | **३९८४.८२** | **३३६३.७१** |
| ३ | इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना २२३५ ए ३०२ | ११३७४५६ | ४५० | १२.३६ | ४५०.०० |
| ४ | इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना २२३५ बी ०३१ | ८९००६ | ४५.०० | ३.४९ | ४५.०० |
| ५ | इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना २२३५ बी ०४९ | १०६४१ | ६.०० | ०.४८ | ६.०० |
| ६ | राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना २२३५ ३००५ | - | ५०.०० | ३.६१ | ५०.०० |
| | **एकूण** (D) | **१२३७१०३** | **५५१** | **१९.९४** | **५५१.००** |
| | **एकूण** E = (C + D) | **४०९९२४०** | **५३०६.६७** | **४००४.७६** | **३९१४.७१** |

## कर्मचारीविषयक गोषवारा सन २०२५-२०२६

## संजय गांधी निराधार अनुदान योजना

अधिनस्त पदांचा एकत्रित गोषवारा सन २०२५-२०२६

| अ. क्र. | संवर्ग | | पदांची वेतनश्रेणी | | पद संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन | ग्रेड पे | मंजूर पदे | कार्यरत पदे |
| १ | उप जिल्हाधिकारी | S-२० (५६१००-१२२५००) | १५६००-३९१०० | ५४०० | १ | १ |
| २ | तहसिलदार | S-१८ (४९१००-१५५८००) | १५६००-३९१०० | ५००० | ५२ | ४० |
| ३ | नायब तहसिलदार | S-१३ (३५४००-११२४००) | ९३००-३४८०० | ४२०० | ३३५ | २४० |
| ४ | उप लेखापाल | S-१३ (३५४००-११२४००) | ९३००-३४८०० | ४२०० | ३५ | २९ |
| ५ | अव्वल कारकून | S-१० (२९२००-९२३००) | ५२००-२०२०० | २८०० | ३३१ | ३१० |
| ६ | महसूल निरीक्षक | S-०८ (२५५००-८१०००) | ५२००-२०२०० | २४०० | ७ | ४ |
| ७ | लिपिक-टंकलेखक | S-०६ (१९६००-६३२००) | ५२००-२०२०० | १९०० | ३९७ | ३८५ |
| ८ | तलाठी | S-०८ (२५५००-८१०००) | ५२००-२०२०० | २४०० | ६८ | ४६ |
| ९ | शिपाई | S-०१ (१५०००-४७६००) | ४४४०- ७४४० | १३०० | ३७४ | ३६७ |
| | | | | **एकूण –** | **१६००** | **१४२२** |

## इंदिरा गांधी निराधार व भूमिहीन शेतमजूर महिला अनुदान योजना

अधिनस्त पदांचा एकत्रित गोषवारा सन २०२५-२०२६

| **अ. क्र.** | **संवर्ग** | | **पदांची वेतनश्रेणी** | | **पद संख्या** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | **वेतन** | **ग्रेड पे** | **मंजूर पदे** | **कार्यरत पदे** |
| १ | अव्वल कारकून | S-१० (२९२००-९२३००) | ५२००-२०२०० | २८०० | ३०० | २९४ |
| २ | लिपिक-टंकलेखक | S-०६ (१९६००-६३२००) | ५२००-२०२०० | १९०० | ३०० | २९० |
| | | | | **एकूण –** | ६०० | ५८४ |

# भाग-२
# समाज कल्याण विभाग

# १. संचालन व प्रशासन

१. समाज कल्याण आयुक्तालय हे पुणे येथे असून त्याचे प्रमुख आयुक्त आहेत. अति. आयुक्त, सहआयुक्त, उप-आयुक्त व सहाय्यक आयुक्त यांचे मदतीने ते काम करतात. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, नागपूर आणि अमरावती येथील प्रादेशिक उपआयुक्त त्यांच्या विभागातील राज्यशासनाच्या व केंद्र शासनाच्या योजना राबवितात. तसेच जिल्हा परिषदांकडील व इतर जिल्हा पातळीवरील योजनांच्या अंमलबजावणीवर ते देखरेख करतात. जिल्हा पातळीवरील योजना राबविण्याकरिता जिल्ह्याच्या कार्यालयामध्ये वर्ग–१ नियुक्त केलेले असून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केलेल्या योजनांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद चे पद प्रत्येक जि. प. कडे अस्तित्वात आहे.

२. घटनेच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार शासनाने सामाजिक न्याय विभागाकडील एकूण ४१ योजना जि. प. कडे हस्तांतरित केलेल्या आहेत त्यामुळे विभागाकडील राहिलेल्या योजना व जि. प. कडील हस्तांतरित केलेल्या योजनांचा आढावा घेऊन विभागीय, जिल्हा व जिल्हा परिषद स्तरांवर नव्याने कर्मचारी वर्गाचा आकृतिबंध शासन निर्णय क्र. सकआ–२०००/प्रक्र. २७१/का-२, दि. ४–११–२००० अन्वये निश्चित केलेला आहे व त्यामध्ये आता पदांच्या आढाव्याअंती शासन निर्णय दि. २७–२–२००४ अन्वये खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

**कार्यालयाचे नाव - प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग गोषवारा**

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| (१) | प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण | S-२३ : ६७७००-२०८७०० | ७ | ७ |
| (२) | सहायक संचालक (वित्त व लेखा) वर्ग-१ | S-२० : ५६१००-१७७५०० | ७ | ७ |
| (३) | समाज कल्याण अधिकारी गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० | ६ | ६ |
| (४) | लेखाधिकारी (गट-ब) | S-१६ : ४४९००-१४२४०० | ७ | ७ |
| (५) | सहाय्यक लेखाधिकारी | S-१५ : ४१८००-१३२३०० | ७ | ७ |
| (६) | निम्नश्रेणी लघुलेखक | S-१५ : ४१८००-१३२३०० | ७ | ७ |
| (७) | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | S-१४ : ३८६००-१२२८०० | ७ | ५ |
| (८) | समाज कल्याण निरीक्षक | S-१३ : ३५४००-११२४०० | ० | ० |
| (९) | प्रमुख लिपीक / सांख्यिकी सहाय्यक | S-१३ : ३५४००-११२४०० | ७ | ७ |
| (१०) | लघुटंकलेखक (विधीकक्ष) | S-८ : २५५००-८११०० | ६ | ६ |
| (११) | वरिष्ठ लिपीक / सांख्यिकी सहाय्यक | S-८ : २५५००-८११०० | २७ | २७ |
| (१२) | कनिष्ठ लिपीक | S-६ : १९९००-६३२०० | १४ | १४ |
| (१३) | वाहनचालक | S-६ : १९९००-६३२०० | ७ | ७ |
| (१४) | शिपाई | S-१ : १५०००-४७६०० | २७ | १९ |
| (१५) | पहारेकरी | S-१ : १५०००-४७६०० | ६ | ६ |
| (१६) | विधी अधिकारी गट-अ (कंत्राटी) | रु. ४००००/- दरमहा एकत्रितवेतनावर | ३ | ३ |
| (१७) | विधी अधिकारी गट-ब (कंत्राटी) | रु. ३२०००/- दरमहा एकत्रितवेतनावर | ३ | ३ |
| (१८) | जनसंपर्क अधिकारी ( कंत्राटी ) | रु. ३००००/- दरमहा एकत्रितवेतनावर | ६ | ६ |
| (१९) | पहारेकरी (कंत्राटी) | रु. ३०००/- दरमहा एकत्रितवेतनावर | १ | १ |
| (२०) | संगणक ऑपरेटर (कंत्राटी) | रु. १६०००/- दरमहा एकत्रितवेतनावर | ६ | ६ |
| | **एकूण सर्व विभाग** | | **१६१** | **१५१** |

## कार्यालयाचे नाव - सहाय्यक आयुक्त समाज कल्याण (सर्व)

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| (१) | सहाय्यक आयुक्त समाज कल्याण गट-अ | S-20 : ५६१००-१७७५०० | ३६ | ३६ |
| (२) | विशेष अधिकारी (शानिशा) | S-15 : ४१८००-१३२३०० | ३३ | ३३ |
| (३) | समाज कल्याण अधिकारी गट-ब | S-15 : ४१८००-१३२३०० | ४ | ४ |
| (४) | समाज कल्याण अधिकारी गट-ब (विजाभज) | S-15 : ४१८००-१३२३०० | १२ | ० |
| (५) | सहाय्यक लेखाधिकारी | S-15 : ४१८००-१३२३०० | ३६ | ३६ |
| (६) | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | ३४ | ३३ |
| (७) | कार्यालय अधिक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | ३६ | ३६ |
| (८) | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | S-14 : ३८६००-१२२८०० | १ | १ |
| (९) | समाज कल्याण निरीक्षक | S-13 : ३५४००-११२४०० | १७६ | १४५ |
| (१०) | प्रमुख लिपीक (मुंबई शहर व उपनगरासाठी) | S-13 : ३५४००-११२४०० | २ | २ |
| (११) | सहाय्यक सल्लागार | S-13 : २९२००-९२३०० | १ | १ |
| (१२) | वरिष्ठ लिपीक | S-8 : २५५००-८११०० | ७२ | ७० |
| (१३) | वरिष्ठ लिपीक / सांख्यिकी सहाय्यक (मुंबई उपनगरासाठी) | S-8 : २५५००-८११०० | १ | १ |
| (१४) | लघुटंकलेखक | S-8 : २५५००-८१८०० | ३५ | ३५ |
| (१५) | सहाय्यक निरीक्षक/कनिष्ठ लिपीक/ | S-6 : १९९००-६३२०० | १५० | १५० |
| (१६) | वाहनचालक | S-6 : १९९००-६३२०० | ३५ | ३५ |
| (१७) | शिपाई | S-1 : १५०००-४७६०० | ७२ | ७२ |
| (१८) | संगणक ऑपरेटर (कंत्राटी) | रु. १६०००/- दरमहा एकत्रितवेतनावर | ३५ | ३५ |
| | | **एकूण** | **७७१** | **७२५** |

## कार्यालयाचे नाव - जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद - सर्व गोषवारा

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| (१) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हापरिषद गट-अ | S-20 : ५६१००-१७७५०० | ३४ | ३४ |
| (२) | सहाय्यक लेखाधिकारी | S-15 : ४१८००-१३२३०० | ३४ | ३४ |
| (३) | कार्यालय अधिक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | ३४ | ३१ |
| (४) | समाज कल्याण निरीक्षक | S-13 : ३५४००-११२४०० | १७० | १२६ |
| (५) | वरिष्ठ लिपीक | S-8 : २५५००-८११०० | ६८ | ३९ |
| (६) | कनिष्ठ लिपीक | S-6 : १९९००-६३२०० | ३३ | ३३ |
| (७) | वाहनचालक | S-6 : १९९००-६३२०० | ३३ | ३३ |
| (८) | शिपाई | S-1 : १५०००-४७६०० | ९९ | ३५ |
| | | **एकूण** | **५०५** | **३६५** |

**कार्यालयाचे नाव - समाज कल्याण अधिकारी गट-ब**

| अ. क्र. | पदनाम | सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| (१) | समाज कल्याण अधिकारी गट-ब | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| (२) | प्रमुख लिपीक | S-13 : ३५४००-११२४०० | १ | १ |
| (३) | समाज कल्याण निरीक्षक | S-13 : ३५४००-११२४०० | २ | २ |
| (४) | शिवणकला निदेशक | S-8 : २५५००-८११०० | १ | १ |
| (५) | वरिष्ठ लिपीक | S-8 : २५५००-८११०० | १ | १ |
| (६) | कनिष्ठ लिपीक | S-6 : १९९००-६३२०० | ६ | ६ |
| (७) | सेवक | S-6 : १९९००-६३२०० | १ | १ |
| (८) | वरिष्ठ काळजी वाहक | S-3 : १६६००-५२४०० | १ | १ |
| (९) | शिपाई | S-1 : १५०००-४७६०० | २ | २ |
| | | **एकूण** | **१६** | **१६** |

३. वर नमूद केल्याप्रमाणे जि. प. कडील समाज कल्याण खात्याच्या कर्मचारी वर्गाचा नवीन आकृतिबंध निश्चित केल्यामुळे तेथील मागास प्रवर्गासाठी सध्याचा कर्मचारी वर्ग विचारात घेऊन जि. प. कडे राज्य शासनाकडील एकूण ३३० पदे वर्ग करण्यात आली आहेत. त्या पदावर प्रत्यक्षात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीने प्रतिनियुक्ती भत्ता न देता वर्ग करण्यात आले आहेत.

समाज कल्याण आयुक्तालयातील उपआयुक्त (लेखा) हे वेळोवेळी उपकार्यालयांची तसेच ज्या संस्थांना या खात्याकडून अनुदान दिले जाते अशा संस्थांची योजनावार होणाऱ्या खर्चाबाबतची तपासणी करीत असतात. उपकार्यालये व इतर संस्था ह्यांची दोन वर्षांच्या कालावधीत एकदा तरी तपासणी होणे आवश्यक आहे. तथापि, या कार्यालयातील उपआयुक्त व सहाय्यक आयुक्त आणि इतर अधिकारीवर्ग वेळोवेळी उपकार्यालयास तसेच संस्थांस तपासणीकरिता भेटी देत असतात. सदर तपासण्या पूर्णतया करणे सहसा शक्य होत नाही. नागरी हक्क कायदा, १९५५ च्या अंमलबजावणी करिता समाज कल्याण आयुक्तालय, पुणे या कार्यालयास एक खास यंत्रणा सन १९७८-७९ अखेरपासून मंजूर करण्यात आलेली आहे. सदर यंत्रणेने अस्पृश्यता निवारण कायद्याखाली येणाऱ्या योजनांची योग्य अंमलबजावणी करावयाची आहे. जिल्हापातळीवर, प्रत्येक जिल्ह्यासाठी १ अशा वर्ग १ मधील विजिसक अधिकाऱ्याच्या ३० राज्य स्तरावरील जागा डिसेंबर, १९८० पासून मंजूर करण्यात आलेल्या आहेत. वर्ग-१ मधील अधिकारी या विभागाच्या राज्य पातळीवरील सर्व योजनांचे काम पाहतात. त्यांना वर्ग-३ व वर्ग-४ सेवकवर्गही मंजूर करण्यात आलेला आहे.

४. आयुक्तालयाचे पत्र क्र.सकआ/आस्था/प्र.२/वर्ग-३ व वर्ग-४/पदवर्ग/इमावक/२०२५-२६/६८७ दिनांक १५.०४.२०२५ अन्वये मंजूर पदे व त्याचे वेतन श्रेण्या ७ वा वेतन आयोग (महाराष्ट्र नागरिक सेवा सुधारीत नियम २०१९) व महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेपुर/११२१/प्र.क्र.४/सेवा ९ दिनांक १३.०२.२०२३. नमुद करण्यात आलेल्या आहेत.

(२४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग

(24) Social Justice, Cultural Affairs and Special Assistance Department

(रक्कम रुपयांत/Amount in Rs.)

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | **समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे** | | | |
| १ | आयुक्त (भाप्रसे) | संवर्ग पद | १ | १ |
| २ | अतिरिक्त आयुक्त | S-27 : ११८५००-२१४१०० | १ | १ |
| ३ | सह आयुक्त | S-25 : ७८८००-२०९२०० | २ | २ |
| ४ | उपआयुक्त | S-23 : ६७७००-२०८७०० | ४ | ४ |
| ५ | शिक्षण उपसंचालक (शानिशा) | S-23 : ६७७००-२०८७०० | १ | १ |
| ६ | उपसंचालक (लेखा) | S-23 : ६७७००-२०८७०० | १ | १ |
| ७ | उपसंचालक (सांख्यिकी) (अर्थ व सांख्यिकी विभाग) | S-20 : ५६१००-१७७५०० | १ | १ |
| ८ | पोलीस उपअधिक्षक | S-20 : ५६१००-१७७५०० | १ | १ |
| ९ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण गट-अ | S-20 : ५६१००-१७७५०० | ४ | ४ |
| १० | संशोधन अधिकारी (नाहसं) | S-20 : ५६१००-१७७५०० | १ | १ |
| ११ | विशेष अधिकारी (निरीक्षण) | S-20 : ५६१००-१७७५०० | १ | १ |
| १२ | पोलीस निरीक्षक | S-18 : ४९१००-१५५८०० | ८ | ८ |
| १३ | स्वीय सहाय्यक गट-ब | S-17 : ४७६००-१५११०० | ३ | ३ |
| १४ | लेखाधिकारी (खर्चमेळ)/(कर्ज) | S-16 : ४४९००-१४२४०० | १ | १ |
| १५ | उच्चश्रेणी लघुलेखक | S-16 : ४४९००-१४२४०० | १ | २ |
| १६ | सिस्टीम ॲनालिस्ट (संगणक कक्ष) | S-16 : ४४९००-१४२४०० | १ | १ |
| १७ | उपअभियंता (बांधकाम) | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| १८ | विशेष अधिकारी (भासशि) | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| १९ | विशेष अधिकारी (शानिशा) | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| २० | विशेष अधिकारी (अ.नि.) | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| २१ | सांख्यिकी अधिकारी (विघयो) | S-15 : ४१८००-१३२३०० | १ | १ |
| २२ | सहाय्यक लेखाधिकारी | S-15 : ४१८००-१३२३०० | ३ | ३ |
| २३ | वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | १ | १ |
| २४ | कार्यालय अधीक्षक | S-14 : ३८६००-१२२८०० | ११ | ११ |

(२४) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग

(24) Social Justice, Cultural Affairs and Special Assistance Department

(रक्कम रुपयांत/Amount in Rs.)

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | | | |
| २५ | निम्नश्रेणी लघुलेखक | S-15 : ३८६००-१२२८०० | १ | १ |
| २६ | प्रमुख लिपीक | S-13 : ३५४००-११२४०० | १९ | १९ |
| २७ | समाज कल्याण निरीक्षक | S-13 : ३५४००-११२४०० | ३ | ३ |
| २८ | सांख्यिकी सहाय्यक (अर्थ व सांख्यिकी विभाग) | S-10 : २९२००-९२३०० | ३ | ३ |
| २९ | चित्रदर्शक | S-10 : २९२००-९२३०० | १ | १ |
| ३० | लघुटंकलेखक | S-8 : २५५००-८११०० | २ | २ |
| ३१ | वरिष्ठ लिपीक | S-8 : २५५००-८११०० | २५ | २५ |
| ३२ | कनिष्ठ लिपीक | S-6 : १९९००-६३२०० | ३८ | ३८ |
| ३३ | वाहन चालक | S-6 : १९९००-६३२०० | ७ | ७ |
| ३४ | उदवाहक | S-3 : १६६००-५२४०० | १ | १ |
| ३५ | दप्तरी | S-3 : १६६००-५२४०० | १ | १ |
| ३६ | नाईक | S-3 : १६६००-५२४०० | ६ | ६ |
| ३७ | पहारेकरी | S-3 : १६६००-५२४०० | २ | २ |
| ३८ | हवालदार | S-3 : १६६००-५२४०० | १ | १ |
| ३९ | शिपाई | S-1 : १५०००-४७६०० | ४३ | ४३ |
| ४० | सफाईगार | S-1 : १५०००-४७६०० | २ | २ |
| ४१ | माळी | S-1 : १५०००-४७६०० | १ | १ |
| ४२ | विधी अधिकारी- कंत्राटी | रु. ४००००/- दरमहा एकत्रित वेतनावर | १ | १ |
| ४३ | विधी सहाय्यक- कंत्राटी | रु. ३२०००/- दरमहा एकत्रित वेतनावर | २ | २ |
| ४४ | संगणक ऑपरेटर - कंत्राटी | रु. १६०००/- दरमहा एकत्रित वेतनावर | ४ | ४ |
| ४५ | जनसंपर्क अधिकारी - कंत्राटी | रु. ३००००/- दरमहा एकत्रित वेतनावर | १ | १ |
| | | **एकूण ...** | **२१६** | **२१७** |

## जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती

समाज कल्याण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांची जाती प्रमाणपत्र व जातीचे दावे तपासले जातात.

मा. सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ व सिव्हील अर्ज क्रमांक-५८५४/९४, कु. माधुरी पाटील यांच्या प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर वेळोवेळी समित्यांच्या कामकाजाचा भार लक्षात घेऊन विभागनिहाय एकूण १५ समित्या कार्यरत होत्या.

तथापि या समित्यांकडील कामाचा व्याप तसेच संबंधित उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत देता येणे शक्य व्हावे याकरिता अस्तित्वात असलेल्या १५ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या निरसीत करून शासन निर्णय क्रमांक-सकआ-२०१६/प्र. क्र. १२७/आस्था-२ दिनांक १ जून २०१६ अन्वये प्रत्येक जिल्ह्याकरिता जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

सदर जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकरिता खालीलप्रमाणे पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

| अ. क्र. | सध्याचे कार्यरत पदाचे नाव | वेतनश्रेणी | पदांची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | २०२४-२०२५ | २०२५-२०२६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती सर्व** | | | | |
| (१) | अध्यक्ष | S-27 : ११८५००-२१४१०० | ३६ | ३६ |
| (२) | उपआयुक्त तथा सदस्य जिल्हा जाती प्रामाणपत्र पडताळणी समिती | S-23 : ६७७००-२०८७०० | ३६ | ३६ |
| (३) | पोलीस उपअधिक्षक | S-20 : ५६१००-१७७५०० | ३६ | ३६ |
| (४) | संशोधन अधिकारी (जाप्रप) | S-20 : ५६१००-१७७५०० | ३६ | ३६ |
| (५) | पोलीस निरीक्षक | S-18 : ४९१००-१५५८०० | ३६ | ३६ |
| (६) | स्वीय सहाय्यक गट-ब | S-17 : ४७६००-१५११०० | १ | १ |
| (७) | उच्चश्रेणी लघुलेखक | S-16 : ४४९००-१४२४०० | ३५ | ३५ |
| (८) | वरिष्ठ लिपिक | S-8 : २५५००-८११०० | ३६ | ३६ |
| (९) | कनिष्ठ लिपिक | S-6 : १९९००-६३२०० | ३६ | ३६ |
| (१०) | पोलीस शिपाई | S-6 : १९९००-६३२०० | ३६ | ३६ |
| (११) | शिपाई | S-1 : १५०००-४७६०० | ३६ | ३६ |
| (१२) | विधी अधिकारी-कंत्राटी | कंत्राटी | १४ | १४ |
| | | **एकूण** | **३७४** | **३७४** |

जिल्हानिहाय जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या अध्यक्षांची पदे अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) किंवा सामाजिक न्याय विभागाच्या अधिपत्याखालील अतिरिक्त आयुक्त समाज कल्याण किंवा मंत्रालयीन विभागाच्या सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांमधून भरण्यास दिनांक १ जून २०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

# व्यसनमुक्ती व प्रचार

## व्यसनमुक्ती

**प्रस्तावनात्मक टिप्पणी :**

घटनात्मक तरतुदीतून सन १९५० साली महाराष्ट्र राज्याने संपूर्ण दारूबंदीचे धोरण स्वीकारले. दारूबंदी प्रचाराचे कार्य स्वातंत्र्यपूर्व कालापासूनच सुरू आहे.

देशामध्ये महाराष्ट्र राज्याने दारूबंदी प्रचार यंत्रणा १९४७ सालापासूनच सुरू करून नागरिकांना व्यसनमुक्तीसाठी उद्युक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी वेळोवेळी प्रचार यंत्रणेमध्ये प्रचलित माध्यमांचा व सुधारणांचा अंतर्भाव करण्यात आला. आता प्रत्येक जिल्ह्यात आवश्यक कर्मचारी नेमून प्रचार यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे.

सन १९६३ साली दारूबंदीसाठी नवीन धोरण स्वीकारण्यात आले. त्यासाठी कायद्यात थोडेसे शैथिल्य आणून प्रबोधनावर भर देऊन व्यसनमुक्ती साधण्याचे प्रयत्न सुरू झाले. परंतु तुटपुंज्या आर्थिक तरतुदीमुळे सन १९७१ पर्यंत व्यसनमुक्तीला फारसा उठाव प्राप्त झाला नाही. सन १९७४ मध्ये दारूबंदीसाठी स्वतंत्र संचालनालयाची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे आर्थिक तरतुदीमध्ये व प्रचार साहित्यामध्ये भरीव वाढ करता आली. त्याचबरोबर सेवाभावी संस्थांच्या मदतीने व्यसनमुक्ती कार्याची कक्षा रुंदाविण्यात आली.

२. सन १९९० ते १९९४ या कालावधीत दारूबंदी प्रचार शाखेची राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून सामाजिक न्याय विभाग, समाज कल्याण विभागाकडून महिला बाल कल्याण विभाग अशी संक्रमणे घडली. त्यामुळे दारूबंदी प्रचार विभागाच्या कार्यास गती प्राप्त होऊ शकली नाही. मात्र सन १९९४ पासून दारूबंदी प्रचार शाखा, सामाजिक न्याय विभागाच्या अधिनस्त कार्यरत झालेपासून वित्तीय बाबीमध्ये समाधानकारक वाढ करण्याचा प्रयत्न झाला आहे.

३. शासन निर्णय, क्र. सकआ-२०००/प्र. क्र. २८७/आस्था–२ दिनांक २५ जानेवारी, २००१ नुसार ह्या विभागाचे दारूबंदी प्रचारकार्य ऐवजी व्यसन मुक्ती कार्य असे नामाभिदान करून हा विषय जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आला.

शासन निर्णय, क्र. डीडीपी-२००१/प्र. क्र. ४१४/सुधार-२ दिनांक ५ डिसेंबर २००१ नुसार या विभागाची कार्यालये बंद करण्यात आली आणि अधिकारी/कर्मचारी यांना अतिरिक्त ठरविण्यात आले. आयुक्तालयात केवळ २ अधिकारी व ४ कर्मचाऱ्यांचा कक्ष कार्यरत ठेवण्यात आला असून, हा विषय जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद व मुंबई उपनगरासाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. डीडीपी-२००९/प्र. क्र. १४९/सुधार-१, दिनांक १७ ऑगस्ट २०११ अन्वये महाराष्ट्र राज्यात व्यसनमुक्ती धोरणाची अंमलबजावणी करण्यास मंजुरी दिलेली आहे.

भारताच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ४७ मध्ये सार्वजनिक आरोग्य व जनतेच्या आरोग्य रक्षणासाठी (औषधीय प्रयोजना व्यतिरिक्त) मादक पदार्थावरील बंदीचे मार्गदर्शन तत्व समाविष्ट केले आहे. भारत हा एक विकसनशील देश असून मनुष्यबळ ही त्याची संपत्ती आहे. सदर मनुष्यबळातील युवा शक्ती ही राष्ट्र शक्ती आहे. तथापि व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे राज्याच्या आणि राष्ट्राच्या युवा शक्तीचा ऱ्हास होत आहे. व्यसनामुळे सामाजिक स्वास्थ्य बिघडत आहे. मुख्यत्वे महिलांना अन्यायाला/अत्याचाराला सामोरे जावे लागते. व्यसनी व्यक्तीच्या मुलांच्या शारीरिक, मानसिक व शैक्षणिक जडणघडणीत त्याचा विपरीत परिणाम होतो. कायदा व सुव्यवस्थेवरही त्याचा गंभीर परिणाम होतो. व्यसनांचे संपूर्ण निर्मूलन करणे शक्य झाले नाही तरी अनेक व्यसने दारू पिण्यास प्राप्त झालेली सामाजिक प्रतिष्ठा नष्ट करणे व सदर व्यसनाला परिणामकारक आळा घालणे हे राज्याचे सामाजिक दायित्व असल्याने व्यसनमुक्ती धोरण जाहीर करण्यात आलेले आहे.

**४. केंद्रीय अनुदान योजना :** सेवाभावी संस्थामार्फत व्यसनमुक्ती व उपचार पुनर्वसन केंद्रे चालविणाऱ्या संस्थेला केंद्रीय अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेचे सनियंत्रणाचे काम आयुक्तालयात कार्यरत असलेल्या व्यसनमुक्ती कार्य कक्षा मार्फत सन २००१ पासून केले जाते.

**(अ) व्यसनमुक्तीसाठी स्वयंसेवी संस्थांचे कार्य :** नशाबंदी मंडळ, मुंबई – सदरील संस्था १९५० पासून कार्यरत असून सन १९९४ अखेर रु. ५.५२ लाख सालाना अनुदान देण्यात येत असे. सन १९९५ पासून सदरील संस्थेला रु. १०.०० लाख तरतूद दरवर्षीसाठी प्रदान करण्यात येत होती. नशाबंदी मंडळ हे व्यसनमुक्ती प्रचाराचे पूर्ण वेळ काम करणारे राज्यातील एकमेव मंडळ असून सदरील मंडळाकडे स्वतंत्र अशी जिल्हा पातळीवर पूर्ण वेळ काम करणारी यंत्रणा आहे.

सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. डीडीपी-२०१०/प्र. क्र. २६८/सुधार-१, दिनांक ९ नोव्हेंबर २०११ अन्वये, नशा बंदी मंडळ मुंबई या संस्थेस दरवर्षीप्रमाणे रु. ३०.०० लाख इतके अनुदान व्यसनमुक्ती प्रचार व प्रसारासाठी दिले जात आहे.

**(ब) व्यसनमुक्ती व प्रचार :** विभागामार्फत व्यसनमुक्ती पहाट अभियान सन १९९६-२००० असा कालबद्ध कार्यक्रम राज्यात संपन्न झाला. या कार्यक्रमांतर्गत विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते, लोककलावंत, सामाजिक संस्था यांच्या मार्फत साजरे होत आहे.

दरवर्षी व्यसनमुक्ती कार्य विभागाकडून समयबद्ध कार्यक्रम तयार करण्यात येतो.

| ३१ | अमरावती | ६२२५-०६१६ | ०.००० | ११०.००० | ११०.००० | १०१.००० |
| ३२ | अकोला | ६२२५-०६२५ | ०.००० | ५०.००० | ५०.००० | ५०.००० |
| ३३ | यवतमाळ | ६२२५-०६३४ | २५.००० | ०.००० | ०.००० | ०.००० |
| ३४ | बुलढाणा | ६२२५-०६४३ | १६०.००० | १६०.००० | १६०.००० | ८०.००० |
| ३५ | वाशिम | ६२२५-०६५२ | २.००० | ०.००० | ०.००० | २०.००० |
| ३६ | पालघर | ६२२५-०६६१ | १२०.००० | १२०.००० | १२०.००० | ७०.००० |
| | | **एकूण ...** | **९७४९.९२४** | **९७६२.०००** | **९७६२.०००** | **८६९१.०००** |

# समाज कल्याण विभागाच्या योजना

## समाज कल्याण

### पार्श्वभूमी

महाराष्ट्रात सर्वप्रथम १९३२ साली बॅकवर्ड क्लास वेलफेअर या नावाने समाज कल्याण खात्याची सुरुवात झाली. तद्नंतर या समाज कल्याण विभागातून वेळोवेळी खालीलप्रमाणे वेगवेगळी संचालनालय व आयुक्तालय स्वतंत्र करण्यात आली.

| अ. क्र. | वर्ष | संचालनालय/आयुक्तालय |
|---|---|---|
| १ | १९३२ | बॅकवर्ड क्लास वेलफेअर विभाग |
| २ | १९५६ | समाज कल्याण विभागांतर्गत समाज कल्याण संचालनालय, पुणे |
| ३ | १९७२ | आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक |
| ४ | १९९१ | महिला व बालविकास विभागांतर्गत महिला व बालविकास आयुक्तालय, पुणे |
| ५ | १९९९ | सामाजिक न्याय विभागांतर्गत दिव्यांग कल्याण आयुक्तालय, पुणे |
| ६ | २००० | सामाजिक न्याय विभागांतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, पुणे. |
| ७ | २०१७ | इतर मागास व बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे |

महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११,२३,७४,३३३ असून त्यामध्ये १,३२,७५,८९८ अनुसूचित जातीची लोकसंख्या आहे (जनगणना २०११) ज्याची मूळ लोकसंख्येशी टक्केवारी ११.८० एवढी आहे.

भारतीय घटनेचे कलम ४६ अन्वये केंद्र व राज्य शासनाने कल्याणकारी राज्याची भूमिका अंगीकारलेली असून घटनेचे कलम १६, १७, १९, २९.४६ अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इत्यादी दुर्बल घटकातील लोकांचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उत्थान करणे ही केंद्र व राज्य शासनाची अंगीकृत जबाबदारी आहे. याच कल्याणकारी राज्य व्यवस्थेंतर्गत वर उल्लेख केल्याप्रमाणे अनुसूचित जाती व इतर दुर्बल घटकाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याचे काम महाराष्ट्राचे सामाजिक न्याय विभागांतर्गत समाज कल्याण संचालनालयाद्वारे केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जाती, नवबौद्धांकरिता राज्य घटनेने बंधनकारक ठरविलेले आरक्षणाचे धोरण, शैक्षणिक संस्था व नोकर भरती बढतीमध्ये आरक्षण, तसेच अस्पृश्यता निर्मूलनाचे धोरणांतर्गत नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ व अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ अंतर्गत सामाजिक सुरक्षा राखण्याच्या दृष्टीने देखील समाज कल्याण विभाग प्रमुख समन्वयक विभाग म्हणून भूमिका बजावित आहे.



(रुपये लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | **मागासवर्गीय कल्याण व इतर योजना** | | | | | |
| १. | मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण योजना (शहरी + ग्रामीण) (२२१६ ०४५६) (२२१६ ११७६) | २०२२–२०२३ | ०.०१ | ०.०० | ... | शासन निर्णय, दिनांक २४-११-१९४९ अन्वये पी.डब्ल्यू.आर. २१९ चा नावाने मागासवर्गीय गृहनिर्माण योजनेची सुरुवात झाली. घराच्या बांधकाम खर्चात होणारी वाढ व उत्पन्नातील वाढ विचारात घेऊन शासनाने सदर योजनेत वारंवार सुधारणा केली असून आता शासन निर्णय, दिनांक १-४-१९९८ अन्वये योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. सदर योजनेंतर्गत २० टक्के लाभार्थ्यांचा सहभाग, ३० टक्के बांधकाम अनुदान व ५० टक्के वित्त संस्थांकडून कर्ज उभारणी संस्थेने करावयाची असून वार्षिक उत्पन्न रु. ५०,००० पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना बांधकाम अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात येते. तसेच या योजनेंतर्गत पात्र संस्थांना शासकीय जमीन उपलब्ध नसल्यास खाजगी जमीन खरेदी करण्यासाठी नगर रचना विभागाने त्या जमिनीची ठरविलेली किंमत किंवा प्रत्यक्ष खरेदीची किंमत यापेक्षा कमी असलेली रक्कम जमीन अनुदान म्हणून मंजूर केली जाते. या योजनेखाली लाभ घेण्यासाठी उत्पन्न, घराच्या बांधकामाची मर्यादा तसेच अनुदान याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे. |
| | | २०२३–२०२४ | ०.०१ | ०.०० | ... | |
| | | २०२४–२०२५ | ०.०१ | ०.०० | ... | |
| | | २०२५–२०२६ | ०.०१ | | | |
| | | २०२६-२०२७ | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | अनु. जाती व नवबौद्ध घटकांसाठी रमाई आवास योजना (शहरी व ग्रामीण) जुने लेखाशिर्ष (२२१६ २५४८) नविन लेखाशिर्ष (२२१६ ३३८४) जुने लेखाशिर्ष (२२१६ २५३९) नविन लेखाशिर्ष (२२१६ ३३९३) | २०२२–२०२३ | १२५०००.०० | १२५०००.०० | १४०० | |
| | | २०२३–२०२४ | १७९९९९.९९ | १७९९९९.९९ | ११५१४३ | |
| | | २०२४–२०२५ | १२९५००.०० | १११५००.०० | ६७३०७ | |
| | | २०२५-२०२६ | १११२३१.८३ | | | |
| | | २०२६-२०२७ | १२००००.०० | | | |

| अ. क्र. | उत्पन्न गट | उत्पन्नाची मर्यादा | बांधकाम खर्च मर्यादा | बांधकाम अनुदान | बिनव्याजी कर्ज |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट | रु. २५,००० पर्यंत वार्षिक | रु. ६०,००० (अ व ब वर्ग) | रु. १८,००० | रु. ६,००० |
| २ | अल्प उत्पन्न गट | रु. २५,००१ ते रु. ५०,००० वार्षिक | रु.१,००,००० अ<br>रु.८०,००० ब | रु.३०,०००<br>रु.२,४०० | रु.८,०००<br>रु.६,००० |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | रु. ५०,००१ ते रु. ७५,००० वार्षिक | रु.१,५०,००० अ<br>रु.१,००,००० ब | अनुज्ञेय नाही<br>अनुज्ञेय नाही | कोणतेही बिनव्याजी कर्ज मिळणार नाही. |
| ४ | मध्यम उत्पन्न गट | रु. ७५,००१ ते रु. ९५,००० | रु.१,५०,००० अ<br>रु.१,००,००० ब | अनुज्ञेय नाही<br>अनुज्ञेय नाही | कोणतेही बिनव्याजी कर्ज मिळणार नाही. |

राज्यातील अनुसूचित जाती व नावबौद्ध घटकांतील कुटूंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांचा स्वतःच्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर २००८ अन्वये रमाई आवास योजना कार्यान्वीत करण्यात आली आहे. त्यानंतर शासन निर्णय दिनांक ९ मार्च, २०१० नुसार सदर योजनेमध्ये सुधारणा करण्यात येऊन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २०१०-११ पासून ग्रामीण क्षेत्रासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व शहरी भागासाठी महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद/पंचायत समिती या स्थानिक यंत्रणांमार्फत सुरू आहे. सदर योजनेंतर्गत (ग्रामीण व शहरी) क्षेत्राचा सन २०१०-११ ते २०२४-२५ अखेर पर्यंत पूर्ण व प्रगतीपथावरील घरकुलांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| उद्दिष्ट्ये | मंजूर घरकुले | पूर्ण घरकुले | प्रगती पथावरील घरकुले |
|---|---|---|---|
| ११६७५६० | ८६९९४९ | ६९९३७८ | १६०६१४ |

तसेच शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग दिनांक ३०/९/२०१६ अन्वये रमाई आवास योजनेत सुधारणा करण्यात आली असून, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या ग्रामीण भागातील रु. १.२० लक्ष व शहरी भागातील रु. ३.०० लक्ष पर्यंत वार्षिक उत्पन्न मर्यादा असलेल्या लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ (SECC-२०११) प्राधान्यक्रम यादीच्या निकषाबाहेरील लाभार्थी निवड करण्यात येणार आहे. त्यानुसार सदर प्रक्रिया सन २०१६-१७ या वर्षापासून सुरू करण्यात आली आहे.

**(पुढील पानावर...)**

| अ. क्र.<br>१ | योजनेचे नाव<br>२ | वर्ष<br>३ | तरतूद<br>४ | खर्च<br>५ | लाभार्थी<br>६ | योजनेची संक्षिप्त माहिती<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | (१) रमाई आवास योजना (ग्रामीण) करिता २६९ चौ. फुट घरकुल बांधकामासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.१.२० लक्ष पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांसाठी प्रति घरकुल (रु.१२,००० हजार शौचालय बांधकामासह) अनुदान, साधारण क्षेत्र रु. १.३२ लक्ष व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रु. १.४२ लक्ष निश्चित करण्यात आले आहे.<br>(२) रमाई आवास योजना (शहरी) (महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद व नगरपंचायत क्षेत्र) करिता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) प्रमाणे ३२३ चौ. फुट घरकुल बांधकामासाठी वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ३.०० लक्ष पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांकरिता घरकुल बांधकामासाठी रु. २.५० लक्ष अनुदान निश्चित करण्यात आले आहे. |
| ३. | मोटार वाहन चालक प्रशिक्षण<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ सी ९५६)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी १३४)<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ०१८१)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी १०७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ०.०२<br>०.०२<br>०.०२<br>०.०२<br>०.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>...<br>... | राज्यामध्ये मोटार वाहन चालक प्रशिक्षण केंद्र जळगाव व नासिक या दोन जिल्ह्यांमध्ये खाजगी मोटार वाहन प्रशिक्षण संस्थांकडून अनु. जाती/नवबौद्ध मागसवर्गीय उमेदवारांना वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्यात येते. शा. नि. क्र. मावक–२००५ प्र. क्र. १४/मावक-२, दि. ४ फेब्रुवारी २००८ अन्वये योजनेची व्याप्ती राज्यस्तरावर वाढविणेत आलेली आहे.<br>अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील बेरोजगार युवकांना मोफत मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वावलंबी करणे व त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे. मागासवर्गीयांना व्यवसायिक संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात मोटार वाहन चालकाचे प्रशिक्षण मान्यता प्राप्त संस्थांकडून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१७/प्र.क्र.१३५/शिक्षण, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ नुसार सुधारित नियमावलीप्रमाणे सुरु करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील उमेदवारांना खाजगी ड्रायव्हिंग स्कूलमध्ये वाहन चालकाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थ्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परीक्षा घेऊन वाहन चालविण्याचा परवाना दिला जातो. प्रशिक्षण पूर्ण होऊन संबंधितांना परवाना मिळाल्यानंतर शासनाने विहीत केलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस अदा केली जाते.<br>प्रशिक्षणार्थी उमेदवार हे मोटार परिवहन अधिनियम तरतूदीनुसार वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, जातीचा दाखला इत्यादी अटींची पूर्तता करणारे असावेत. |
| ४. | अनुसूचित जाती व नवबौद्ध सैनिकी व पोलीस सेवा भरतीचे प्रशिक्षण देणे<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ३६७२)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी ११६) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १००.००<br>०.०१<br>०.०१<br>०.०१<br>०.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>... | महाराष्ट्र शासनाने सन २००५-०६ या वर्षापासून महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांना सैन्य व पोलीस भरतीसाठी लोकशिक्षणाचा अभाव असल्याने बऱ्याच वेळेस ते सक्षम असताना देखील त्यांना संधी मिळत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी सन २००५-०६ या वर्षापासून सदरहू योजना शासन निर्णय क्रमांक इबीसी-२००५/प्र. क्र. ७८/मावक-२ दिनांक ८/२/२००६ अन्वये सुरू करण्यात आलेली आहे. सदरहू प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिन्याचा राहील. सद्य स्थितीत सदर योजनेस शासन पत्र दि.२६/११/२०१९ नूसार स्थगिती देण्यात आलेली आहे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५. | शाहू, फुले, आंबेडकर दलित वस्ती सुधारणा अभियान<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ३३७८)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी ३१२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ०.०१<br>५००.००<br>५९५.००<br>०.०१<br>२००.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ... | राज्यातील मागासवर्गीय वस्त्यामध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचावण्या-साठी तसेच वस्त्यामध्ये स्वच्छता राहण्यासाठी तेथील रहिवाशांचा सहभाग वाढावा व सामाजिक विषमता नष्ट व्हावी म्हणून शासनामार्फत शाहू, फुले, आंबेडकर, दलित वस्ती सुधारणा व स्वच्छता-योजना कार्यान्वित असून या योजने अंतर्गत राज्यातील पंचायत समिती स्तरावरील पहिल्या ३ ग्रामपंचायतींना, जिल्हा स्तरावरील, महसूल सारावरील १ ग्रामपंचायतीस व संपूर्ण राज्यातील उत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना रोख स्वरूपात बक्षीसे देण्याचे निश्चित करण्यात आले. पंचायत समिती स्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस २५ हजार रुपये, द्वितीय ग्रामपंचायतीस १५ हजार रुपये आणि तृतीय ग्रामपंचायतीस १० हजार रुपये. जिल्हास्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस ५ लाख रुपये द्वितीय ग्रामपंचायतीस ३ लाख रुपये आणि तृतीय ग्रामपंचायतीस २ लाख रुपये विभागीय स्तरावर प्रथम येणाऱ्या एका ग्रामपंचायतीस १० लाख रुपये, राज्य स्तरावरील प्रथम ग्रामपंचायतीस २५ लाख रुपये, द्वितीय ग्रामपंचायतीस १५ लाख रुपये आणि तृतीय ग्रामपंचायतीस १२ लाख ५० हजार रुपये फक्त याप्रमाणे पारितोषिके देण्यात येतात. |
| ६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार योजना आणि अण्णाभाऊ साठे पुरस्कार/संत रोहिदास पुरस्कार<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ०९९६)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी ४१२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २२०.६६<br>७५.००<br>१७१.०२<br>२००००.००<br>२००००.०० | २२०.६६<br>७५.००<br>१७१.०२ | २९६ व्यक्ती<br>५५ संस्था | मागासवर्गीयांचे सर्वांगीण विकासाचे क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या संस्था व व्यक्तींना शासनामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देण्याची योजना सन १९७१ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये व्यक्तीस रुपये ७५,००० व संस्थेस रु. १,००,००० रोख, सन्मानपत्र, स्मृतिचिन्हे, शाल, श्रीफळ देवून गौरव करण्यात येतो. सन २०००-२००१ पासून ५१ व्यक्ती व १० संस्थांना पुरस्कार देवून गौरविण्यात येते. शा. नि. दि. १३-४-२०१२ नुसार सदरचा पुरस्कार दलित मित्रांऐवजी समाज भूषण पुरस्कार म्हणून प्रदान करण्यात येतो.<br>अण्णाभाऊ साठे पुरस्कारासाठी सन १९९७-९८ पासून शासनाने सुरूवात केली असून मातंग समाजाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या मातंग समाजातील कलावंत, साहित्यिक, समाजसेवक अशा एका व्यक्तीस पुरस्कार देवून गौरविण्यात येते.<br>सन १९९८-९९ पर्यंत फक्त ४ पुरस्कार देण्यात आलेले आहेत. सन २०००-२००१ पासून हे पुरस्कार २५ व्यक्ती व ६ संस्थांना देण्यात येतात. तसेच व्यक्तीस रु. ५१,००० व संस्थेस रु. १,००,००० रोख सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात येतो.<br>संत रोहिदास पुरस्कार दि. १६ जुलै २००४ पासून देण्यात येतो. राज्यातील चर्मकार समाज व इतर दलित समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना संत रविदास यांच्या जयंती दिनी दिनांक ६ फेब्रुवारी रोजी देण्यात येत असून सदर पुरस्कार १ व्यक्ती व १ संस्था यांना दिला जातो. व्यक्तीस ५१,००० रुपये व संस्थेस रुपये १,००,००० असे पुरस्काराचे स्वरूप आहे. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ७. | पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार (२२२५ ३१२६/जी ४०१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २३.४८<br>१०.००<br>३९.३२<br>१०.००<br>१०.०० | २३.४८<br>१०.००<br>३९.३२ | ४० व्यक्ती<br>१ संस्था | दिनांक १५ ऑक्टोबर २००१ ते दिनांक १५ ऑक्टोबर २००२ या कालावधीत पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली असून त्याचा एक भाग म्हणून त्यांच्या नावाने संपूर्ण महाराष्ट्रातून एक व्यक्ती रु. ५१,००० व एक संस्था रु. १,००,००० याप्रमाणे दरवर्षी पुरस्कार देवून गौरविण्यात येते व ही योजना कायमस्वरूपी राबविण्यात येत आहे. |
| ८. | शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार प्रदान करणे<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ३६६३)<br>नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ४०१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २५०.००<br>१५०.००<br>१७८.२८<br>१०.००<br>४४०.०० | ३५२.२४<br>१५०.००<br>१७८.२८ | ...<br>...<br>३२ संस्था | महाराष्ट्र राज्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांच्या सामाजिक न्यायाच्या क्षेत्रातील योगदानामुळे महाराष्ट्राचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर एक प्रगत सामाजिक सुधारणावादी राज्य म्हणून घेतले जाते. अशा सामाजिक न्यायाच्या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या संस्थांना महाराष्ट्रातील सर्वोच्च प्रतिष्ठेचा शाहू, फुले, आंबेडकर पुरस्कार देण्याचे शासनाने जाहीर केले. सदरचा पुरस्कार एकूण ६ विभागातील प्रत्येकी २ याप्रमाणे १२ संस्थांना प्रत्येकी रुपये ७.५ लाख याप्रमाणे पुरस्काराची रक्कम देण्यात येते.<br>सदर पुरस्काराचे वितरण सन २००५-०६ पासून दिनांक २६ जून (सामाजिक न्याय दिनी) रोजी केले जाते. |
| ९. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ३२४२)<br>नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ४३९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ५०.००<br>५०.००<br>१९५.४४<br>१००.००<br>५०.०० | १२५.१५<br>२२२.००<br>१९५.४४ | ...<br>५ संस्था | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार सामाजिक न्याय विभागांतर्गत उत्कृष्ट शासकीय/अनुदानित संस्थासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार देण्याचे दि. १३ ऑक्टोबर २००३ पासून निश्चित करण्यात आले. मागासवर्गीय मुलांमुलींना शिक्षणासाठी अधिकाधिक सोयी सवलती उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने शासकीय वसतिगृह अनुदानित वसतिगृह व आश्रमशाळा सुरू केल्या असून सदर संस्थेचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टिने व अधिक जोमाने काम करण्याच्या दृष्टिने शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार राज्यस्तरावर ३ पुरस्कार व विभागीय स्तरावर १ पुरस्कार देण्याचे निश्चित केले आहे. पुरस्काराची रक्कम विभागीय स्तरावर रु. १ लाख व राज्य स्तरावर प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे रु. ५ लाख, रु. ३ लाख, व रु. २ लाख इतकी रक्कम निश्चित करण्यात आली आहे. |
| १०. | सामाजिक न्याय निर्देशांक निर्मिती व उपाययोजना दिनांक २६ जून राजर्षी शाहू महाराज जन्मदिन म्हणून साजरा करणे<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ३३१३)<br>नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ४५७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ३०.००<br>३०.००<br>१५.९७<br>३०.००<br>३६.९० | २१.००<br>२५.०१<br>०.०० | ३६ संख्या | महाराष्ट्र शासनाने २००३-०४ या वर्षापासून ही योजना सुरू केली आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज सत्तेवर कार्यरत असताना आपल्या कार्य कालावधीतच सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सदैव दक्ष होते. समाजातील दुर्लक्षित मागासवर्गीय दुर्बल घटकांच्या प्रती त्यांचा दृष्टीकोन विशेष सहानुभूती व सुधारणावादी होता. त्यांनी मागासवर्गीय अपंग, वृद्ध, निराधार, दुर्बल इत्यादी घटकांच्या कल्याणार्थ अनेक निर्णय अमलात आणले. त्याचा आदर्श समाजापुढे विशेषत्वाने या दृष्टीकोनातून त्यांचा जन्मदिवस २६ जून प्रतिवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००२/प्र. क्र. १८६/मावक २ दिनांक २८/४/२००६ अन्वये महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ११. | अनुसूचित जाती व नव-बौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे. जुने लेखाशीर्ष (२२३५-३०५५) नवीन लेखाशीर्ष (NN २१००१५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ८०८१५.००<br>८३०७१.००<br>८८५०२.४३<br>८७८८२.७३<br>८६३३७.४४ | ८०८१४.००<br>८३०७१.००<br>८६२५७.०१ | ६७६१८<br>६७६१८<br>२०४४५ | ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या सामाजिक उन्नतीसाठी, मूलभूत गरज पुरविण्यासाठी सन १९७४ पासून ही योजना कार्यान्वित आहे. अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गाच्या वस्त्यांमध्ये प्राधान्यक्रमाने पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा व समाजमंदीर या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेंतर्गत ग्रामपंचायतीस अनुदान मंजुर करण्यात येते. दिनांक ५ डिसेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये दलित वस्ती ऐवजी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीच्या विकास करणे असा नावात बदल केलेला आहे. सदर योजनेंतर्गत शासन निर्णय दि.१३ एप्रिल, २०१७ नुसार अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत मंजूर निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत संबंधित यंत्रणेस उपलब्ध करुन दिला जातो. प्रत्येक अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात अनुज्ञेय असलेल्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यात तसेच '' संविधान सभागृहाचे बांधकाम करणे'' या कामाचा समावेश करण्यास शासन निर्णय, दि. ६ ऑक्टोबर,२०२१ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात निकषानुसार रुपये ४० लाख पर्यंत विविध कामांसाठी अनुदान मंजूर करण्यात येते. शासन निर्णय, दि. १६ डिसेंबर,२०२१ अन्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीची विकास करणे योजनेंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश करण्यात आला आहे. |
| १२. | नागरी हक्क संरक्षण अंतर्गत अधिनियम व योजना (राज्य + केंद्र) (२२२५ ०१७२) (२२२५ ०१६३) (२२२५ ०१५४) जुने लेखाशिर्ष (२२२५ ३१०८) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी २३२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १७५.७२<br>२२८.५०<br>२५९.८५<br>३०२.८४<br>२६९.०१ | ८४.१०<br>१२५.८०<br>१००.३४ | | समन्वयाने नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अन्वये अनु. जाती/जमातीवर होणाऱ्या अन्यायासाठी सहाय्य देण्यात येते तसेच नागरी हक्क संरक्षण अधिनियम कायद्याची लोकांना माहिती व्हावी योजनेचा प्रचार व प्रसिद्धी व्हावी म्हणून वत्कृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, खेडेगावाला बक्षिसे एकदिवशीय शिबीर इ. कार्यक्रम राबविण्यात येतात. दलित वस्त्यांमध्ये विविध योजनेद्वारे ग्राम-पंचायतीने उत्कृष्ट काम केले आहे. अशा ग्रामपंचायतींना प्रत्येक जिल्ह्यात दोन बक्षिसे देण्यात येतात. उक्त कार्यक्रमानुसार अस्पृश्यता निर्मुलनाचा प्रचार व प्रसिद्धी करण्यात येते. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १३. | अत्याचारांचे बळी ठरणारे अनु. जाती/जमातीचे कुटुंबातील सदस्यांना आर्थिक सहाय्य (केंद्र + राज्य) जुने लेखाशिर्ष (२२२५ २४४२) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी २९७) जुने लेखाशिर्ष (२२२५ २४५१) नविन लेखाशिर्ष (२२५ जी २८८) जुने लेखाशिर्ष (२२२५ ०६०१) नविन लेखाशिर्ष (२२५ जी ३०३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ८०२०.००<br>१००३०.००<br>१००२१.००<br>१००३०.००<br>१००२०.०० | २७९८.७५<br>५५८८.५०<br>७२७०.९० | | भारतीय घटनेनुसार अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राज्य व केंद्र शासन यांचे समन्वयाने अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ च्या अधिनियमाचे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी १९९५ चे नियमानुसार तसेच शासन निर्णय दि. २३/१२/२०१६ मधील परिशिष्ट अ १२(४) अन्वये पिडीतांना सदर पीडीत व्यक्तीस सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेमार्फत मा. जिल्हाधिकारी यांचे मंजूरीने अर्थसहाय्य व इतर सोई सुविधा प्रमाणकानुसार त्वरित देण्यात येतात. अत्याचाराचे खटले शीघ्रगतीने निकामी करण्यासाठी विभागीय स्तरावर सहा विशेष न्यायालये सुरू करण्यात आली आहेत. |
| १४. | आंतरजातीय विवाह करणारे जोडप्यांना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य (केंद्र + राज्य) जुने लेखाशिर्ष (२२२५ ०६७३) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ३९५) जुने लेखाशिर्ष (२२२५ ०६२८) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी २२३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ५२००.००<br>६२८०.००<br>६२८०.००<br>६२८०.००<br>४०४५.०९ | २७२८.००<br>१८५१.००<br>४२८३.०० | ५४५६<br>३६९६<br>० | समाजातील जातीभेद नष्ट करण्यासाठी व समाजात समता प्रस्थापित व्हावी याकरिता सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्याची योजना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमातीचे व्यक्तीपैकी एक व्यक्ती सवर्ण हिंदू, लिंगायत जैन, शिख यांचेतील असेल तर अशा आंतरजातीय विवाहीत जोडप्यास प्रत्येकी रु. १५,००० चे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येते. यामध्ये ५०% रक्कम संयुक्त नावाने अल्प बचतीमध्ये गुंतविण्यात येते. उर्वरित ५०% रक्कम संसारोपयोगी साहित्याकरिता देण्यात येते. शा. नि. क्र. अजवि-२००७/प्र. क्र. १९१/मावक-२, दि. १/२/२०१० अन्वये रु. १५,००० ऐवजी रु. ५०,००० चे अर्थसहाय्य मंजूर करण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | जुने लेखाशिर्ष (२२२५ २४६२) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी २१४) जुने लेखाशिर्ष (२२२५ २४३३) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ३८६) | | | | | |
| १५. | सामुहिक विवाह सोहळ्या- मध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यासाठी कन्यादान योजना.<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ३५३८) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ३२१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ५००.००<br>६००.००<br>६००.००<br>६००.००<br>२००.०० | ३४९.८०<br>४२०.००<br>३६०.०० | १४५७<br>१७५०<br>० | महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील (नवबौद्धांसह) आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबातील सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यास एकूण रु. १०,००० (रु. दहा हजार) इतके अर्थ सहाय्य वस्तुरूपाने देण्याचा निर्णय सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. शासन निर्णय दिनांक १५/१०/२०१६ व शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये सामूहिक विवाह सोहळ्याम ध्ये भाग घेणाऱ्या दांपत्यांना देण्यात येणाऱ्या अनुदान रु. २५,००० तसेच सामुहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रती पात्र जोडपे रु. ४,००० प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते यासाठी ३ महिन्याच्या आत विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, असे नमुद करण्यात आले. सदर योजने अंतर्गत प्रतिवर्षी प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जातीतील (नवबौद्धांसह) आर्थिकदृष्ट्या कमकुवत एकूण १०० जोडप्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. सामुदायिक सामुहिक विवाह सोहळ्यांसाठी क्रमांक कमी १० दांपत्यांचे विवाह एकाचवेळी संस्थेचे आयोजन करणे आवश्यक.<br>स्वयंसेवी संस्था/यंत्रणेने सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या मागासवर्गीय जोडप्यांची छायाचित्रे, विहित नमुन्यात अर्ज इत्यादी कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान १५ दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांचेकडे सादर करावी लागतात. |
| १६. | मुख्यमंत्री वयोश्री योजना<br>जुने लेखाशिर्ष (२२३५ १४३२) नविन लेखाशिर्ष (२२३५ डी ६६९) | २०२४-२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६-२०२७ | १२३६३.४<br>७५००.००<br>१७१३० | १२३६३.४<br>५६०० | ४१२११३<br>१८६६६६ | शासन निर्णय दि.०६/०२/२०२४ नुसार राज्यातील वय ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरीकांना त्यांच्या दैनंदिन जीवनातील सामाजिक स्थितीत जगण्यासाठी व त्यांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/उपकरणे खरेदी करणेकरीता, तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इत्यादी व्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी मुख्यंमत्री वयोश्री योजना राबविण्यात येते. सदर योजनअंतर्गत एकवेळ एकरकमी रु.३०००/- च्या मर्यादत ज्येष्ठ नागरिकांच्या आधार संलग्न वैयक्तिक बँक खात्यात थेट लाभ वितरिणा प्रणालीव्दारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येतात. योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्याचे वय ६५ वर्षे पूर्णसह लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रू.२ लक्ष च्या मर्यादित असणे आवश्यक आहे. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२३५ १४३२)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२३५ डी ७०२) | २०२४-२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६-२०२७ | ३०००.००<br>१५००.००<br>२५००.०० | ३०००<br>१८६.४७ | १६६८७ | शासन निर्णय दि.१४/०७/२०२४ नुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व धर्मियांमधील ६० वर्षे वय व ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी "मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना" राबविण्यात येत आहे. सदर योजनेअंतर्गत भारतातील तीर्थक्षेत्र-८८, महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र-१६१ या निर्धारित तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला एकवेळ लाभ रु.३००००/- च्या मर्यादित लाभ देण्यात येतो. योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे वय ६० वर्षे पूर्णसह लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२.५० लक्ष च्या मर्यादित असणे आवश्यक आहे. |
| १८. | वृद्ध व अपंग गृहे/मातोश्री वृद्धाश्रम योजना/राज्याचे ज्येष्ठ नागरिकांचे धोरण<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२३५ २७९८)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२३५ डी ७८५)<br>(२२३५ १४३२)<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२३५ २७८९)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ डी ७७६)<br>(२२३५ बी ३१६) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ११९०.०१<br>१५२६.००<br>१६८२९.४<br>१७१६.००<br>२०५०.०० | २९४.१०<br>६५६.९९<br>१६२९९.५५ | १४७८<br>२८२२<br>४३१०५ | '**वृद्धाश्रम योजना**' **(सर्वसाधारण वृद्धाश्रम)**:- अनाथ, निराधार, निराश्रित ज्येष्ठ नागरिकांचे जीवन जगणे सुसह्य व्हावे, त्यांना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा, म्हणून राज्य शासनाने दिनांक २० फेब्रुवारी १९६३ अन्वये वृद्धाश्रम ही योजना सुरु केलेली आहे. ही वृद्धाश्रमे स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदान तत्त्वावर चालविली जातात. आतापर्यंत शासन मान्यताप्राप्त २९ वृद्धाश्रमे अनुदान तत्त्वावर सुरू आहेत. या वृद्धाश्रमामध्ये निराधार निराश्रित व गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवेश देण्यात येतो. वृद्धाश्रमामध्ये प्रवेशितांना निवास, अंथरुण-पांघरुण, भोजन, वैद्यकीय सुविधा, मनोरंजनाच्या सोयी मोफत पुरविण्यात येतात. वृद्धाश्रमामध्ये ६० वर्षे वयावरील पुरुष व ५५ वर्षे वयावरील स्त्रियांना मोफत प्रवेश देण्यात येतो. प्रत्येक मातोश्री वृद्धाश्रमाची प्रवेशितांची मान्य संख्या २५ ते १०० इतकी आहे. तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ३/३/२०१९ नुसार प्रतिमहा प्रती वृद्ध रुपये १५००/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येते.<br>'**मातोश्री वृद्धाश्रम**' **योजना :-** 'वृद्धाश्रम' योजनेबरोबरच ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमामध्ये काही अधिकच्या सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, (उदा. बाग-बगीचा, वाचनालय, दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यासाठी सुविधा, बैठे खेळ इत्यादी.) म्हणून सर्व सोयींनी युक्त असे 'मातोश्री वृद्धाश्रम' ही योजना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन दिनांक १७ नोव्हेंबर, १९९५ रोजी स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरु करण्यात आली आहे. राज्यात सद्यस्थितीत '२३ मातोश्री वृद्धाश्रम' अनुदान तत्त्वावर सुरु असून प्रत्येक मातोश्री वृद्धाश्रमाची प्रवेशितांची मान्य संख्या १०० इतकी आहे. त्यामधील ५०% जागांवर शुल्क भरुन व ५०% जागांवर विनाशुल्क प्रवेश देण्यात येतो.<br>तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय दिनांक ६/३/२०१९ अन्वये सदर योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यात एकूण २३ वृद्धाश्रमांना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली आहे. तसेच प्रतीमहा प्रतीवृद्ध रक्कम रु.१५०० इतके परिषोषण अनुदान देण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असल्याने त्यांचे राहणीमान सुसह्य व्हावे, आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी व अधिकार यांची जाणीव समाजाला आणि त्यांच्या पाल्यांना व्हावी, म्हणून केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आई वडील, ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ या कल्याणासाठी अधिनियम, २००७ पारित केला आहे. हा अधिनियम महाराष्ट्रात दिनांक १ मार्च, २००९ पासून लागू करण्यात आला आहे.<br>सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने दिनांक ९/७/२०१८ च्या शासन निर्णयानुसार राज्याचे सर्वसमावेशक धोरणात्मक दिनांक ३०/९/२०१३ रोजी मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक ९/७/२०१८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद बाबींकरीता ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० किंवा त्यापेक्षा जास्त अशी करण्यात आली आहे.<br>राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ, नागरिकांच्या धोरणाबाबत झालेल्या शासन निर्णय दिनांक ९ जुलै, २०१८ नुसार संबंधित प्रशासकीय विभागाकडून ज्येष्ठ नागरिक योजनेसंबंधी कार्यवाही सुरु आहे.<br>तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत ज्येष्ठ नागरिक धोरण अंबलबजावणीसाठी विविध जाहिरातीव्दारे प्रचार व प्रसिध्दी करण्यात येते. |
| १९. | व्यसनमुक्ती प्रचार व कार्य व पुरस्कार (२२३५ १७५५) (२२३५ २८१३) (२२३५ ०१०४) जुने लेखाशिर्ष (२२३५ २८०४) नविन लेखाशिर्ष (२२२५ डी ७९४) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २४५५.०१<br>३३२०.०२<br>५४३१.४४<br>१०२५.९९<br>४२७६.९५ | ३४०.८०<br>७८९.८५<br>१६९८.२१ | ...<br>...<br>... | सन १९५० पासून दारुबंदीचा कार्यक्रम महाराष्ट्रात अंमलात आला. गृह विभागाच्या दारूबंदी उत्पादन शुल्क विभागाअंतर्गत सन १९९० पर्यंत आणि त्यानंतर १ ऑक्टोबर १९९० पासून आयुक्त, समाज कल्याण यांच्या आस्थापनेवर कार्यरत आहे. एप्रिल २००१ पासून ही योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आली आणि दिनांक ५/१२/२००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी असलेला कर्मचारी वर्ग दिनांक १/१/२००२ पासून अतिरिक्त ठरविण्यात आला व त्यासाठी कार्यरत असलेली कार्यालये बंद करण्यात येऊन हा विषय जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे प्रभावी अंम लबजावणीसाठी सुपूर्द करण्यात आलेला आहे. आयुक्तालयात २ अधिकारी व ४ कर्मचाऱ्यांचा एक कक्ष या योजनेच्या संनियंत्रणासाठी कार्यरत ठेवण्यात आलेला आहे. सन २०१२-१३ पासून व्यसनमुक्ती क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणाऱ्या सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, लोककलावंत, किर्तनकार, प्रवचनकार, लेखक, कवि, साहित्यिक, पत्रकार यांना प्रतिवर्षी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार देवून गौरविण्यात येते. |
| २०. | सांख्यिकी आधार सामुग्रीचे संगणकीकरण लेखा शीर्ष जुने लेखाशिर्ष (२२२५ २३३५) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी ३७७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ५००.००<br>५००.००<br>१४००.००<br>२०००.००<br>२००.०० | १४०.००<br>१५८.२५<br>७५६.७० | ...<br>...<br>... | शा. नि. क्र. सीओएम १००१/प्र. क्र. १७४/०१/३९ मुंबई दिनांक २९/१०/२००१ अन्वये सांख्यिकी आधार सामुग्रीचे संगणकीकरण योजना कार्यान्वित झालेली आहे. शासनाचे सामाजिक न्याय विभाग व त्यांचे अधिनस्त कार्यालयातील पेपरलेस पद्धत वापरण्याचे धोरण शासनाने अंगिकारले असून आयुक्तालय, सर्व क्षेत्रीय अधिकारी, यांना संगणक व त्या अनुषंगाने लागणारे साहित्य व संगणकोपयोगी साहित्यांचा पुरवठा या योजनेमधून करण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २१. | किरकोळ दुरुस्ती व लहान बांधकामे लेखा शीर्ष जुने लेखाशिर्ष (२२३५ १५१२) नविन लेखाशिर्ष (२२२५ डी ८०२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ६०.००<br>३१.६०<br>३.००<br>२०.००<br>२१.०० | २७.९९<br>३१.६१<br>०.०० | ...<br>...<br>... | शा. नि. क्र. जेडीई/११५५/एन दिनांक १३ जून १९५७ अन्वये किरकोळ दुरुस्ती व लहान बांधकामे यांना मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे. सदर योजने अंतर्गत आयुक्तालयाच्या नव्या इमारतीचे किरकोळ दुरुस्तीचे काम मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे मार्फत व जुन्या इमारतीचे किरकोळ दुरुस्तीचे काम मा. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण) जि. प. पुणे यांचेकडून करण्यात येते. सदरील दोनही विभागाकडे शासनाकडून उपलब्ध असलेल्या तरतुदीमधून खर्च भागविण्यात येतो. तरतूद उपलब्ध नसल्यास लेखा शीर्ष २२३५-१५१२ या लहान बांधकामे, किरकोळ दुरुस्ती यावर उपलब्ध तरतुदीमधून रक्कम खर्च करण्यात येते. |
| २२. | तृतीयपंथीय व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजना २२३५ सी १९९ (सहाय्यक अनुदाने) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १०००.००<br>१५००.००<br>२५००.००<br>१५००.००<br>३०००.०० | ४८६.००<br>२२.७७<br>३२.११ | ...<br>...<br>... | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय दिनांक १३ डिसेंबर, २०१८ व दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० नुसार राज्यस्तरावर मा. मंत्री सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली, तसेच विभागीय स्तरावर मा. विभागीय आयुक्त (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली तृतीयपंथीय हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळाची स्थापना केली आहे. शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० नुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये तृतीयपंथीयांच्या समस्यांच्या/तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली आहे.<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून तृतीयपंथीय घटकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्याची कार्यवाही सुरु आहे. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून तृतीयपंथीय व्यक्तींसाठी राष्ट्रीय पोर्टल सुरु करण्यात आले आहे. सदर पोर्टलवर तृतीयपंथीय व्यक्तींना प्रमाणपत्र व ओळखपत्र उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>महाराष्ट्र राज्याचे तृतीय पंथीयांसाठीचे धोरण शा.नि.दि. ११/३/२०२४ नुसार जाहिर केले आहे. |
| २३. | शिक्षण व इतर योजना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना (१००% केंद्र पुरस्कृत) (२२२५ ०४९५) (२२२५ ०३५२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १६००००.००<br>१६००००.००<br>७००००.०१<br>७००००.०१<br>७५०००.०१ | ६९८४८.९६<br>६६२१७.४८<br>६९२५१.०४ | ४५१०५०<br>३८८६९७<br>२८८४८५ | १. या योजनेखाली अभ्यासक्रमाच्या वर्गीकरणानुसार अनु. जाती (नवबौद्धसहित) व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात न राहता शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनींना दरमहा रु. २५० ते ७०० या दराने निर्वाह भत्ता देण्यात येतो. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे दर रु. ४०० ते १,३५० असे आहेत. या योजने अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न रु. २,५०,००० पर्यंत आहे त्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते. सन २०११-१२ पासून इ. स्कॉलरशीपद्वारे विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता संगणक प्रणालीद्वारे त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत होती. सदर योजना सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल द्वारे राबविण्यात येते.<br>२. सदरहू योजना शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% या प्रमाणात राबविण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४. | मॅट्रीकोत्तर शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (२२२५ ०३८८) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २,७५,००.००<br>३००००.००<br>३२५००.००<br>४१५००.००<br>४२५००.०० | ३१९२४.९८<br>४०६५८.३८<br>३२४९९.९९ | ३८३५६<br>४३८०५<br>२५३६४ | अनुसूचित जातीतील ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. २,५०,००० पेक्षा जास्त आहे त्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नसल्याने त्यांना शैक्षणिक लाभ मिळण्याच्या दृष्टीने त्या त्या स्तरावरील मान्यता प्राप्त अभ्यासक्रमानुसार शिक्षण विभागाने निर्धारित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती महाविद्यालयांना केली जाते. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण शुल्क समितीने निर्धारित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्काचे प्रतिपूर्ती महाविद्यालयांना केली जाते. सदर योजना सन २०१८-१९ पासून महाडीबीटी पोर्टल द्वारे राबविण्यात येते. |
| २५. | माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती (२२२५ ०३६१) (२२२५ ०५३९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ६३.०१<br>१४२.४३<br>११०.९४<br>१०७.४० | ६४.२६<br>४२.७२<br>११०.९४ | ८४०१<br>५३४०<br>१३८६८ | अनुसूचित जातीतील इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक इयत्तेमधून गुणानुक्रमांकाने प्रथम येणाऱ्या २ विद्यार्थ्यांना या योजनेखाली शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. इयत्ता ५ वी ते ७ वी रु. ५० दरमहा (१० महिन्यांसाठी फक्त), इयत्ता ८ वी ते १० वी रु. १,०० दरमहा (१० महिन्यांकरिता) ही शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे.<br>शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव विचाराधिन आहे. |
| २६. | महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मॅट्रीकपुर्व शिक्षण फी, परीक्षा फी. (२२२५ ०५३९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ८४.००<br>१५२.३२<br>९६.२२<br>१२०.८५ | ६८.५७<br>४५.६९<br>९६.२२ | ४५७१<br>३०४६<br>६४१४ | मान्यता प्राप्त सर्व स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे वय व उत्पन्न विचारात न घेता शिक्षण फी, परीक्षा फी शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे संस्थेला प्रदान करण्यात येते. ही योजना जिल्हा परिषदेमार्फत सध्या राबविण्यात येत आहे. तसेच खाजगी विना अनुदानित व कायम अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनु. जाती, विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून दरवर्षी १० महिन्यांचे कालावधीकरिता रु. १,०० व १,५०/रु. २,०० दरमहाप्रमाणे करण्यात येते. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे. |
| २७. | इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती (२२२५ ०५३९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ५०.४०<br>१०३.८५<br>२४४.५८<br>१८४.१० | ४८.७५<br>३१.१५<br>२४४.५८ | ८१४७<br>५१९१<br>४०७६२ | मागासवर्गीय मुलींमध्ये प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येत असल्यामुळे ते कमी व्हावे म्हणून इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व मागासवर्गीय मुलींना दरमहा रुपये ६० प्रमाणे १० महिन्यांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सदर योजना दिनांक १२ जानेवारी १९९६ पासून सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी उत्पन्नाची किंवा गुणाची अट नसून शाळेत उपस्थिती ही एकच अट ठेवण्यात आलेली आहे. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| २८. | इयत्ता ८ वी ते १०वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना (२२२५ ३४६७) (२२२५ ३८६१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ०<br>०<br>०<br>०<br>० | ०<br>०<br>० | ...<br>... | शासन निर्णय, इबीसी-२००३/प्र. क्र. ११६/ मावक-२, दि. २३ मे २००३ अन्वये मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना शासन निर्णय, दिनांक १२ जानेवारी १९९६ अन्वये सन १९९५-९६ पासून सुरू करण्यात आली. ही बाब लक्षात घेऊन याच धर्तीवर इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार दरमहा रुपये १०० याप्रमाणे १० महिन्यांसाठी शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत दिली जाते. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे. |
| २९. | साफसफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती (राज्य + केंद्र) (२२२५ ०५०१) जुने लेखाशिर्ष (२२२५ ३०३७) नविन लेखाशिर्ष (जी १९९) (२२२५ ०४०३) जुने लेखाशिर्ष (२२२५ ३०४६) नविन लेखाशिर्ष (जी २०५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ८१५.२३<br>१०.००<br>५९२.४९<br>२३७५९.००<br>५००.०० | ६३६.६३<br>९६.९०<br>५९२.११ | ...<br>५९३९<br>४२२९४ | मेहतर व्यवसाय, कातडी कमावणे हे व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिक्षण घेता यावे या उद्देशाने दिनांक ४ ऑक्टोबर, १९७७ पासून शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरू केलेली असून यासाठी केंद्र आणि राज्य यांच्यामार्फत ४० टक्के राज्य व ६० टक्के केंद्र याप्रमाणात खर्च करण्यात येतो. यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नसून पालकांचे अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना असे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक नाही. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे.<br>शासन निर्णय क्र. इबीसी-२०१३/ प्र. क्र. १९१/ शिक्षण-१, २७ ऑगस्ट २०१४ अन्वये कचरा गोळा करणे / उचलणे हा व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या मुलांचा समावेश सदर योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये करण्यात आला आहे. शानि क्र.इबीसी-२०२२/प्र.क्र १४६/शिक्षण-१ दि.२०/०२/२०२४ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सूचना लागू करण्यात आल्या आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३०. | औद्योगिक प्रशिक्षण संस्था मधील मागासवर्गीय प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन प्रदान करणे.<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ३०२८)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी १८१)<br>(२२२५ ०३७९)<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ३०४६)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी २०५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ०.०२<br>१२७.२६<br>१७३.३०<br>२३९.५७<br>३८४.७५ | ७.४७<br>८६.९५<br>१७३.३० | ...<br>११८८<br>१७३ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाकडे वळविण्याकरिता औद्योगिक शिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या प्राचार्यामार्फत विद्यावेतन अदा करण्यात येत असून सदरहू योजना १९७२-७३ पासून सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत तांत्रिक शिक्षण विभागाकडून दरमहा रु. ६० व समाज कल्याण विभागाकडून रु. ४० पुरक विद्यावेतन देण्यात येते.<br>तंत्र शिक्षण विभागाकडून ज्यांना विद्यावेतन देण्यात येत नाही त्यांना समाज कल्याण विभागाकडून रु. १,०० विद्यावेतन देण्यात येते. |
| ३१. | वैद्यकीय अभियांत्रिकी, कृषी. पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांकरिता ग्रंथ-पेढ्या (राज्य + केंद्र)<br>(२२२५ ०५६६) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १८७.८४<br>२.००<br>०.०१<br>०.०१<br>०.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>...<br>... | वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकीय या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या अनु. जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे या अभ्यासक्रमाची पुस्तके महाग असल्याने खरेदी करता येत नाहीत. अशा विद्यार्थ्यांसाठी सन १९७८-७९ पासून सदर योजना सुरू करण्यात आली. यासाठी केंद्र आणि राज्य यांच्या मार्फत ५०:५० टक्के खर्च करण्यात येतो. यामध्ये महाविद्यालयामधील विद्यार्थी संख्या विचारात घेऊन पुस्तक संच विकत घेण्यासाठी अनुदान दिले जाते. |
| ३२. | सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता<br>(२२२५ ०४५९)<br>(२२२५ ०३९७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | १३०.००<br>२१५.००<br>८३९.७२<br>७१५.००<br>३७६.०० | १२३.२४<br>५०९.८६<br>४१३.०६ | ८२१<br>२०५०<br>१६५२ | सदरहू योजना सन १९७६-७७ कार्यान्वित करण्यात आली असून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा या हेतूने सैनिक शाळांतून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे म्हणून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता दिला जातो. इयत्ता ५ वी ते १० वी पर्यंत सैनिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला सैनिक शाळेतील वसतिगृहातील निवास, भोजन, कपडे तसेच घोडे सवारी शिक्षण फी व परीक्षा फी इत्यादींवरील संपूर्ण खर्च अदा करण्यात येतो. (सातारा, नाशिक, पुणे, चंद्रपूर) बाकी सर्व मान्यताप्राप्त सैनिक शाळांना प्रति विद्यार्थी १५,०००/- भत्ता ठेवण्यात येतो. सन २०२४-२५ पासून सदरची योजना महा डीबीटी प्रणाली व्दारे राबविण्यात येत आहे. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३३. | व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतीगृहातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (२२२५ ०४१२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २००.००<br>२००.००<br>२००.००<br>४००.००<br>३५०.०० | १९०.००<br>२७०.००<br>२८०.०० | २३७५०<br>३८५७<br>४००० | शासन निर्णय, क्र. बीसीएच-१०८५ ७०९४/ (९२) बीसीडब्ल्यू-४, दिनांक २० जून १९८६ सुधारित क्र. इबीसी-२००३/प्र. क्र. ३११/मावक-२, दिनांक ९ जून २००३ अन्वये वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमातील महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीमधील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. २३५ ते रु. ७४० निर्वाह भत्ता दिला जातो. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी सलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती-द्वारे मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यातून त्यांची व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी इत्यादी बाबींचा खर्च भागवावा लागतो. या निर्वाह भत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी इत्यादी बाबींचा खर्च ते भागवू शकत नाहीत. पर्यायाने शिष्यवृत्तीतून मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यावर संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही. म्हणून जे विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या तसेच शासकीय वसतिगृहाच्या बाहेर राहतात, अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त पूर्वी देण्यात येत असलेल्या रु. १०० दरमहा च्या दरात वाढ करण्यात येऊन अभ्यासक्रमनिहाय हे दर कमीतकमी रु. ५०० ते जास्तीत जास्त रु. १,००० पर्यंत सुधारित करण्यात आली आहे. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्ती धारक असावा. या योजनेसभारत सरकार शिष्यवृत्तीसाठी जी रु. २,५०,००० लाखाची उत्पन्नाची मर्यादा आहे तिच मर्यादा या योजनेस लागू आहे. |
| ३४. | इयत्ता १० वी व १२ वी परिक्षेत विशेष उल्लेखनिय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती, वर्गाच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे. (२२२५ ३२६२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | २००.००<br>२००.००<br>२२७.५२<br>१९५.९०<br>२००.०० | १५३.३०<br>१७९.५३<br>१९५.४३ | ९०२<br>१४३६<br>१५६३ | शासन निर्णय क्र. इबीसी-२००३/प्र. क्र. ११५/मावक-२, दिनांक ११ जून २००३ अन्वये क्रमांक इबीसी-२००३/प्र. क्र. ११५/मावक-२, दि. २१ जुलै २००३ माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इ. १० व १२ वी च्या परिक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम येणाऱ्या अनुसूचित जाती, विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार देवून त्यांचा गौरव करण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. गुणवत्ता पुरस्कार हा दरवर्षी २६ जुलै रोजी समारंभपूर्वक वितरित करण्यात येतो. विद्यार्थी अनुसूचित जाती, विमूक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासप्रवर्गातील असावा.<br>तसेच जिल्ह्यात, तालुक्यात व महाविद्यालय/विद्यालयामधून सर्व साधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम विद्यार्थ्यांनाही पुरस्कार दिले जातात. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५. | इयत्ता १० वी च्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातींच्या मुला-मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे. (२२२५ ३८१४) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ९८५.००<br>३००.००<br>६००.००<br>९९०.००<br>८००.०० | ९८५.००<br>१२००.००<br>६९९.९९ | ३२८३३<br>३००००<br>२३३३३ | शासन निर्णय, क्र. इबीसी/२००३/प्र. क्र. ११५/मावक-२, दिनांक ११ जून २००३ अन्वये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून रहावेत यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्या दृष्टिने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालय व महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आहे. विद्यार्थ्यांना दरमहा रु. ३०० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते. (१० महिन्याकरिता). |
| ३६. | राज्यातील १०० अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. (२२२५ ३८२३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ४००.००<br>४००.००<br>४००.००<br>५८०.००<br>६००.०० | २७३.००<br>१४४.२३<br>३८९.०० | १२६<br>६१<br>१२३ | शासन निर्णय, क्र. इबीसी-२००३/प्र. क्र. ३२३/मावक-२, दिनांक ११ जून २००३ अन्वये एकविसाव्या शतकामध्ये यशस्वी होण्यास अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची विविध क्षेत्रात होणाऱ्या स्पर्धात्मक युगासाठी जडण-घडण व्हावी याकरिता देशातील उत्तोमोत्तम शैक्षणिक संस्थामध्ये त्यांना शिक्षण मिळावे याकरिता १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शा. नि. इबीसी-२०१७/प्र. क्र. ४०२/शिक्षण-१ दिनांक ०८-११-२०१७ अन्वये विहित केलेल्या अभ्यासक्रमाकरिता देशातील शैक्षणिक संस्थामध्ये उदा. देश पातळीवर होणाऱ्या कॅट परिक्षेद्वारे प्रवेश मिळणाऱ्या ६ संस्था, इंडियन बिझनेस स्कूल, हैद्राबाद,बिझनेस इंडिया किंवा तत्सम संस्थेने राष्ट्रीय पातळीवरील अ + वर्गीकरण केलेली बिझनेस स्कूल,जे. ई. इ. परिक्षेद्वारे प्रवेश मिळणाऱ्या भारतीय तंत्रज्ञान अंतर्गत ६ संस्था आणि अखिल भारतीय अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेमार्फत प्रवेश देण्यात येणाऱ्या संस्थामध्ये मोफत उच्च शिक्षण देण्यासाठीही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.<br>देशातील शैक्षणिक संस्थेकरिता निवड करून त्यांना देशांतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. या शासन निर्णयान्वये सुधारणा करून राज्यातील सर्व विभागातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने ८ परीक्षा मंडळास प्रत्येकी पदवी करिता १० विद्यार्थी असे एकूण ८०, पदव्युत्तर पदवी करिता प्रत्येक परीक्षा मंडळाकरिता असे एकूण १६ विद्यार्थी व राज्यस्तर पदवी पदविका करिता ४ विद्यार्थी असे एकूण १०० विद्यार्थ्यांची नियम व अटी, गुणानुक्रमे निवड करून शिक्षण फी, परीक्षा फी, वसतिगृह, भोजन, पुस्तके व इतर अनुषंगिक खर्च शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येतो. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ३७. | अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करणेसाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना (२२२५ ३८३२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | १५,०००.००<br>१०,०००.००<br>६५०५.५०<br>७५१०.००<br>८०००.०० | ५४९९.६८<br>६४४७.५३<br>५८४९.६३ | २३१<br>२१८<br>१४५ | शासन निर्णय, क्र. इबीसी-२००३/प्र. क्र. ११५/मावक-२, दिनांक ११ जून २००३ अन्वये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक परिस्थिती-मुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणून विविध विषयामध्ये परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळेल, अशा १० विद्यार्थ्यांचा परदेशातील शिक्षणाच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. त्यानंतर शासन निर्णय दिनांक १७ जून २००६ अन्वये सन २००६-०७ पासून विद्यार्थी संख्येत २५ पर्यंत वाढ व शासन निर्णय दिनांक २२-१०-२०१० अन्वये सन २०१०-११ पासून विद्यार्थी संख्येत ५० पर्यंत वाढ करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पदव्युत्तर पदवी करिता २६, व पीएच्डी. करिता २४ अशी शाखा निहाय विभागणी केलेली आहे. शासन निर्णय दिनांक १५-०७-२०१० व २२-१०-२०१० च्या सुधारित नियमान्वये शासनाने विहीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या मान्यताप्राप्त विद्यापीठात प्रवेश व निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण फीची संपूर्ण रक्कम, जेवण/राहणे करिता वार्षिक निर्वाहभत्ता, युके करिता ९,००० पाऊंड, युएसए व इतर देशाकरिता १४,००० डॉलर्स तसेच पुस्तकांचा खर्च युके करिता १,००० पाऊंड व युएसए व इतर देशाकरिता १,३७५ डॉलर्स इतक्या मर्यादेत तसेच परदेशात जाताना व येतानाचे एकदाच Shortage Route and Economy Class ने प्रवासाचे विमान प्रवास खर्च मंजूर करण्यात येतो. शासन निर्णय दि. ३०-६-२०१८ अन्वये परदेशी शिष्यवृत्तींसाठी विद्यार्थी संख्या ५० वरून ७५ करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना आरोग्य देण्याची देखील मान्यता देण्यात आली आहे. आता केंद्र शासनाच्या गाईड लाईन प्रमाणे अमेरिका व इतर देशांसाठी निर्वाह भत्तासाठी १५,४०० डॉलर्स तसेच पुस्तके व इतर आकस्मिक खर्चासाठी १,५०० डॉलर्स व यु. के. साठी निर्वाह भत्त्यासाठी ९,९०० पाऊंड तसेच पुस्तके व इतर आकस्मिक खर्चासाठी १,१०० पाऊंड इतक्या मर्यादेत रक्कम देण्यात येते. शासन निर्णय दिनांक १७-१-२०२२ अन्वये ज्या विद्यार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रू. ६.०० लाखाच्या आत आहे. अशा विद्यार्थ्यांने मागणी केल्यास आगाऊ स्वरूपात जातांनाचे विमान प्रवास भाड्याची रक्कम अदा करणे बाबत नियमावलीत सुधारणा केलेली आहे. तसेच शा.नि.दिनांक १६-१२-२०२१ अन्वये Post study work visa साठी NOC(नाहरकत प्रमाणपत्र) २ वर्षासाठीच्या कालावधीसाठी अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यात येते. शासन निर्णय दिनांक २३-०७-२०२३, दि. ३०-१०-२०२३ व दि. २५/०७/२०२४ अन्वये परदेश शिष्यवृत्ती योजने मध्ये नियम, अटी व शर्ती मध्ये सुधारणा केलेली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८. | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून अनुसूचित जातीच्या उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला व्यावसायिक प्रशिक्षण) (२२२५ ३२५१) (२२२५ जी १४३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ०.०१<br>०.०१<br>०.०१<br>०.०१<br>०.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | शासन निर्णय, क्र. इबीसी-२००३/प्र. क्र. १८८/मावक-२, दिनांक ४ जुलै २००३ अन्वये देशात औद्योगिक व आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यामुळे राष्ट्रीय उद्योग व खाजगी उद्योगामध्ये मंदीची लाट आलेली आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील मनुष्यबळाची गरज अत्यंत कमी झालेली आहे. याचा परिणाम म्हणून समाजातील बेरोजगार उमेदवारांचे संख्येत मोठ्या प्रमाणात भर पडलेली असून, त्यामध्ये एस. एस. सी. उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व आर्थिक दुर्बलतेमुळे पुढील कुठलेही शिक्षण न घेऊ शकलेले बेरोजगार यांचा समावेश आहे. राज्यातील अल्पशिक्षित अनुसूचित जातीमधील उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांचा व साधनसामग्रीचा यथायोग्य वापर करून एक आठवडा ते दोन महिनेपर्यंतच्या अल्प कालावधीचे प्रशिक्षण देऊन या प्रशिक्षित उमेदवारांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी तसेच शासकीय वसतिगृहातील गट-क व गट-ड कर्मचारी व अनुदानीत वसतिगृहातील अधीक्षक यांना प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. |
| ३९. | शासकीय वसतिगृहे. (२२२५ ३३४२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ४९५००.००<br>५५४९९.९८<br>५६८४३.८०<br>४७९००.००<br>६००००.०० | ४१८५९.३९<br>२९१८४.४२<br>४१०४८.८४ | ...<br>...<br>... | मागासवर्गीय मुला-मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण सुलभ व्हावे याकरिता शासनाने शासकीय वसतिगृहे कार्यान्वित केलेले आहेत. सदरची योजना ही सन १९२२ पासून सुरू असून सद्या महाराष्ट्रात मागासवर्गीय मुला-मुलींकरिता ४४९ शासकीय वसतिगृहे आहेत. सामाजिक न्याय विभाग शा.नि. दि.११/०३/२०२४ अन्वये वसतीगृह योजनांच्या २२२५ ३३४२, २२२५ ०२८१ व २२२५ ०९१३ या तीन लेखाशिर्षामध्ये समान उद्दीष्ट्ये असून या उद्दीष्टांतर्गत इतर वसतीगृहांकरिता खर्च सारखाच होत असल्यामुळे ३ लेखाशिर्ष एकत्रित करून २२२५ ३३४२ हे एकच लेखाशिर्ष ठेवण्यात आले आहेत.<br>शासननिर्णय क्र. बीसीएच-२०१६/प्र. क्र. २९३/शिक्षण-२ दि. ६ जानेवारी २०१७ अन्वये ज्या अनु. जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळणेकरिता अर्ज केला परंतु त्यांना वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे म्हणून भोजन, निवास, व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलबध करून घेण्यासाठी त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरीत करणेबाबत ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना'' सुरू करण्यात आली आहे. |
| ४०. | सफाई कामगारांच्या मुलांच्यासाठी निवासी शाळा (पब्लिक स्कूल). (२२२५ २२२८) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ९४.२८<br>१०३.१६<br>८२.३३<br>१५३.५७<br>२०२.३८ | ५३.९१<br>६६.१८<br>७७.७२ | ...<br>...<br>... | सफाई कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून निवासासह शैक्षणिक उन्नतीसाठी या समाजाच्या मुलांकरिता इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंत शिक्षणाची सोय व्हावी म्हणून१९८५ मध्ये पुणे येथे व १९९५-९६ मध्ये नागपूर येथे प्रत्येकी एक निवासी शाळा सुरू करण्यात आलेली आहे. या शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुलांना निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य, गणवेश इत्यादी सोयी मोफत दिल्या जातात. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ४१. | अनुसूचित जातीच्या मुला-मुलींकरिता नवीन शासकीय निवासी शाळा सुरू करणे. (२२२५-डी-११७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | २१०००.००<br>२४०००.००<br>२७५०५.१८<br>३१६५४.१५<br>४००००.०० | १८२८५.७०<br>१७४७३.८०<br>१९९२५.२८ | ...<br>...<br>... | शासन निर्णय, क्र. बीसीएच-२००२/प्र. क्र. २६८/मावक-४, दिनांक ४ जुलै २००७ अन्वये शासनाने आर्थिक परिस्थितीमुळे अनु. जाती/नवबौद्ध मुला-मुलींना प्राथमिक/माध्यमिक शिक्षण घेता येत नाही अशा मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी ९२ निवासी शाळा सुरू झाल्या आहेत. सदर निवासी शाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतच्या अनु. जाती व नवबौद्ध मुला-मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. निवासी शाळेत मोफत भोजन, निवास व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. |
| ४२. | मागासवर्गीय मुला मुलींकरिता नवीन १०० शासकीय वसतिगृहे सुरू करणे. (४२२५-०४६१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ०.०१<br>०.०१<br>६७.००<br>२०००.००<br>२७००.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>...<br>... | शासन निर्णय, क्र. बीसीएच-२००५/प्र. क्र. ५५४/मावक-४, दि. २८ जून २००७ नुसार मागासवर्गीय मुला-मुलींकरिता जिल्हा व तालुकास्तरावर १०० नविन शासकीय वसतिगृहे इमारत बांधकाम करून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या वसतिगृहांपैकी ७७ वसतिगृहांचे बांधकाम पूर्ण झाले असून २२ वसतिगृहांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. |
| ४३. | शासकीय वसतिगृहे बांधकाम. (४२२५ ०४८१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ११०००.००<br>१००००.००<br>६८२३.७५<br>१२००००.००<br>१५००००.०० | ७८२६.००<br>३९५१.८१<br>०.०० | १९<br>२२<br>... | शासन निर्णय, क्र. बीसीएच-२००५/प्र. क्र. ५५४/मावक-४, दिनांक २८ जून अन्वयेविभागीय स्तरावर मागासवर्गीय मुला-मुलींसाठी (२५० क्षमतेचे एक युनिट याप्रमाणे चार युनिट) १,००० क्षमतेची सात वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापैकी अमरावती, औरंगाबाद व लातूर, पुणे, नाशिक येथील वसतिगृह इमारत बांधकाम पूर्ण झालेले असून वसतिगृह सुरू झालेली आहेत. मुंबई, नागपूर ठिकाणची जमीन अद्याप अप्राप्त आहे. |
| ४४. | अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय निवासी शाळा बांधकाम. (४२२५-०५०५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ५०००.००<br>५०००.००<br>२३५१.६४<br>२८१२५.००<br>४००००.०० | ३०००.००<br>२९४९.७१<br>२०००.०० | ०६<br>१३<br>०७ | शासनाने शासन निर्णय, क्र. अजाशा-२००५/प्र. क्र. ४३२/का -४, दिनांक १ जून २००६ व दिनांक १९ जून २००६ नुसार राज्यात मागासवर्गीय मुला-मुलींसाठी तालुकास्तरावर एकूण ३५३ शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापैकी पहिल्या टप्प्यात शासन निर्णय क्र. बीसीएच-२००६/प्र. क्र. ३९५/मावक-४ दिनांक ४ जून २००७ नुसार इमारत बांधकाम करून १०० ठिकाणी शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या १०० निवासी शाळांपैकी ८९ निवासी शाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून ०८ ठिकाणी बांधकाम प्रगती पथावर आहे. बांधकाम पूर्ण असून हस्तांतरण होणे बाकी आहे. ०१ ठिकाणी जागा उपलब्ध नाही. प्रशासकीय मान्यतेस्तव १ व सा. बां. वि.कडे १ प्रस्ताव प्रलंबित आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४५. | अनु. जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी विभागीय स्तरावर उच्च स्तर औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करणे. (४२२५ ०४७२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | १०००.००<br>१०००.००<br>४४८.०३<br>६७.२०<br>२५००.०० | २१०.००<br>१७०.०६<br>०.०० | ०३<br>०२<br>०० | शासन निर्णय क्र. इबीसी-२००५/प्र. क्र. २९५/मावक-२, दिनांक ९ जानेवारी २००६ नुसार राज्यात विभागीय स्तरावर सात ठिकाणी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींसाठी विभागीय स्तरावर उच्चस्तर निवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारत बांधकाम करून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांपैकी नाशिक, अमरावती, अऔरंगाबाद व नागपूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू झालेल्या आहेत. पुणे येथील प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. मुंबई येथे अद्याप जागा उपलब्ध झालेली नाही. |
| ४६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन इमारत बांधकाम करणे. जुने लेखाशिर्ष (४२२५-०४९९) नविन लेखाशिर्ष (४२२५ २१७९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ५०००.००<br>१५००.००<br>२१४.०४<br>१००००.००<br>२१०००.०० | ४०३.७४<br>२५०.००<br>१४३.४९ | ०३<br>०४<br>०२ | या योजने अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे ३४ जिल्ह्याच्या ठिकाणी सामाजिक न्याय विभागांतर्गत जिल्हास्तरीय कार्यालय व महामंडळ यांचे कार्यालयासाठी इमारत बांधकाम मंजूर करण्यात आलेले आहे. ३४ जिल्ह्यांपैकी इमारत बांधकामासाठी ३३ ठिकाणी जमीन प्राप्त झालेली असून ३० ठिकाणी इमारत बांधकाम पूर्ण झालेले आहे व ३ ठिकाणी बांधकाम प्रगतीपथावर आहे. १ ठिकाणी जागा अप्राप्त आहे. |
| ४७. | अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आश्रम शाळा योजना (२२२५ एफ ५६८) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ...<br>...<br>१७५०.००<br>०.०१<br>२५००.०० | ...<br>...<br>०.००<br>... | ...<br>...<br>००<br>... | विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळा योजनेच्या धर्तीवर या जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे अशा जिल्ह्यात स्वयंसेवी संस्थेमार्फत अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी आश्रमशाळा ही योजना सन १९९६-९७ पासून सुरू करण्यात आली आहे. सध्या महाराष्ट्रात १० प्राथमिक व ९ माध्यमिक अशा एकूण १९ अनु. जाती आश्रमशाळा कार्यरत आहेत. सदर योजने अंतर्गत शालेय वसतीगृह कर्मचारी यांचे १००% वेतन अनुदान, प्राथमिक आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांवर प्रती विद्यार्थी रु. १५०० प्रमाणे दरमहा ११ महिन्यांसाठी व माध्यमिक आश्रमशाळेसाठी १० महिन्यांकरिता स्वयंसेवी संस्थांना परिपोषण अनुदान देण्यात येते, शिक्षक व अधीक्षकाच्या एकूण वेतनाच्या १५% रक्कम आकस्मिक खर्च म्हणून देण्यात येते, सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५% इमारत भाडे देण्यात येते. तसेच सदर आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके, स्टेशनरी, गणवेश, आंथरुण-पांघरुण, साबण, तेल इत्यादी वस्तू मोफत पुरविण्यात येते. सदर योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ४८. | स्वयंसेवी संस्थाचे मागासवर्गीय मुला-मुलींच्या अनुदानित वसतिगृहाच्या इमारत (विस्तार) बांधकामासाठी अर्थसहाय्य (बाबू जगजीवनराम छात्रावास योजना. (राज्य + केंद्र) जुने लेखाशिर्ष (२२२५ ३७९९) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १७२) जुने लेखाशिर्ष (२२२५ ३०२८) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १८१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ९४.२८<br>०.०४<br>०.०४<br>०.०४<br>१५.०० | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>...<br>... | सदर योजना सन १९७०-७१ पासून फक्त मुलींच्या वसतीगृहाकरिता सुरू करण्यात आली व सन १९८९-९० पासून मुलांच्या वसतिगृहासाठी सुद्धा सदर योजना लागू करण्यात आली. सदर योजने अंतर्गत अनुदानित वसतिगृहांच्या विस्तारित इमारत बांधकामासाठी अनुदान देण्यात येते. नवीन वसतिगृह बांधकामास अनुदान देण्यात येत नाही. सदर योजने अंतर्गत मान्य अंदाजपत्रकानुसार मुलांच्या अनुदानित वसतिगृहाकरिता राज्य शासन ५०%, केंद्र शासन ५०% याप्रमाणे अनुदान देण्यात येते, तसेच मुलींच्या वसतिगृहासाठी केंद्र शासनाकडून १००% अनुदान देण्यात येते.सदर अनुदान मिळाल्यापासून २ वर्षात विस्तारित इमारत बांधकाम संबंधित संस्थेने पूर्ण केले पाहिजे. |
| ४९. | स्वयंसेवी संस्थांना वसतिगृहाच्या परिरक्षणासाठी अनुदान (२२२५-२१३९) जुने लेखाशिर्ष (२२२५-०५३९) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १६१) जुने लेखाशिर्ष (२२२५-०८८९) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी २४१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | १,५२,९४.२०<br>१५०९६.४६<br>३२७१६.५८<br>६९८७०.९७ | १२०७१.९०<br>३४५८४.६६<br>२४४१२.३२ | २२९७<br>२२९७<br>२२९७ | अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास होण्याच्या दृष्टीने व साक्षरतेचे प्रमाण वाढण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्थांना वसतिगृहे चालविण्यासाठी अनुदान दिले जाते. योजना सन १९५१ पासून सुरू झालेली असून आजमितीस महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १०० अन्वये जिल्हा परिषदेमार्फत चालविण्यात येते.<br>मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पूर्ण करता यावा, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व्हावा या उद्देशाने सदर योजना सन १९५०-५१ पासून कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजना शासन निर्णय क्र बीसीएच-१०९८/प्र. क्र. १०७/मावक-४, दिनांक १६ मार्च १९९८ मधील अटी व शर्तीनुसार सदर योजना राबविण्यात येते. सदर योजने अंतर्गत वसतिगृह अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस व चौकीदार यांना एकत्रित वेतन/मानधन देण्यात येते. निवासी विद्यार्थ्यांसाठी दरमहा दरडोई रु. २,२०० परिरक्षण अनुदान १० महिन्यांसाठी संस्थेस देण्यात येते. इमारत भाड्यापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५% भाडे संस्थेस देण्यात येते. निवास, भोजन, आंथरुण-पांघरूण, क्रिडा साहित्य इत्यादी सोयीसुविधा मोफत देण्यात येतात. अनुदानित वसतिगृहांमध्ये अनु. जातीच्या विद्यार्थ्यांबरोबर मातंग, वाल्मिकी, कातकरी व माडिया गोंड या प्रवर्गातील स्थानिक विद्यार्थ्यांना आणि अनाथ अपंग निराश्रित विद्यार्थ्यांना प्राधान्याने विहित टक्केवारीच्या आधीन राहून प्रवेश देण्यात येतो. सदर योजने अंतर्गत राज्यात एकूण २,३८८ एवढी अनुदानित वसतिगृहे असून सदर योजना जिल्हा-परिषदेमार्फत राबविण्यात येते. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५०. | मागासवर्गीय बालवाड्यांना सहाय्यक अनुदान.<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ०५३९)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी १६१)<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५ ०८८९)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी २४१) | २०२२-२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ८.४०<br>४.९५<br>०.००<br>०.०० | ०.००<br>०.०० | ... | मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्यामध्ये लहान वयातच स्वच्छता व नीटनेटकेपणाचे संस्कार व शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी म्हणून बालवाड्यांची योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत आहे. प्रत्येक बालवाडीत किमान २० ते कमाल ४० मुलांना प्रवेश देण्यात येतो. यामध्ये १०% बिगर मागासवर्गीय मुलांनाही प्रवेश देण्यात येतो. शासनाने नवीन धोरणानुसार शहरी व ग्रामीण विभागामध्ये एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत अंगणवाड्या सुरू झालेल्या असल्याने बालवाड्यांसाठी पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही. |
| ५१. | समाज कार्य महाविद्यालय.<br>(२२३५ १५०३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | २०५४३.२२<br>१८५५६.४८<br>१९९५२.३४<br>०.०२ | २०५८०.२८<br>१८४२८.५४<br>१९९३५.१५ | ५१<br>५४७<br>... | स्वयंसेवी संस्थांमार्फत चालवल्या जाणाऱ्या शासनमान्य विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या व शासनाची मान्यता असणाऱ्या समाजकार्य विषयाच्या पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवणाऱ्या महाविद्यालयांना मान्यता व अनुदान ही योजना सन १९६६-६७ पासून कार्यान्वित आहे. स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांना वेतन व वेतनेतर सहाय्यक अनुदान या योजने अंतर्गत मंजूर करण्यात येते. अनुदान तत्वावरील समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १००% वेतन अनुदान, सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ५०% इमारत भाडे अनुदान तसेच वेतनेतर खर्चाकरिता वेतन खर्चाच्या ८% (चौथ्या वेतन आयोगाच्या आधारे) अनुदान देण्यात येते, राज्यात सद्यस्थितीत ६८ समाजकार्य महाविद्यालये असून, पैकी ५० अनुदान तत्वावर, १८ विनाअनुदान तत्वावर कार्यरत आहेत. सदर योजना संबंधीत जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांचेमार्फत राबविण्यात येते. |
| | **अनुसूचित जाती उपयोजना** | | | | | |
| ५२ | गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे.<br>(२२२५ २६२२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ७००.००<br>७००.००<br>१०००.००<br>४९०.००<br>१०००.०० | ०.००<br>१४०.००<br>०.०० | ...<br>३५८<br>... | महाराष्ट्र राज्यामध्ये चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्ती करण्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असलेल्या अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना त्यांची आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी १००% अनुदान तत्वावर पत्र्यांचे स्टॉल व रुपये ५०० इतके अनुदान देण्यात येते.<br>शासन निर्णय क्र. गटई-२०११/प्र. क्र. १४७/मावक-२, दि. ८-१२-११ अन्वये सदरची योजना व्यवस्थापकीय संचालक संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळ (मर्या.), मुंबई यांचे मार्फत राबविण्यात येते. |

| अ. क्र.<br>१ | योजनेचे नाव<br>२ | वर्ष<br>३ | तरतूद<br>४ | खर्च<br>५ | लाभार्थी<br>६ | योजनेची संक्षिप्त माहिती<br>७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३. | अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांसाठीच्या योजनांना समाजकल्याण संचालनालयामार्फत व्यापक प्रसिद्धी.<br>(२२२५ ३७२५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | २५०००.००<br>२५००.००<br>१४१३०.२०<br>१७०००.००<br>२००००.०० | २३५.८१<br>३०९०.१८<br>१३६९१.०२ | ...<br>...<br>... | शा. नि. क्र. वि. घ. यो.-२००६/प्र. क्र. २४७/वि. घ. यो.-१, दि. ३ नोव्हेंबर २००६ अन्वये समाजकल्याण आयुक्तालयामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या शैक्षणिक सामाजिक व आर्थिक विकासाकरिता येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांना तळागाळातील व ग्रामपातळीवर व्यापक प्रसिद्धी देणे. |
| ५४. | अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करणे.<br>(२२२५ डी ३३१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ५०००.००<br>२०००.००<br>३५००.००<br>५०००.००<br>४५००.०० | २४४८.९५<br>८९७.७५<br>१२१६.९५ | ६४८<br>२८५<br>३८६ | शासन पत्र क्र. एसटीएस २०११/प्र. क्र. ४३९/अजाक-१, दि. ६-१२-१२ अन्वये अनु. जाती व नवबौद्ध घटकातील शेतकऱ्यांना १००% अनुदानावर पॉवर ट्रिलर पुरवठा ही योजना बंद करण्यात आली असून त्याऐवजी बचत गटांना ९०% अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने याचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :<br>(१) अनु. जाती-नवबौद्ध घटकांच्या बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.<br>(२) सदर बचत गटातील किमान ८०% सदस्य अनु. जाती-नवबौद्ध घटकातील असावेत.<br>(३) मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची किमान मर्यादा रु. ३.५० लाख इतकी राहील व सदर बचत गटांनी वरील किमान मर्यादेच्या १०% स्वहिस्सा भरल्यानंतर ९०% (कमाल रु. ३.१५ लाख.)<br>(४) सदरची योजना शासन निर्णय क्र. एसटीएस-२०१६/प्र.क्र. १२५/अजाक दिनांक ८/३/२०१७ अन्वये डी. बी. टी. अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| ५५. | कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबलीकरण योजना.<br>(२२२५-३६१८)<br>जुने लेखाशिर्ष<br>(६२२५-०२६९)<br>नविन लेखाशिर्ष<br>(६२२५ १०७८) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | १५०००.०१<br>२००००.०१<br>१४००१.००<br>१००१.०० | ७३५०.००<br>४३७०.००<br>२५००.०० | ४३२<br>२०५<br>१९९ | या योजने अंतर्गत अनु. जाती व नवबौद्ध घटकाच्या दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना उत्पन्नाचे स्त्रोत उपलब्ध व्हावे म्हणून ४ एकर कोरडवाहू जमीन किंवा २ एकर ओलिताखालील जमीन उपलब्ध करून देण्याची योजना शासनाने १ एप्रिल २००४ पासून सुरू केली आहे. या योजने अंतर्गत दिनांक १४ ऑगस्ट २०१८ अन्वये सुधारित शासन निर्णयानुसार सदरची योजना ही १००% अनुदानित करण्यात आली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे).<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५-३६८१)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी ३३२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ३५,०००.००<br>३५,०००.००<br>३००००.००<br>५००००.००<br>५००००.०० | २४५००.००<br>३५०००.००<br>१०५००.०० | ...<br>...<br>... | राज्य शासनाने शासन निर्णय क्र. यूटीए-१०७८/डी-२५, दि. ३० डिसेंबर १९७८ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील विविध प्रकाशनाचे संशोधन कार्य करण्यात येते. या संस्थेमार्फत मागासवर्गीयांकरिता स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. तसेच समाजकल्याण विभागातील कार्यरत कार्यालय अधिक्षक, प्रमुख लिपिक, समाज कल्याण निरिक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व शिपाई या वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. |
| ५७. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे मार्फत अनु.जातीचे सुशिक्षीत बेरोजगार तरुणांना व्यावसायाभिमुख क्षमता वाढीसाठी प्रशिक्षण देणे.<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५-३७५२)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी १२५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | १०,००.००<br>१०,००.००<br>४९००.००<br>५०००.००<br>२५००.०० | ७००.००<br>७००.००<br>२१००.०० | ...<br>...<br>... | शासनाने शासन निर्णय क्र. इबीसी-२००६/प्र. क्र. १४८/मावक-२, दि. १५ सप्टेबर २००६ अन्वये अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील बेरोजगारांसाठी प्रमाण कमी करून त्यांच्या क्षमता वृद्धीसाठी ही योजना सन २००६-०७ पासून सुरू करण्यात आलेली आहे. अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आर्थिक परिस्थितीमुळे कौशल्यावर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण कार्यकम सुरू करता येत नाहीत. त्यासाठी कृषि औद्योगिक, कृषि प्रक्रिया, फळबागा, फुलशेती, रेशीम उद्योग, कृषि पणन, मत्स्य व्यवसाय, पशु संवर्धन, दुग्ध प्रक्रिया यांसारख्या व्यावसायिक बाबींवर प्रशिक्षण देऊन त्यांची कौशल्यवृद्धी करणेसाठी ५ दिवसांच्या प्रशिक्षणासाठी रु. ४,००० खर्च अपेक्षित आहे. अनु. जातीच्या किमान इ. ८ वी उत्तीर्ण अर्जदार पात्र असून वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे राहील.<br>सदरहू संस्थेची स्थापना २२ डिसेंबर १९७८ पासून करण्यात आली असून सदरहू संस्थेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील विविध प्रकारचे संशोधन कार्य हाती घेण्यात आले असून त्यासाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, चर्चासत्रे व परिसंवाद, ग्रंथ खरेदी व इतर तत्सम कार्यक्रम घेण्यात येत आहेत. |
| ५८. | महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारकाची परिरक्षण व व्यवस्थापन.<br>जुने लेखाशिर्ष<br>(२२२५-३६४५)<br>नविन लेखाशिर्ष<br>(२२२५ जी ३६८) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ५००.००<br>५००.००<br>३५७.५०<br>१५००.००<br>५०००.०० | ३६१.३८<br>३६१.४०<br>१३५.०० | ...<br>...<br>... | महाड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंती दिनाचे शतक महोत्सवाचे औचित्य साधून हे राष्ट्रीय स्मारक बांधण्यात आले आहे. या स्मारकामध्ये प्रेक्षागृह, वस्तुसंग्रहालय, वाचनालय, बहुउद्देशीय सभागृह, सहा सेमीनार हॉल, १२ विश्रामगृह, तरंग तलाव, डॉ. बाबासाहेबांचा पुतळा व प्रशस्त बगीचा आहे. सदर स्मारकांची देखभाल व प्रशासकीय बाबीसाठी १२ कर्मचाऱ्यांची पदे मंजूर आहेत. सद्यःस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत सदर स्मारकांची सर्व देखभाल व प्रशासकीय नियंत्रण करण्यात येते. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ५९. | अनु. जातीचे सहकारी औद्योगिक संस्थांना अर्थसहाय्य. (४२२५ ०४५२) जुने लेखाशिर्ष (६२२५ ०२५१) नविन लेखाशिर्ष (६२२५ १०६९) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | २०,००.००<br>१५,०००.००<br>११८००.००<br>२४५००.००<br>१५०००.०० | १२००.००<br>५३००.००<br>८७५६.७८ | १३<br>५८<br>१३२ | सहकाराच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे काळाची गरज आहे. दुर्बल घटकांना सहकार क्षेत्रात वाव मिळवून देऊन त्यांना विकासाच्या संधी मिळवून देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीमध्ये बेरोजगारांना उपजिविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी अनु. जातीच्या सहकारी संस्थांना अर्थ सहाय्य देण्याची योजना शासन निर्णय क्र. मासाका-२००३/प्र. क्र. १९/विघयो-२ दि.२७ फेब्रुवारी २००४ नुसार सुरू करण्यात आली आहे. यामध्ये अनु. जातीच्या यंत्रमाग सोसायट्या, निटींग गारमेंटस, सूत प्रोसेसिंग युनिटस, शेतीमाल प्रक्रिया, साखर कारखाने, खांडसरी कारखाना रूपांतरित करणे इ. समावेश आहे.<br>(१) सहकारी संस्थेचा स्वहिस्सा – ५%<br>(२) सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल –३५%<br>(३) शासकीय दीर्घ मुदतीचे कर्ज - ३५%<br>(४) वित्तीय संस्थेकडून कर्ज – २५%<br>वरीलप्रमाणे अर्थसहाय्य खालील अटीवर दिले जाते.<br>(१) सहकार कायद्या अंतर्गत संस्था नोंदणीकृत असणे, (२) संस्थेचे भागधारक ७०% अनु. जातीचे/नवबौद्ध असावेत, (३) संस्थेच्या प्रकल्पाच्या ५% स्वहिस्सा भाग भांडवल, (४) शासनाने या योजनेसाठी विहित केलेल्या १ ते ३२ अटींची पूर्तता करणे. |
| ६०. | अनु. जातीचे सहकारी सूतगिरणींना दीर्घ मुदतीची कर्जे. जुने लेखाशिर्ष (६२२५-०२२२) नविन लेखाशिर्ष (६२२५ १०५१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ७५,००.००<br>४,०००.००<br>५६००.००<br>७०००.००<br>१००००.०० | ४३७०.०८<br>४९४३.१३<br>३०००.०० | ३<br>३<br>४ | मागासवर्गीय सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करावयाची योजना शा. नि. क्र. एपीसी-१०९७/१६३४९/प्र. क्र. १२३ विघयो-२, दि. ४ जून १९९८ आणि शा. नि. क्र. सूतगी-२००३/५५५/प्र. क्र.-३३, विघयो दि. २ जुलै २००४ अन्वये राज्यात कार्यान्वित आहे. सूत गिरणीचे प्रकल्प मूल्य ५३ कोटी निर्धारीत केले असून त्याचे ५% किमान ८० लाखांपर्यंत सभासदाकडून भागभांडवल गोळा करणारे संस्थेस प्रकल्प मूल्याचे ४५% सहकार व वस्त्र उद्योग विभागाकडून भागभांडवल व समाजकल्याण विभागाकडून ५०% दीर्घ मुदतीचे कर्ज मंजूर करण्यात येते. साधारण २ वर्षानंतर कर्जवसूली ६ वर्षांच्या कालावधीत २४ समान मासिक हप्त्यात करावी लागते. राज्यामध्ये एकूण ९ सूतगिरण्या कार्यान्वित आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **संचालनालय व प्रशासन** | | | | | |
| ६१. | आयुक्तालयाचे बळकटीकरण. (२२२५-००९२) जुने लेखाशिर्ष (२२२५-०१३६) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १५२) (२२२५ डी-०५५) (२२२५-०१५४) (२२२५-०१०९) | २०२२–२०२३ | ९९,४६.७० | ८४२९.७० | ... | आयुक्तालय, समाजकल्याण आणि क्षेत्रीय कार्यालयातील ९७९ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर भत्त्यासाठी लेखाशीर्ष एनपी-२२५ ००९२ मधून खर्च करण्यात येतो. तसेच जिल्हा परिषदेतील जिल्हा समाजकल्याणचे ३३ अधिकाऱ्यांच्या वेतन व इतर भत्त्यावर लेखाशीर्ष एनपी-२२२५-डी-५५ खाली करण्यात येतो आणि समाजकल्याण जि. प. कार्यालयातील ४६२ कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर भत्त्यासाठी लेखाशीर्ष एनपी-२२२५ ०१३६ मधून खर्च करण्यात येतो. नागरी हक्क संरक्षण यंत्रणा मुख्यालय व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत राबविण्यासाठी १४ कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांचा खर्च लेखाशीर्ष एनपी-२२२५ ०१५४ मधून करण्यात येतो. तसेच अनु. जाती उपयोजन क्षेत्रीय कार्यालयामार्फत राबविण्यासाठी ५० अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याचा खर्च लेखाशीर्ष-२२२५ ०१०९ मधून करण्यात येतो. |
| | | २०२३–२०२४ | १०९४०.२० | १०७३६.२७ | ... | |
| | | २०२४–२०२५ | ९२४४.४९ | ८४६५.३२ | | |
| | | २०२५-२०२६ | ११६५५.५७ | | | |
| | | २०२६–२०२७ | ९९६४.८४ | | | |
| ६२. | सामाजिक न्याय संचालनालय (मागासवर्ग शाखा) व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या दक्षता पथक. (२२२५-३४७६) (२२२५-०११८) | २०२२–२०२३ | ७५,२२.४३ | ७२१७.९९ | ... | महाराष्ट्र राज्यातील आयुक्तालयाचे नियंत्रणाखालील ७ विभागातील ३६ जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. त्यांचे मार्फत अनु. जाती, वि. जा. भ. ज., इ. मा. व., वि. मा. प्र. यांचे जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करून प्रमाणपत्र देण्यात येते. सदर प्रमाणपत्र शैक्षणिक, निवडणूक, सरकारी-निमसरकारी नोकरीसाठी देण्यात येते. सध्या संगणकावर ई-जाती प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे. समित्यांमधील २६३ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते लेखाशीर्ष २२२५ ३४७६ खाली काढण्यात येऊन कंत्राटी पदावरील ७९ कर्मचाऱ्यांचे मानधन १० कंत्राटी सेवा यामधून करण्यात येते. जात पडताळणी समित्यामधील क्लिष्ट प्रकरणासाठी दक्षता पथके कार्यान्वित असून १०८ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर भत्त्याचा खर्च लेखाशीर्ष एन-२२२५ ०११८ मधून करण्यात येतो. |
| | | २०२३–२०२४ | ९१२३.८५ | ४९७२.९९ | ... | |
| | | २०२४–२०२५ | ७९२३.२३ | ५६१०.७२ | | |
| | | २०२५-२०२६ | ८२९८.८० | | | |
| | | २०२६–२०२७ | ८२९८.५६ | | | |
| ६३. | इयत्ता ९ वी. व १० वी. मध्ये शिकत असलेल्या अनु. जा. विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती. (२२२५-एफ ४४१) | २०२२–२०२३ | १०,६७.०० | ०.०० | ... | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय क्र. इबीसी २०१२/प्र. क्र. १५१/शिक्षण-१ दिनांक ४ ऑक्टोबर २०१३ नुसार सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून सदर योजना लागू करण्यास मान्यता दिलेली आहे. सदरच्या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये शा.नि.क्र ईबीसी-२०२२/प्र.क्र.१४६/शिक्षण-१ दि.२०.०२.२०२४ अन्वये सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधी करिता सुधारीत मार्गदर्शक सूचला राज्यात लागू करण्यात आलेल्या आहेत. |
| | | २०२३–२०२४ | ११३३.६९ | ७६.९९ | ५४९९ | |
| | | २०२४–२०२५ | २३३.२० | ८९४.९४ | २५५७० | |
| | | २०२५-२०२६ | ४५७.०० | | | |
| | | २०२६–२०२७ | ४०६.०० | | | |

**(पुढील पानावर ...)**

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

**१. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व इतर अनुदानाचे दर खालीलप्रमाणे राहतील.**

| अ. क्र. | योजना | वसतीगृहात न राहणारे (अनिवासी) | वसतीगृहात राहणारे (निवासी) |
|---|---|---|---|
| १. | शिष्यवृत्तीचा दर (प्रतिमाह) | रु. ३५० | रु. ७०० |

वरील शिष्यवृत्ती शिवाय दिव्यांग विद्यार्थीना वार्षिक १०% अतिरिक्त भत्ता देय आहे.

**२. सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील.**

१. सदर योजना शासकीय मान्यता प्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस लागू राहील.
२. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रु. २.०० लक्ष.
३. यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही.
४. सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्याने अर्ज करणे आवश्यक आहे.
५. सदर योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही.
६. राज्य शासनाची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी. ते १० वी च्या सर्व मुलींसाठी सध्या सुरू आहे. यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. मात्र केंद्र शासनाच्या इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये रुपये २.०० लक्ष इतके वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी, १० वी च्या मुलींचा समावेश होणार आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी च्या मुली आणि रुपये २.०० लक्ष पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी १० वी च्या मूलींकरिता सध्याची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना यापुढेही चालू राहील. मात्र एकाच लाभार्थ्यांस दोन्ही योजनेचा लाभ घेता येणार नाही.

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| ६४. | हमी परताव्यासाठी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांसाठी कर्ज. (६२१६-०२३९) | २०२२–२०२३ | ३०.०० | ०.०० | ... | राज्यातील मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थांना अर्थसहाय्य (पीडब्ल्यूआर २१९) या योजने अंतर्गत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट व अल्प उत्पन्न गटातील मर्यादा धारण करणाऱ्या संस्थांना घरे बांधणीसाठी शासनातर्फे अनुदान दिले जाते. या योजने अंतर्गत मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज मंजूर व अदा करण्याची जबाबदारी दी महाराष्ट्र स्टेट-को. हौसिंग फायनान्स लि. मुंबई यांचेकडे सोपविण्यात आली आहे. ज्या गृहनिर्माण संस्था कर्ज घेणार असतील त्या त्या कर्जाला बांधकाम खर्चाच्या मर्यादेला आधीन राहून विविध शासनाने निर्णयान्वये शासन हमी दिलेली आहे. |
| | | २०२३–२०२४ | २९२.९३ | ०.०० | ... | |
| | | २०२४–२०२५ | ०.०१ | ०.०० | ... | |
| | | २०२५-२०२६ | ०.०१ | | | |
| | | २०२६–२०२७ | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६५ | नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालणे व त्याचे समूह उच्चाटण करणे. (२२३५-बी-३६१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | २२००.००<br>३०५४.००<br>४५६१.४२<br>१५००.००<br>२०००.०० | ६६०४९<br>१३९.८५<br>९०७.४२ | ...<br>...<br>... | शासन निर्णय क्र. अंश्रनि-२०१४/ प्र. क्र. २९३ (अ)/सामासु, मुंबई दिनांक १२ सप्टेंबर २०१४ अन्वये शासनाने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांनाप्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ या कायद्याचीप्रभावी अंमलबजावणी व प्रचार आणि प्रसिद्धी याकरिता विविध कार्यक्रम/कार्यशाळा इत्यादीआयोजित करण्यात येतात परंतू शा.नि.दि. १५ जुलै २०२० नुसार शासनस्तरावर कार्यवाही केली जाते. |
| ६६. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५वी जयंती वर्ष ''समता व सामाजिक न्याय वर्ष'' साजरे करणे. (२२२५-डी-८२३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ५०,००.००<br>५,०००.००<br>२८००.००<br>१९०००.००<br>४००००.०० | १८१५.२५<br>०.००<br>६१४.२७ | ...<br>...<br>१ | शासननिर्णय क्रमांक सामान्य न्याय विभाग-२०१५/प्र. क्र.-१६३/बांधकामे दिनांक ९ ऑक्टोबर २०१५ अन्वये शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १४ एप्रिल २०१५ ते १४ एप्रिल २०१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदरच्या वर्षामध्ये अनेक कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. तसेच सदर शासन निर्णयानुसार राज्यात मागासवर्गीय मुलींसाठी नवीन ५० शासकीय वसतिगृहे व महानगरात नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.<br>तसेच शासन निर्णय दि.२४ मार्च,२०१७ अन्वये एकूण २८ ऐतिहासिक स्थळांची यादी घोषीत केलेली असून शासन निर्णय दि.१४.०३.२०१८ अन्वये ११ ऐतिहासिक स्थळांची यादी घोषीत करण्यात आलेली आहे. उर्वरित १३ स्थळांना शासनाने वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करुन मंजूरी दिलेली आहे. असे एकूण ५२ ऐतिहासिक स्थळांना मंजूरी दिलेली आहे. आता पर्यंत १४ ऐतिहासिक स्थळांची कामे पूर्ण झालेली आहेत. प्रगतीपथावर ५ कामे असून २० कामे अपूर्ण आहेत. उर्वरित १३ प्रस्ताव संबधित क्षेत्रिय कार्यालयाकडून अप्राप्त आहेत. |
| ६७. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथे सन १९२१-२२ मध्ये वास्तव्य केलेल्या घराची खरेदी व दुरुस्ती. (४२२५-११६३) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | ०.०१<br>०.०१<br>०.०१<br>०.०१ | ०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>...<br>... | शासन निर्णय क्र. विघयो-२०१४/प्र. क्र. ८०/विघयो दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१/२२ मध्ये वास्तव्य केलेले लंडनस्थित १० किंग्ज हन्रीरोड एन डब्ल्यु-३ येथील घर शासनाने घेतले आहे. सदर घर खरेदी केंद्र शासन, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात आले आहे. |

| अ. क्र. | योजनेचे नाव | वर्ष | तरतूद | खर्च | लाभार्थी | योजनेची संक्षिप्त माहिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ६८. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना. (२२२५-ई-७७७) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | १,८०,००.००<br>१५,०००.००<br>२५००.००<br>४०००.००<br>३७५००.०० | १२५९९.२१<br>३६६८२.६७<br>२४९.६३ | २०४६२<br>७१९२६<br>५२०८३ | शासन निर्णय क्र. बीसीएच-२०१६ / प्र. क्र. २९३ शिक्षण-२, दिनांक ६ जानेवारी २०१७, अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेखाली १० वी व १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यास क्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनु. जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना भोजन, निवास, व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांचे आधार संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यात येते. सदरचा लाभ मिळणेकरिता विद्यार्थ्याने विहीत नमुन्यातील अर्ज करणे आवश्यक आहे. सदरच्या शासन निर्णयातील नियमानुसार विहीत अटींची पूर्तता करणाऱ्या विद्यार्थ्यास सदर योजनेचा लाभ देण्यात येतो. शा.नि.दि.२६.१२.२०२४ अन्वये स्वाधार योजनेचा विस्तार तालुका स्तरापर्यंत करण्यात आलेला आहे. |
| ६९. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना. (लेखाशिर्ष २२२५ एफ ०८५) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | १२,००,००.००<br>१,५९,६५७.१६<br>१३१२००.००<br>७८५००.००<br>१३३०००.०० | ८४०००.००<br>११५७२५.७३<br>७४५२२.२२ | ...<br>...<br>... | राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांना/ गावांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन १९७४ पासून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती सुधारणा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यामध्ये नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा/गावांचा कमी अधिक प्रमाणात विकास झाला तरी तो एकसमान झालेला दिसून येत नाही. राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागातील विशेष घटक संवर्गातील वस्त्यांमध्ये/गावांमध्ये विकास कामे निधी अभावाने प्रलंबित राहिल्याने ग्रामस्थांना तसेच नागरी भागातील रहिवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीस/गावाच्या विकास कामांकरिता वारंवार मोठ्या प्रमाणात निधीची मागणी होत आहे.<br>उपरोक्त बाब विचारात घेऊन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देण्यासंदर्भात नव्याने राज्यस्तर योजना तयार करुन सदर योजनेचे निकष निश्चित करणे आवश्यक होते. तसेच या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे. अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करुन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देऊन या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अशी राज्यस्तर योजना सन २०१८-१९ या वर्षापासून दिनांक ९ मार्च २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील/गावातील पाणीपुरवठा, मलनिःस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटारे बांधणे, स्मशान भुमीचा विकास करणे, पथदिवे, पर्जन्य पाण्याचा निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालये, ग्रंथालय/अभ्यासिका, व्यायामशाळा या व्यतिरिक्त स्थानिक वस्तीतील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेता विकास कामांचा समावेश शासन स्तरावरुन करण्यात येईल. सदर योजनेंतर्गत केवळ विद्यमान खासदार व आमदार यांनी सुचविलेली कामे मंजूर केली जातात.<br>दिनांक २८ जुलै, २०२१ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये सदर योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांमध्ये वाढ करण्यात आली असून नविन अटी व शर्ती समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. |
| ७० | केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडीया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरीता मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना (२२२५-एफ-३१६) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६–२०२७ | १७६८.४७<br>१८००.००<br>२५०.००<br>२१००.००<br>१०००.०० | ८४.६०<br>२३१.७३<br>३४.७५ | १०<br>१८<br>०५ | शा.नि.क्र.मा.सा.का २०१८/प्र.क्र.२५९(२)अजाक दि. ८ मार्च २०१९ अन्वये सदरची योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी २०२०-२१ पासुन करण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरीता नवउद्योजक यांना १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टँन्ड अप इंडिया योजनेअंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरीत Front end Subsidy १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येते. |
| ७१. | अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता ''व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती'' योजना. (२२२५-एफ-५४१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६–२०२७ | ८००.००<br>८००.००<br>७५.००<br>८००.००<br>७९.२० | ०.००<br>०.००<br>७४.०० | ००<br>००<br>२८५ | शासकीय आद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील पीपीपी योजनेअंतर्गत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधून शिल्प कारागीर, प्रशिक्षण योजनेअंतर्गत अभ्यासक्रमासाठी केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.<br>शा.नि.क्र.ःव्युप्रशु-२०१९/प्र.क्र.१७३/शिक्षण-१ दि. १ ऑगस्ट २०१९ अन्वये सदरची योजना लागू करण्याबाबत शासन निर्णय निर्गमीत करण्यात आलेला आहे. |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची संक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ७२. | विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य ''पीएमश्री''(PM Schools for Rising India) योजनेअंतर्गत शाळा विकसित करणे.<br>(राज्य हिस्सा ४०%)<br>(केंद्र हिस्सा ६०%)<br>कार्यक्रम<br>(२२०२-के-८६५)<br>(२२०२-के-८७४)<br>(नवीन योजना) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५-२०२६<br>२०२६-२०२७ | ०.००<br>०.००<br>७३५३.८९<br>५१००.००<br>५२५०.०० | ०.००<br>०.००<br>०.००<br>०.०० | ...<br>०.०० | ''पीएम श्री'' (PM Schools for Rising India) योजनेअंतर्गत राष्ट्रीय शैक्षणीक धोरण, २०२० मधील सर्व घटकांचा समावेश करण्याच्या उद्देशाने देशातील सुमारे १५,००० हून अधीक शाळा उत्कृष्ट भौतीक/पायाभूत सुवीधांसह योग्य संसाधनांसह, आनंददायी व उत्साहवर्धक शैक्षणीकदृष्ट्या अनुकूल शालेय वातावरणात उच्च दर्जाचे गुणात्मक शिक्षण देणाऱ्या सर्वसमावेशक उत्कृष्ट शाळा म्हणून विकसीत केल्या जाणार आहेत. तसेच, पुढील टप्प्यात २,५०,००० शाळा उत्कृष्ट केल्या जाणार असून, राष्ट्रीय शैक्षणीक धोरण २०२० मधील विविध तरतूदींची अंमलबजावणी या शाळांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या शाळांचे उद्दिष्ट फक्त अकलनात्मक विकास (Cognitive Development) करण्यापुर्ते मर्यादित नसून मुलांचा एकवीसाव्या शतकातील प्रमुख कौशल्यांवर आधारीत सर्वांगीण विकास करणे व त्यांना सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व घडवणे हे देखील आहे. प्रत्येक इयत्तेत प्रत्येक मुलाच्या अध्ययन निष्पत्तीवर लक्ष केंद्रीत केले जाणार आहे. तसेच ''पीएम श्री'' शाळा खालील उद्दीष्टांची पुर्तता करतील.<br>राष्ट्रीय शैक्षणीक धोरण, २०२० नुसार एकसमान, सर्वसमावेशक, समाजोपयोगी आणि समाजाप्रती योगदान देणारे नागरीक घडवीणे व अनुभवात्मक, समग्र, एकात्मिक, खेळाधारित (विशेषतः पायाभूत वर्षातील शिक्षण), चिकित्सक, शोधआधारित, विद्यार्थी केंद्रीत, चर्चाआधारित, लवचिक व आनंददायक शिक्षणपद्धतीचा अवलंब करून विद्यार्थ्यांना अनुभवात्मक पद्धतीने आनंददायी शिक्षण देणे आणि शाळा, ''औद्योगिक क्रांती ४.०'' नुसार (Industrial Revolution 4.0) उदयोन्मुख अर्थव्यवस्थेच्या (emerging economy) कणा निर्माण करणे.<br>''पीएम श्री'' शाळा खालील प्रमुख सहा आधारस्तंभाच्या आधारे विकसीत करण्यात येतील<br>१) अभ्यासक्रम, अध्यापन शास्त्र व मुल्यमापन<br>२) प्रवेश आणि पयाभूत सुविधा<br>३) मानव संसाधन आणि शालेय नेतृत्व<br>४) समावेशक पद्धती आणि लिंग समानता<br>५) व्यवस्थापन, देखरेख आणि प्रशासन<br>६) लाभार्थी समाधान |

## समाजकल्याण आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांविषयक योजना (Gender Budget)

(रुपये लाखात)

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची सक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दांपत्यासाठी कन्यादान योजना.<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ३५३८)<br>नविन लेखशिर्ष (२२२५ जी ३२१) (२२२५-३५४७) | २०२२–२०२३ | ५,००.०० | ३४९.८० | | महाराष्ट्रात अनुसूचित जातीतील ( नवबौद्धांसह) आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबातील सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यास एकूण रु. १०,००० (रु. दहा हजार) इतके अर्थ सहाय्य वस्तुरूपाने देण्याचा निर्णय सन २००३-०४ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. शासन निर्णय दि. ०२/१२/२०१६ व शासन निर्णय दिनांक ३०/०४/२०२५ अन्वये सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या दांपत्यांना वस्तुरूपात देण्यात येणाऱ्या अनुदानात रु. २५,००० इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालकांच्या नावे अधोरेखित धनादेशाद्वारे (क्रॉसचेकने) लग्नाच्या दिवशी देण्यात येते.<br>तसेच सामूहिक सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रति पात्र जोडपे रु. ४,००० प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात येते यासाठी ३ महिन्याच्या आत विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील, असे नमुद करण्यात आले. सदर योजने अंतर्गत प्रतिवर्षी प्रत्येक जिल्ह्यात अनुसूचित जातीतील (नवबौद्धांसह) आर्थिकदृष्ट्या कमकुवत एकूण १०० जोडप्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो.<br>स्वयंसेवी संस्था/यंत्रणेने सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या मागासवर्गीय जोडप्यांची छायाचित्रे, विहित नमुन्यात अर्ज इत्यादी कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान १५ दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांचेकडे सादर करावी लागतात. |
| | | २०२३–२०२४ | ६००.०० | ४२०.०० | | |
| | | २०२४–२०२५ | ४२०.०० | ३६०.०० | | |
| | | २०२५–२०२६ | ६००.०० | | | |
| | | २०२६-२०२७ | २००.०० | | | |
| २. | इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती.<br>जुने लेखाशिर्ष (२२२५ ०५३९)<br>नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १६१) | २०२२–२०२३ | ५०.४० | ६४.७५ | ... | मागासवर्गीय मुलींमध्ये प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येत असल्यामुळे ते कमी व्हावे म्हणून इ. ५ वी ते ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व मागासवर्गीय मुलींना दरमहा रुपये ६० प्रमाणे १० महिन्यांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. सदर योजना दिनांक १२ जानेवारी १९९६ पासून सुरू करण्यात आलेली आहे. यासाठी उत्पन्नाची किंवा गुणाची अट नसून शाळेत उपस्थिती ही एकच अट ठेवण्यात आलेली आहे. |
| | | २०२३–२०२४ | १०३.८५ | ३२४.३० | ५१९१ | |
| | | २०२४–२०२५ | २४४.५७ | २४४.५७ | ४०७६२ | |
| | | २०२५–२०२६ | १८४.१० | | | |
| | | २०२६-२०२७ | | | | |

| अ. क्र. १ | योजनेचे नाव २ | वर्ष ३ | तरतूद ४ | खर्च ५ | लाभार्थी ६ | योजनेची सक्षिप्त माहिती ७ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | इयत्ता ८ वी १० मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. जुने लेखाशिर्ष (२२२५ ०५३९) नविन लेखाशिर्ष (२२२५ जी १६१) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ...<br>...<br>...<br>... | ...<br>...<br>...<br>... | ...<br>...<br>...<br>... | शासन निर्णय, इबीसी-२००३/प्र. क्र. ११६/मावक-२, दि. २३ मे, २००३ अन्वये मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना शासन निर्णय, दिनांक १२ जानेवारी १९९६ अन्वये सन १९९५-९६ पासून सुरू करण्यात आली. ही बाब लक्षात घेऊन याच धर्तीवर इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार दरमहा रुपये १०० याप्रमाणे १० महिन्यांसाठी शिष्यवृत्ती या योजने अंतर्गत दिली जाते. |
| ४. | शासकीय वसतिगृहे (२२२५ ३३४२) | २०२२–२०२३<br>२०२३–२०२४<br>२०२४–२०२५<br>२०२५–२०२६<br>२०२६-२०२७ | ४९५००.००<br>५५४९९.९८<br>५६८४३.८०<br>४७९००.००<br>६००००.०० | ४१८५९.३९<br>२९१८४.४२<br>४१०४८.८४ | ...<br>...<br>... | मागासवर्गीय मुला-मुलींना उच्च शिक्षण घेण्यासाठी व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षण सुलभ व्हावे याकरिता शासनाने शासकीय वसतिगृहे कार्यान्वित केलेले आहेत. सदरची योजना ही सन १९२२ पासून सुरू असून सद्या महाराष्ट्रात मागास-वर्गीय मुला-मुलींकरीता ४४१ शासकीय वसतिगृहे आहेत. त्यामध्ये मुलांची २२९ व मुलींची २१२ वसतिगृहे असून लाभार्थी विद्यार्थी संख्या ४१,४८३ एवढी आहे. आज मितीस एकूण २८६ वसतिगृहे शासनाच्या इमारती मध्ये कार्यान्वित असून उर्वरित १५५ वसतिगृहे भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यान्वित आहेत. त्याप्रमाणे केंद्र शासनास प्रस्तावित केलेले आहे. शासन निर्णय, दिनांक २८-६-२००७ अन्वये जिल्हा व तालुकास्तरावर नवीन १०० शासकीय वसतिगृहे व विभागीय स्तरावर १,००० विद्यार्थी क्षमतेची ७ वसतिगृहे सुरू आहेत. |

**टिप -** समाज कल्याण आयुक्तालयाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्वच शैक्षणिक, आर्थिक विकास, गृहनिर्माण भांडवली खर्च कर्ज योजना तसेच सामाजिक सुरक्षा व कल्याणाच्या योजनांचा लाभ पुरूष, महिला, विद्यार्थी, विद्यार्थिनींना देण्यात येतो.